# प्रकरण चार

## समाजकल्याण विभाग

**4.377 20 टक्के सेस फंडातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना वॉटर फिल्टर वाटप करणे 18 लीटर (ISI) प्रमाणित.**

**पंचायत समिती कल्याण, जिल्हा ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** खर्च रूपये 4,81,250/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वॉटर फिल्टर खरेदी करणेकरीता स्पेसिफिकेशन मध्ये ISI वॉटर फिल्टर खरेदी करणेबाबत निविदा कागदपत्राच्या स्पेसिफिकेशनवर नमूद आहे. परंतू, रितेश एंटरप्रायझेस यांनी ISI प्रमाणित वॉटर फिल्टर खरेदी न करता विना ISI प्रमाणित एकूण 385 वॉटर फिल्टर खरेदी करून पुरवठा केलेला आहे. रितेश एंटरप्रायझेस यांना वाटाघाटीसाठी बोलावून वॉटर फिल्टर रूपये 1,250/- प्रत्येकी खरेदी केलेले आहेत.

2) रितेश एंटरप्रायझेस यांनी दिनांक 11/01/2016 रोजीचे पत्र दिले असून त्यामध्ये ISI वॉटर फिल्टर उपलब्ध नसल्याने विना ISI वॉटर फिल्टर पुरवठा करणेबाबत नमूद केले आहे. तरी स्पेसिफिकेशन प्रमाणे पुरवठा का केला नाही, याबाबत खुलासा आवश्यक आहे.

3) लेखापरीक्षण कालावधीपर्यंत एकूण 385 वॉटर फिल्टर पैकी 70 वॉटर फिल्टर अद्याप वाटप केले नाहीत.

**4.378 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशिन पुरविणे योजनेतील अनियमितता बाबत. (डिजीटल कॉपी आणि प्रिन्टर्स साईज A-3) MP 2014.**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती वसई, सन 2015-2016 या वित्तीय वर्षात 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी झेरॉक्स मशिन पुरविणे योजनेसाठी प्रमाणक क्रमांक 41, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 5,71,155/- इतका खर्च केलेला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 या शासन निर्णयातील परिच्छेद 5 प्रमाणे खरेदी समिती स्थापन करणेबाबत आदेश निर्गमित केले असताना खरेदी समिती स्थापन करण्यात आलेली नाही.

2) परिच्छेद क्र.10 अन्वये ई-निविदा प्रणालीचा वापर करणेत आला नाही.

3) तसेच परिच्छेद क्रमांक 11 अन्वये वस्तुंची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारी पूर्वी करणेत आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34 दिनांक 20/11/1999 अन्वये लाभार्थ्यांची निवड करुन साहित्य खरेदी करणे आवश्यक असताना समाजकल्याण विभाग, पंचायत समिती वसईने झेरॉक्स मशीन 15 खरेदी केल्या असून प्रत्यक्षात 10 लाभार्थीचे प्रस्ताव उपलब्ध आहेत. शासन निर्णयाचे अंमलबजावणी करणेत आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 मधील अट क्रमांक 5 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले असेल त्याच वित्तीय वर्षात लाभ देणे बंधनकारक आहे. परंतू, समाजकल्याण विभाग, पंचायत समिती वसईने साठा नोंदवही पान क्रमांक 91 वर 15 संच घेतल्याची नोंद आहे. परंतु लेखापरीक्षण दिवसापर्यंत वाटप करण्यात आलेले नाही. शासन निर्णयाचे अंमलबजावणी करणेत आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.444/ वित्त-9, दिनांक 15/07/2008 मधील परिशिष्ट ई नुसार नेमून दिलेल्या वेळापत्रकानुसार सदर अंमलबजावणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/1030/34, दिनांक 01/01/1993 नुसार विहित केलेले लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे व योजनानिहाय लाभार्थ्यांची नोंद ठेवणे आवश्यक असताना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

8) मिळालेल्या साहित्याची विक्री करणार नाही व सदर साहित्याचा वापर स्वयंरोजगारासाठी करणार अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र संबंधित लाभार्थ्यांकडून घेणे आवश्यक असताना तसे प्रतिज्ञापत्र घेण्यात आलेले नाही.

9) श्री.योगेश कमलाकर मेहेरे राहणार रानगांव स्वत:ची जागा असणे किंवा भाडयाची असल्यास एन.ओ.सी. असणे आवश्यक असताना तसे कागदपत्र प्रस्तावासोबत उपलब्ध नाही.

10) श्री.जयेश अनंत वैती राहणार अर्नाळा किल्ला यांचा स्वत:ची जागा असणे किंवा भाडयाची असल्यास एन.ओ.सी. असणे आवश्यक असताना तसे कागदपत्र प्रस्तावासोबत उपलब्ध नाही.

11) समाजकल्याण विभागाने 3 टक्के अपंग लाभार्थ्यांची संख्या लक्षात न घेता पुरवठादारास 15 झेरॉक्स मशिनचा पुरवठा कशाचे आधारे पुरवठा आदेश दिला याबाबत खुलासा करावा. तसेच एकूण 10 लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त असल्याने 5 झेरॉक्स मशिन जादा खरेदी केल्याने पंचायत समितीचे रुपये 1,90,385/- नियोजनाअभावी नाहक गुंतून पडलेले आहेत. याबाबत संबंधित विभागप्रमुख यांचेकडून वसूलपात्र ठरते. याबाबत सविस्तर खुलासा सादर करावा.

**4.379 दलित वस्ती सुधार योजनेतून केलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-16 या वित्तीय वर्षाअंतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे आदेश क्रमांक 166, दिनांक 11/03/2016 अन्वये डहाणू तालुक्यातील 7 ग्रामपंचायतीना दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रमाणक क्रमांक 526, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 14,90,000/- खर्चाच्या कामाची प्रशासकिय मंजुरी देण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचे पैसे काढताना ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीची मंजुरी/ ठराव घेऊनच कार्यवाही केल्याबाबत खात्री केलेली नाही.

2) मंजूर केलेली कामे आराखड्याप्रमाणे पुर्ण करून घेण्याबाबत गटविकास अधिकारी यांनी संबधित ग्रामपंचायती सोबत करारनामा करून घेणे आवश्यक होते. परंतु, तसे केल्याबाबतचे लेखे उपलब्ध नाहीत.

3) ज्या जागेवर बांधकामे केली आहेत ती जागा ग्रामपंचायतीच्या मालकीची असल्याबाबत खात्री पटवलेली नाही.

4) मंजूर केलेली कामे सहा महिन्याच्या आत पुर्ण करावयाची असतांना त्यानुसार पुर्ण केलेली नाहीत.

5) वापरण्यात आलेले साहित्यांची चाचणी अहवाल पी.एम.जी.एस.वाय जिल्हा प्रयोगशाळेतून प्राप्त करून घेणे आवश्यक होते. परंतु, तसे केलेले नाही किंवा तसे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

6) कामे सुरु करण्यापूर्वी व कामे पुर्ण झाल्यानंतर त्या परिसराची छायाचित्रे घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी, पालघर यांना पाठविणे अनिर्वाय होते व त्यासाठी लागणारा खर्च योजनेच्या अनुदानातूनच करावा. परंतु, तसा खर्च योजनेतून केलेला नाही. म्हणजेच छायाचित्र पाठविण्यात आलेली नाहीत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल सादर करावा, असे नमूद असतानाही दलितवस्ती कामाचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषद, समाजकल्याण अधिकारी यांचेकडे गटविकास अधिकारी यांना पाठवावयाचे आहे. उपयोगिता प्रमाणपत्र पाठविल्याची पोच लेखापरीक्षणास सादर करावी.

8) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ढवसु 2008/प्र.क्र.524/ विघयो 1, दिनांक 14/11/2008 परिशिष्ट अ मधील शासन आदेशांनुसार समाजकल्याण विभागाने कार्यवाही करून विहित मुदतीत सदरील कामे पुर्ण करावीत व जी कामे विहित मुदतीत पुर्ण होणार नाहीत. त्याबाबत वेळीच कार्यवाही

करून शासन योजनेपासून ग्रामीण दलित लाभार्थी जनता वंचित राहणार नाही, अशा सुचना असतांना कामे अपुर्ण अवस्थेत राहू न शासन निधीच्या झालेल्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करावी.

9) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक ढवसु 2008/ प्र.क्र.524/विघयो 1, दिनांक 14/11/2008 परिशिष्ट अ मधील शासन आदेशांनुसार योजनेअंतर्गत मंजूर कामाच्या रक्कमेच्या विनियोगाच्या पृष्ठर्थ्य दलित वस्ती घोषित केल्याची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे. तसेच कामाची तपासणी अहवाल अभिलेख्यात दिसून आले नाही.

10) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे आदेश क्रमांक 116, दिनांक 11/03/2016 मधील अट क्रमांक 2 अन्वये संबधित गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांचे संयुक्त खाते जवळच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत असण्याबाबत नमूद केलेले असतानाही ग्रामपंचायत बावडा, कापशी, कक्रांडी नंदोरे यांनी आय.डी बी.आय या बँकेत खाते उघडलेले आहे.

11) जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे आदेश क्रमांक 116, दिनांक 11/03/2016 मधील अट क्रमांक 22 अन्वये सदरचा निधी हा सन 2015-2016 मध्ये प्राप्त झाला असून हा निधी मार्च, 2016 पर्यंत खर्च करणे बंधनकारक आहे. तरी सदरचा निधी कुठल्याही परिस्थितीत मार्च, 2016 अखेर खर्च करावा. शिल्लक निधी शासन निर्णयानुसार जास्तीत जास्त मार्च, 2016 नंतर खर्च करता येणार नाही. तो शासनास भरावा लागेल, असे नमूद असतानाही प्रमाणक क्रमांक 506, दिनांक 31/03/2016 अन्वये दलितवस्तीना पहिला हप्ता (25 टक्के) वितरीत करण्यात आलेला आहे. म्हणजेच सदरचे काम हे दिनांक 31/03/2016 अखेरपर्यंत अपुर्ण अवस्थेत असल्याने आदेशातील अटींचे पालन झालेले नाही.

12) अर्धसमास पत्राअन्वये खर्च नस्तीची मागणी केली असता ग्रामपंचायत नरपड, पोखरण, कासा यांच्याकडील दलित वस्तीचे लेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच वाणगाव पाटीलपाडा यांना पहिल्या 25 टक्के प्रमाणे पहिल्या हप्ताचे अनुदान वाटप केल्याचे दिसून येत नाही.

**4.380 समाजकल्याण विभागाकडील शिल्लक साहित्याबाबत.**

**पंचायत समिती अलिबाग, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** समाजकल्याण विभाग, पंचायत समिती, अलिबाग यांचे सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद उपकर निधीमधून पंचायत समिती, अलिबाग यांस प्राप्त झालेले 8 साहित्य लाभार्थीना वाटपाअभावी शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1098/प्र.क्र.73, दिनांक 20/10/2009 मधील (7) नुसार लाभार्थी निवड जून अखेर करुन त्यांना प्रत्यक्ष लाभ त्याच आर्थिक वर्षात सप्टेंबर अखेर दयावयाचा असताना समाजकल्याण विभाग, पंचायत समिती, अलिबाग यांनी का केली नाही. याबाबत संबंधिताकडून खुलासा मागवून पुर्तता करावी व प्राप्त साहित्य विनाविलंब मंजूर लाभार्थ्यास वाटप करुन पुर्तता दाखवावी.

**4.381 3 टक्के अपंगांकरीता पंचायत समिती सेस मधून खरेदी केलेले अपंगाकरीताचे साहित्य शिल्लक असलेबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 31/03/2016, अन्वये रक्कम रुपये 9,78,050/- चे पंचायत समिती कर्जत समाजकल्याण विभाग यांनी अपंगाकरिता खरेदी केलेल्या साहित्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1) साहित्य शासन दरकरारातील पुरवाठादारांकडून खरेदी केलेले आहे. तथापि महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस 2000/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीच्या कार्यपद्धतीची नियमपुस्तिका नुसार 2-9-3 अ नमूद केल्यानुसार संबधित खरेदीदार विभागांनी तात्काळ खरेदी समिती स्थापन करून त्यानुसार उपरोक्त खरेदी करणे बंधनकारक असताना अशी कार्यवाही केली नाही.

2) उपरोक्त नियमपुस्तिका क्र. 31/01/12 मध्ये निर्देशित केलेनुसार खरेदीदार कार्यालयाने कोणतीही खरेदी करण्यापूर्वी प्रशासकीय आदेश काढलेनंतर खरेदीची आवश्यकता व खरेदी केलेल्या वस्तूंचा विनियोग तातडीने केला जाणार आहे, असे प्रमाणिकरण करणे बंधनकारक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. खरेदी केलेले साहित्य लेखापरीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक आहे.

3) उपरोक्त नियमपुस्तिका मुद्दा क्रमांक 11 नुसार वस्तूची खरेदी 15 फेब्रुवारी पूर्वी करणे आवश्यक असताना मार्च अखेर खरेदी केलेली आहे

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446, दिनांक 20/06/2008 मधील परिच्छेद - इ मध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार सदरची योजना राबविलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा समिती 1968 चे नियम क्रमांक 91 नुसार पंचायत समितीस प्राप्त साहित्यांचा नोंद साठा नोंदवहीत घेवून प्रत्येक महिन्याच्या शेवटी शिल्लक साहित्याचा तपशिल काढावयाचा आहे, अशी कार्यवाही केलेली नाही.

6) सदर योजना राबविणेकरिता साहित्य खरेदीची रक्कम रुपये 9,78,050/- ची गुंतवणूक विनाकारण पंचायत समिती सेस निधीतील रक्कम गुंतून राहिलेली आहे, त्यामुळे व्याजाचे नुकसान झालेले आहे.

**4.382 पंचायत समिती सेस अंतर्गत 3 टक्के अपंगांना स्वयंरोजगारासाठी घरघंटी पुरविणे बाबत.**

**पंचायत समिती चिपळूण, जिल्हा रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती चिपळूण यांच्याकडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षातील लेखा परीक्षणावेळी समाजकल्याण विभागांतर्गत 3 टक्के अपंगांना पंचायत समिती सेस अंतर्गत स्वयंरोजगारासाठी घरघंटी पुरविण्याबाबतच्या लेख्यांची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक 27, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 15,249/- प्रमाणे 42 नग घरघंटीसाठी एकूण रक्कम रुपये 6,40,458/- एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अपंग 2015/प्र.क्र.137/वित्त-3, दिनांक 24/11/2015 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी स्वउत्पन्नाच्या 3 टक्के निधीतून घ्यावयाच्या अपंग कल्याणकारी योजनाची माहिती देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने वैयक्तिक लाभाच्या योजना देतांना संबंधित अपंग व्यक्तीच्या अपंगाचा प्रकार लक्षात घेवून त्यानुसार साहित्य खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) गट विकास अधिकारी, यांचे पुरवठा आदेश क्रमांक 2633, दिनांक 31/03/2016 मधील अट क्रमांक 6 अन्वये मक्तेदाराने मालाचा पुरवठा करतेवेळी साहित्यावर 3 टक्के पंचायत समिती सेस, अपंग कल्याण योजना सन 2015-2016 अंतर्गत पुरवठा असे पक्क्या शाईने छापून देण्याबाबत सूचित केलेले असतानाही तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) तालुक्यातील अपंग व्यक्तींचे मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे सदरील योजनेचा दुबार लाभ झाला किंवा कसे याबाबतची पडताळणी करता आली नाही.

4) गट विकास अधिकारी यांचे आदेश क्रमांक 2633, दिनांक 31/03/2016 मधील अट क्रमांक 5 अन्वये एकूण तरतुदीच्या 4 टक्के रक्कम ही सुरक्षा अनामत म्हणून करारनामा करतांना भरणा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नसून, देयकातून सुरक्षा अनामत 3 टक्के प्रमाणे रक्कम रुपये 19214.00 कपात केल्याने 1 टक्के प्रमाणे सुरक्षा अनामत कमी कपात करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

**4.383 मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन वाटप करणेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** प्रमाणक क्रमांक 8, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 1,93,806/- खर्च नोंदविला असून झालेल्या अनियमितता बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागासवर्गीय महिलांसाठी 37 नग शिलाई मशीन खरेदी केलेले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 मधील नियम 83 (1) (3) नुसार तांत्रिक अधिकाऱ्याकडून गुणात्मक व दर्जात्मक प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्यामुळे शिलाई मशीन योग्य गुणवत्तेचे मिळाल्या बाबतची खात्री पटवावी.

2) डिलिव्हरी चलनावर सदर वस्तू सुस्थितीत मिळाल्याबाबत कार्यालय प्रमुख व कर्मचारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच सदर वस्तूची नोंद नमुना नंबर 33 साठा रजिस्टर मध्ये घेतल्याचा पान क्रमांक नमूद केलेला नाही.

3) पुरवठा आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे शिलाई मशीनवर पंचायत समिती सेस 20 टक्के समाजकल्याण अनुदान असा मजकूर EMBOSSING करून PERMANENT MARKER ने लिहिण्यात आल्याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

4) मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन देवून त्यांना स्वावलंबी करून त्यांचा आर्थिक स्तर उंचावल्या बाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी ठेवलेले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-1088/ सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, सदर विभागाने लेखापरीक्षण कालावधी पर्यंत 9 शिलाई मशीन वाटप केलेल्या नाहीत.

6) लाभार्थीचे प्रस्ताव तपासले असता काही लाभार्थीचे प्रस्तावासोबत हमीपत्र स्टॅम्प पेपर लिहून देणे आवश्यक असताना ते लिहून देण्यात आलेले नाहीत.

**4.384 पंचायत समिती 20 टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीयांना सौर कंदील पुरविणे.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती मालवण यांनी मागासवर्गीयांना सौरकंदील पुरविणे योजने अंतर्गत रक्कम रुपये 2,92,000/- खर्च नोंदविला असून लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/ वित्त, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना काटेकोरपणे राबविणेबाबत परिशिष्ट-ई मध्ये वेळापत्रक दिलेले आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात प्रस्ताव कधी किती प्राप्त झाले, याबाबत रजिस्टर ठेवण्यात आलेले नाहीत.

2) शासन आदेशानुसार उपलब्ध प्रस्तावातील लाभार्थ्यांची नावांना पंचायत समिती सभेपुढे ठेवून त्या यादीस पंचायत समिती ठरावाने मान्यता घेणे आवश्यक असून तेच अधिकृत लाभार्थी जाहिर करुन त्यांना वैयक्तिक योजनेचा लाभ देणे आवश्यक आहेत. तथापि, तसे लाभार्थी निवडण्यात आलेले नाहीत. मंजूरी नसतांना 7 लाभार्थ्यांना वितरित करणेत आलेल्या सौरकंदिलांची रक्कम रुपये 16,009/- वसूल करुन सेस निधीत जमा करावी.

3) लाभार्थी निश्चित न करता 121 सौर कंदील खरेदी करण्यात आलेले आहेत. परिणामी खरेदी केलेले 121 सौरकंदील अद्यापही वितरीत करावयाचे आहेत. सदरचे सौरकंदीलसाठी खर्च करण्यात आलेली रक्कम रुपये 2,76,727/- गुंतून पडलेली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 मधिल अट क्रमांक 5 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांस लाभ देणे बंधनकारक असताना पंचायत समितीने केलेले नाही. म्हणजेच सदर वित्तीय वर्षात योजनेचे 100 टक्के उद्दिष्ट साध्य झाल्याचे दिसून येत नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 मधिल नियम 83 (3) नुसार वस्तुचा दर्जा व चाचणी अहवाल संबंधितांनी घेणे आवश्यक आहे. तथापि, तो कार्यनस्तीत आढळून आलेला नाही. योग्य प्रतीच्या असल्याची खात्री होत नाही.

6) खरेदी प्रक्रीया, महाराष्ट्र शासन, उद्योग व उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भां.ख.रा/2014/प्र.क्र.82/भागIII/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधिल परिच्छेद 11 मध्ये नमुद केल्या प्रमाणे सदरची खरेदी प्रतिवर्षी 15 फेब्रुवारी पर्यंतच करणे आवश्यक आहे. परंतु, तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भारास 1093/प्र.क्र.1239/37, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थींचे गाववार मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे एखादया व्यक्तीला दुबार लाभ झाला किंवा कसे, याबाबतची खात्री करता आलेली नाही व लाभार्थींचे एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले याबाबतचे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. परीणामी विहीत मुदतीत व एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले, याबाबत खात्री करता आलेली नाही.

8) पुरवठा केलेल्या सहित्यावर "पंचायत समिती सेस 20 टक्के समाज कल्याण योजना सन 2015-2016 अंतर्गत पुरवठा" असे पक्क्या शाईने लिहिल्याचा अहवाल नाही.

**4.385 मागासवर्गीय बेघर व्यक्तींना नवीन घरकुलासाठी अर्थसहाय्य देणेतील अनियमितात.**

**पंचायत समिती वैभववाडी, जिल्हा सिंधुदूर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद 20 टक्के सेस अनुदानातून मागासवर्गीय बेघर व्यक्तींना नवीन घरकुल बांधणेसाठी ग्रामपंचायत खाती रक्कम रुपये 3,40,000/- अनुदान वर्ग केलेले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर अनुदान ग्रामपंचायत खाती वर्ग करण्यात आलेले असून ग्रामपंचायतीकडील नमुना नंबर 7 ची सामान्य पावती घेवून दप्तरी ठेवण्यात आलेली नाही.

2) सदर योजनेचा लाभ देणेपुर्वी सदर लाभार्थ्याने रमाई आवास / इंदिरा आवास व इतर योजनेतून लाभ घेतला नसलेबाबतची खात्री गट विकास अधिकारी यांनी केल्याचा अहवाल दप्तरी ठेवलेला नाही.

3) सदर घर पती-पत्नी या दोघांचे संयुक्त नावे केल्याचा नमुना नंबर ८ उतारा किंवा दाखला नस्ती सोबत जोडलेला नाही.

4) लाभार्थ्यांना पहिला हप्ता रक्कम रुपये 35,000/- दुसरा हप्ता रक्कम रुपये 35,000/- तसेच घराचे बांधकाम पूर्ण झालेनंतर कामाचे अंतिम मुल्यांकन करून त्याचे प्रमाणपत्र दप्तरी ठेवलेनंतर अंतिम रक्कम रुपये 15,000/- लाभार्थ्यांना अदा करावे असे असताना. तशी कार्यवाही केलेचे दिसत नाही.

5) गटविकास अधिकारी यांचे अधिनस्त असलेले कनिष्ठ अभियंता यांचेकडून घराच्या कामाची मोजमापे पुस्तिकेत नोंद घेवून रक्कम अदा करावी व करण्यात आलेल्या कामाचे मूल्यांकन करून त्याचे प्रमाणपत्र दप्तरी ठेवलेले नाही.

6) सदर घराचे बांधकाम शौचालयासह पूर्ण करणार असलेबाबत तसेच घराचा लाभार्थीकडून दुरूपयोग केलेला आढळल्यास पूर्ण अनुदान वसूल केले जाईल. तसेच सदर घर दुसरे कोणासही विक्री करणार नाही. याबाबत लाभार्थींचे रक्कम रुपये 100/- च्या बाँड पेपरवर हमीपत्र लाभार्थीकडून करून घेणेत आलेले नाही.

7) संबंधित लाभार्थी यांचेकडून काम पूर्णत्वाचा दाखला व उपयोगिता दाखला, घर पूर्ण झाल्याचा फोटो व शौचालयाचा फोटो प्राप्त करून दप्तरी ठेवलेले नाहीत.

**4.386 पंचायत समिती सेस निधीतुन 20 टक्के व 3 टक्के मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर झेरॉक्स मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती नाशिक, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 32,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) आणि महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512) नुसार उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 8.6 नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गट विकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक आहे तशी कार्यवाही केलेली नाही.

2) लाभार्थ्यांना झेरॉक्स मशीनचे वाटप झालेनंतर संबंधीत अधिकाऱ्यांनी पाहणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सदरचे लाभार्थ्यांना वाटप केलेले साहित्याचा योग्यप्रकारे विनियोग होत असल्याचे प्रमाणपत्र व विनियोग दाखले संबंधीत अधिकाऱ्याकडून प्राप्त करून पुर्तता दर्शवावी.

3) झेरॉक्स मशीन साठा रजिस्टर नोंदवहीची तपासणी केली असता 3 टक्के सेस मधील 12 नग झेरॉक्स मशीन पैकी 06 नग व 20 टक्के सेस मधील 73 नग झेरॉक्स मशीन पैकी 31 नग लाभार्थींना वित्तीय वर्षा अखेर पर्यंत वाटप करणेत आलेले नाही.

**4.387 पंचायत समिती सेसमधून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 39) -** प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 05/08/2015 रक्कम रुपये 4,92,307/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक पंरास/1020/प्र.क.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार साहित्य खरेदी करण्यापुर्वी लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार नियोजन व अंमलबजावणी ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार पंचायत समितीने योजना राबविलेली नाही.

2) पंचायत समितीने प्राप्त मालाची उद्योग, व उर्जा कामगार विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512)/उद्योग-6, दिनांक 02/01/1992, मधील मार्गदर्शक सूचना, अटी व शर्ती नुसार साहित्याची गुणवत्ता व दर्जाबाबत शासकीय किंवा शासनमान्य संस्थेकडून तपासणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे पुरवठा केलेल्या मालाचा गुणवत्तेतबाबत खात्री होत नाही.

3) पंचायत समितीने लेखापरीक्षणापावेतो लाभार्थीस ताडपत्री वाटप केलेबाबत साठा नोंदवही नमुना नंबर 33 मध्ये पृष्ठ क्रमांक 32 ते 93 मध्ये वाटप दाखविण्यात आलेले आहे. तथापि सदर नोंदवहीमध्ये लाभार्थ्यांचे नावामध्ये खाडाखोड/उपरीलेखन केल्याचे दिसून आले. त्यामुळे योग्य लाभार्थ्यांना लाभ मिळालेबाबत खात्री करता आली नाही. दिनांक नमुद नाही. त्यामुळे वाटप विहित मुदतीत झाले किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) लेखापरीक्षणात लाभार्थींचे प्रस्तावाची तपासणी केली असता 6 प्रस्तावात दारिद्रय रेषेचा/उत्पन्नाचा दाखला नसलेचा दिसुन आला आहे. लाभार्थ्यांचे प्रस्ताव अपुर्ण असतांना लाभार्थीस लाभ दिलेला आहे. याबाबत खुलासा करावा.

5) पंचायत समितीने ग्रामविकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदीनुसार विहित नमुना विवरणपत्र “अ” मध्ये लाभार्थ्यांची नोंदवही (मास्टर नोंदवही) ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला गेला किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही.

6) पुरवठादार यांनी पुरवठा आदेशानुसार व योग्य त्या साईजचे साहित्य पुरविलेबाबत देयकावर प्रमाणपत्र नमुद केलेले नाही.

7) लाभार्थ्यांची मागणी तपासणीस उपलब्ध न झाल्याने मागणीप्रमाणे खरेदी केली किंवा कसे, याची खात्री व सत्यता पटत नाही. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केलेली लाभार्थी यादी नस्तीसोबत पहावयास मिळाली नाही. योजना राबवितांना योजनेला व्यापक प्रसिध्दी देऊन इच्छूक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन व पात्र लाभार्थ्यांची निवड करुन नंतर खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक होते. जेणे करुन केवळ निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या संख्येइतकीच खरेदी करणे शक्य होईल, व अनावश्यक खरेदी होऊन रक्कम गुंतून पडणार नाही. मात्र संबंधितांनी वरीलप्रमाणे लाभार्थी निवड करण्याची कार्यवाही केलेली नाही.

8) लाभार्थ्यांना ताडपत्री वाटप केले असल्याचे साठा नोंदवहीमध्ये दिसुन आले. तथापि सदर लाभार्थ्यांचे 7/12 उतारे लेखापरिक्षणासाठी अर्धसमासपत्र क्रंमांक 4, दिनांक 11/11/2016 ने मागणी करुनही उपलब्ध केले नाही त्यामुळे लाभार्थ्यांना दिलेला लाभ योग्य त्या लाभार्थ्यास मिळाले किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही. प्रस्तावात 7/12 चे उतारे नसतांना एकुण 19 लाभधारकांना लाभ कश्याच्या आधारे दिला.

**4.388 पंचायत समिती 20 टक्के सेस मधुन ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थींना लॅपटॉप पुरवणे 100 टक्के अनुदानावर.**

**पंचायत समिती नांदगांव, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती नांदगाव सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती सेस मधुन ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थींना 100 टक्के अनुदानावर लॅपटॉप पुरवणे या योजनेअंतर्गत रक्कम रुपये 2,95,470/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असून पंचायत समितीने मंजूर केलेल्या लाभार्थी यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निवड केलेल्या लाभार्थ्यांनाच लाभ दिल्याची खात्री करता आली नाही. लाभार्थींचे मागणी संदर्भाचे प्रस्ताव व अर्जाची छाननी केली असता लाभार्थींचे अर्ज मुदतीत प्राप्त झालेबाबत खात्री करता आली नाही. अर्ज कधी प्राप्त झाले व आवक बारनिशीत तशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थींची निवड योग्य झाली किंवा कसे ? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी प्रमाणपत्र नमुद केलेले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.73/ 34, दिनांक 20/10/1999 मागासवर्गीय यांच्या कल्याणाकरीता योजनेतून 30 टक्के रक्कम महिलांसाठी खर्च करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक आहे. मात्र साठा नोंदवही मध्ये वाटप दिनांक नमूद नाही.

5) मास्टर नोंदवहीत लाभार्थी नोंद घेवून परिपूर्ण नोंदवहीसह दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत खात्री करुन मास्टर नोंदवही लेखापरीक्षणाला सादर करावी.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई शासन निर्णय क्रमांक -1094/ सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस लाभ दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन साहित्याचा उपयोग योग्य प्रकारे होत असून याबाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असताना असा अहवाल दप्तरी नाही. तरी तपासणी अधिका-यांचा अहवाल उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावे.

7) लाभार्थींचे प्रस्ताव तपासले असता 3 प्रस्ताव अपुर्ण असल्यामुळे संबंधीताला लाभ देय नसल्यामुळे रक्कम रुपये 1,26,630/- वसुल करण्यात यावी.

**4.389 पंचायत समिती सेस 20 टक्के ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थांना झेरॉक्स यंत्र पुरविणे 100 टक्के अनुदानावर.**

**पंचायत समिती नांदगांव, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,88,855/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/ वित्त-9, मंत्रालय 32 दिनांक 20/06/2008 प्रमाणे ठरवून दिलेल्या वेळा पत्रकानुसार योजनेचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

2) लाभार्थी मंजूर यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात गरजु लाभार्थींना लाभ दिल्याबाबतची खात्री व सत्यता लेखापरीक्षणास पडताळुन पाहता आली नाही त्यामुळे एकूण 6 ही लाभार्थी यांचे प्रस्ताव अचूक व परिपुर्ण नाहीत.

3) टॅक्स इनव्हाईस क्रमांक 1912 दिनांक 21/01/2016 रुपये 2,88,855/- गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे परंतु झेरॉक्स यंत्र प्राप्त झाले बाबतचा दिनांक नमुद नाही, त्यामुळे साहित्य यंत्र अटी/शर्ती प्रमाणे नमुद मुदतीत प्राप्त झाले बाबतची खात्री करता आली नाही.

4) साठा नोंदवहीत दिनांक 12/01/2015 रोजी पृष्ठ क्रमांक 35 वर जमा नोंद घेण्यात आले आहेत. परंतु वाटप केले बाबत दिनांक नमुद नाही.

5) करारनामावर गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच पुरवठा कालावधी नमुद केलेला नाही. जागा कोरी सोडण्यात आली आहे.

6) नस्ती सोबत पुरवठा दाराचे बील पारित करणे बाबत गटविकास अधिकारी यांचे आदेश आहेत परंतु त्यावर स्वाक्षरी दिनांक क्रमांक नमुद नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/1089/ प्र.क्र.5534, दिनांक 05/10/1989 नुसार पंचायत समितीने मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.त्यामुळे लाभार्थ्यास दुबार लाभा दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर 2230/34/ 67, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार प्राप्त साहित्याचा उपयोग करुन लाभार्थ्यास आर्थिक स्थितीत काय व किती सुधारणा झाली याचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल नस्तीस आढळुन आला नाही. त्यामुळे योजनेचा उद्दिष्ट साध्य झालेबाबत खात्री होत नाही.

9) 6 लाभार्थीचे प्रस्ताव परिपुर्ण/अचूक व योजनेचे निकष पुर्ण करणारे नाहीत. त्यामुळे संबंधितांनी प्रस्तावाची पडताळणी न करता लाभ काय आधारे दिला याबाबत खुलासा करावा. अपात्र लाभार्थी कडून रक्कम रुपये 2,88,855/- वसुल करण्यात यावी. पंचायत समिती सेसमध्ये जमा करून अनुपालन सादर करावे.

**4.390 पंचायत समिती सेस 20 टक्के अनुदानातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर 5 HP इलेक्ट्रीक मोटार पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती निफाड सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती सेस 20 टक्के अनुदानातुन मागासवर्गीय लाभार्थ्यांना 10 टक्के अनुदानावर 5 HP इलेक्ट्रीक मोटार पुरविणे यावर रक्कम रुपये 32,97,000/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गटविकास अधिकारी यांनी साहित्य फी पोहच पावतीवर स्वाक्षरी केलेली आहे. परंतु, साहित्य प्राप्त झाले बाबतचा दिनांक नमूद केलेला नाही. सोबतच्या लिफाफ्यावर विस्तार अधिकारी पंचायत समिती निफाड यांचे स्वाक्षरीने माल/साहित्य 110+47=157 नग दिनांक 04/04/2016 रोजी प्राप्त झालेचे नमुद केलेले आहे. म्हणजेच साहित्य वित्तीय वर्ष संपल्यानंतर प्राप्त झालेचे दिसुन येते.

2) प्रशासकिय मान्यता आदेशावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

3) साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक 04/04/2016 असताना पुरवठादारास बिलाची रक्कम दिनांक 31/03/2016 प्रमाणक क्रमांक 47 अन्वये प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते. साहित्य प्राप्त होणे आधिच बिलाचे प्रदान करणे नियमबाहृय आहे.

4) विलंब आकार पुरवठा आदेश क्रमांक 461, दिनांक 12/02/2016 अन्वये पुरवठा दाखले 30 दिवसांत मालाचा पुरवठा करणे आवश्यक होते. म्हणजेच दिनांक 13/03/2016 पर्यत माल पोहोच करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात पुरवठा दाराने 04/04/2016 रोजी माल पोहोचविल्याचे दिसून येते. म्हणजेच 21 दिवस उशिराने माल पाठविला आहे. अटी व शर्ती प्रमाणे प्रति आठवडा 0.50 टक्के दराने दंड करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे एकुण रक्कम रुपये 32,97,000/- वर प्रति आठवडा 0.50 टक्के दराने प्रति आठवडा 16485 X 3 आठवडे = 49,455/- संबंधित पुरवठा दाराकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करुन चलनासह अनुपालन सादर करावे.

5) लाभार्थीचा प्रस्तावांची पडताळणी केली असता एकुण 41 लाभार्थींचे प्रस्ताव अपुर्ण व अनियमित आढळून आले आहेत. त्या अभावी संबंधीत एकुण 41 लाभार्थीना देणेत आलेली रक्कम रुपये 8,61,000/- संबंधितांकडुन वसुल करावे.

**4.391 पंचायत समिती सेसमधून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती ईगतपुरी, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 45) -** सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती सेस निधीमधून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप करणेकरीता रक्कम रुपये 4,98,116/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गट विकास अधिकारी यांनी पुरवठा आदेशानुसार व योग्य त्या साईजचे साहित्य पुरविलेबाबत देयकावर प्रमाणपत्र नमुद केलेले नाही. त्यामुळे योग्य त्या साईजचे साहित्य मिळालेबाबत खात्री करता आली नाही.

2) Director of supplies and disposals R.C. No. HDPE TARP/C-2/PC-RBOD0000/ 0615/ 06438/ 763, दिनांक 02/02/2015 च्या दरकराराची मुदत दिनांक 30/01/2015 ते दिनांक 31/01/2016 एवढी होती. दरकरार रुपये 3062.16 हा आहे. ताडपत्री खरेदीसाठी दिनांक 31/12/2015 व दिनांक 12/01/2016 रोजी पुरवठा आदेश दिलेला असल्याने रुपये 3062.16 प्रमाणे देयक प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि, रुपये 3277.08 या दराने देयक प्राप्त झाले असून त्याचे प्रदान करण्यात आलेले आहे. म्हणजेच एकूण 152 नगांसाठी रुपये 214.92 (3277.08 - 3062.16) प्रमाणे एकूण रुपये 32,668/- जादा प्रदान झालेले आहे. सदरची रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

3) प्रथम ताडपत्री पुरवठा आदेश दिनांक 31/12/2015 रोजी दिलेला असून साहित्य पुरवठयाची मुदत 30 दिवस म्हणजेच दिनांक 31/01/2016 एवढी होती. पुरवठादाराने दिनांक 10/03/2016 रोजी साहित्य पुरवठा केलेला आहे. म्हणजेच एकूण 38 दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केल्याचे दिसून येते. दरकरारातील अटी शर्तीनुसार 0.50 टक्के प्रति आठवडा याप्रमाणे रुपये 5,515/- विलंब शुल्क कपात करणे आवश्यक होते. तथापि, कोणतेही विलंब शुल्क कपात न करता रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. तरी विलंब शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

4) दुसरा पुरवठा आदेश दिनांक 12/01/2016 रोजी दिलेला असून साहित्य पुरवठयाची मुदत 30 दिवस म्हणजेच दिनांक 12/02/2016 एवढी होती. पुरवठादाराने दिनांक 10/03/2016 रोजी साहित्य पुरवठा केलेला आहे. म्हणजेच एकूण 26 दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केल्याचे दिसून येते. दरकरारातील अटी शर्तीनुसार 0.50 टक्के प्रति आठवडा याप्रमाणे रुपये 5,477/- विलंब शुल्क कपात करणे आवश्यक होते. तथापी, कोणतेही विलंब शुल्क कपात न करता रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. तरी विलंब शुल्काची रक्कम संबंधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

5) दिनांक 12/01/2016 चे पुरवठा आदेशातील ताडपत्री दिनांक 31/03/2016 अखेर 13 नग शिल्लक असल्याचे आढळून आले. ठराव क्रमांक 186, दिनांक 02/12/2015 अन्वये लाभार्थी निवड यादीस मान्यता देण्यात आलेली असतांना 13 लाभार्थ्यांना साहित्य वाटप न करणे म्हणजेच गरजू लाभार्थ्यांची नावे निवड यादीत घेतली नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे रुपये 42,602/- एवढी रक्कम नाहक गुंतून पडल्याचे दिसून येते. याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

**4.392 पंचायत समिती सेसमधून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती ईगतपुरी, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 47) -** सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती सेस निधीमधून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटप करणेकरीता खालील प्रमाणकान्वये रक्कम रुपये 2,68,800/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादार यांनी पुरवठा आदेशानुसार व योग्य त्या साईजचे साहित्य पुरविलेबाबत देयकावर प्रमाणपत्र नमुद केलेले नाही. त्यामुळे योग्य त्या साईजचे साहित्य मिळालेबाबत खात्री करता आली नाही.

2) इगतपुरी येथे साहित्य पोहोच करतांना महामार्गावर टोल असल्याने टोलची पावती इन्व्हॉईस सोबत सादर करणे आवश्यक होते. तथापि, नस्तीसोबत टोलची पावती आढळून आली नाही. त्यामुळे साहित्य प्राप्त दिनांकाबाबत तपासणी करता आली नाही.

3) सदर साहित्याचा पुरवठा आदेश दिनांक 12/01/2016 रोजी दिलेला असून साहित्य पुरवठयाची मुदत 30 दिवस म्हणजेच दिनांक 12/02/2016 एवढी होती. पुरवठादाराने दिनांक 10/03/2016 रोजी साहित्य पुरवठा केलेला आहे. म्हणजेच एकूण 26 दिवस विलंबाने साहित्याचा पुरवठा केल्याचे दिसून येते. दरकरारातील अटी शर्तीनुसार 0.50 टक्के प्रति आठवडा याप्रमाणे रुपये 4,992/- विलंब शुल्क कपात करणे आवश्यक होते. तथापि, कोणतेही विलंब शुल्क कपात न करता रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. तरी विलंब शुल्काची रक्कम संबंधीतांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

4) दिनांक 31/03/2016 अखेर 27 नग सौरकंदिल शिल्लक असल्याचे आढळून आले. ठराव क्रमांक 186 दिनांक 02/12/2015 अन्वये लाभार्थी निवड यादीस मान्यता देण्यात आलेली असतांना 27 लाभार्थ्यांना साहित्य वाटप न करणे म्हणजेच गरजू लाभार्थ्यांची नावे निवड यादीत घेतली नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे रुपये 42,602/- एवढी रक्कम नाहक गुंतून पडल्याचे दिसून येते.

5) एकूण 4 लाभधारकांच्या सौरकंदिल प्राप्त झालेबाबत साठा नोंदवहीवर स्वाक्षरी घेणेत आलेल्या नाहीत.

**4.393 पंचायत समिती सेस अंतर्गत ग्रामिण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांनी पन्हाळी (टीन) पत्रे पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती जळगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,98,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती समाजकल्याण विभागाने मास्टर नोंदवही (लाभार्थी) ठेवलेली नसल्याने लाभार्थीना दुबार लाभ दिलेला आहे किंवा कसे, लाभार्थी कुटुंबापैकी कोणीही सदस्य अंगणवाडी सेविका, मदतनीस, शासकीय निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबत प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच लाभार्थी कुटुंबाने गेल्या 10 वर्षात जि.प./पस महिला बालकल्याण/समाजकल्याण/कृषि योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराच्या वैयक्तीक योजनेचा लाभ घेतला नसलेचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. तसेच समाजकल्याण विभागाने गावनिहाय लाभार्थ्याची योजनालाभाची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

2) पंचायत समितीतील मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असुन लाभार्थींची निवड यादी नाही. लाभार्थी निवड करतांना पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, उप/शाखा अभियंता, आणि पंचायत समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन गरजेनुसार/आवश्यकतेनुसार गवतीछप्पर असणा-यां गरजूची निवड यादी तयार करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सदरहू कारणाने 10 लाभार्थ्यापैकी 6 लाभार्थ्याचे प्रस्ताव अदयापपावेतो लेखापरीक्षणाला तपासणीस प्राप्त झालेले नाही. पुरवठादाराकडून राष्ट्रीयीकृत बँकेची 10 टक्के रकमेची बँक गॅरेंटी प्राप्त करणेत आलेली नाही. योजनेची निवड करताना लाभार्थ्यांच्या मागण्या घेतलेल्या नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रमाणपत्र नमुद केलेले नाही. साहित्याचा पुरवठा झालेनंतर दर्जाबाबतचा चाचणी अहवाल प्राप्त नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- मागास-1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पन्हाळीपत्रा नग 120 वाटप करण्यात आलेले नाही. योजनेचा उद्देश सफल होत नाही. पंचायत समिती सेसची रक्कम रुपये 1,78,800/-चा सफल उद्देशाविना योजनेत अडकुन पडल्याचे सिध्द होते.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-1094/सीआर-2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीस लाभ दिल्यानंतर सक्षम अधिका-यांनी पाहणी करुन पन्हाळी पत्रे लाभाचे वाटप केले नंतर गवती छपराचे, कच्चे घराचे आच्छादन, पक्के झाल्याचे अहवाल सादर करणे बंधनकारक असताना तसा अहवाल दप्तरी नाही.

6) योजने अंतर्गत खरेदी केलेल्या पन्हाळी पत्र्यांची त्रयस्थ तांत्रिक संस्थेकडून तपासणी बाबतचा चाचणी अहवाल प्राप्त केलेचे दिसुन आलेले नाही. खरेदी करतांना शासकीय दरकरारा प्रमाणे खरेदी न करता खुल्या बाजारातुन 3 दर पत्रके मागवून खरेदी करण्याचे प्रयोजन काय याबाबत सखोल स्पष्टीकरण सादर करावे.

7) 3 दरपत्रके मागवितांना दरपत्रकात संबंधीत पुरवठादाराने 15 दिवसांत साहित्य पुरवठा करण्याचे हमी दिलेली असल्याने दर पत्रकाप्रमाणे संबधीत पुरवठादाराने पन्हाळीपत्रांचा पुरवठा 15 दिवसात करणे आवश्यक असतांना संबधीत पुरवठादाराने 39 दिवस उशीरा पुरवठा केल्याने नियमाप्रमाणे दंडनीय कार्यवाही होणे आवश्यक आहे.

8) शासन निर्णय क्रमांक-भाखस-2014/प्र.क्र.82/भागIII उदयोग 4, दिनांक 30/10/2015 प्रमाणे समिती गटीत केलेली नाही. तसेच परिच्छेद क्रमांक 3.2.3. अन्वये कार्यवाही केलेली नाही खुल्या पन्हाळी पत्राचे दराबाबत खात्री केल्याचे दिसुन आलेले नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास- 1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/02/1999 मागासवर्गीय यांच्या कल्याणाकरीता योजनेतून 30 टक्के रक्कम महिलांसाठी खर्च केलेली नाही.

**4.394 वाढीव उपकरातुन 10 टक्के महिला बाल कल्याण अंतर्गत मुलींना शिवणयंत्र पुरविणे (जि.प.)**

**पंचायत समिती चोपडा, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 37) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,11,750/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर देयकाची पडताळणी केली असता एशीयन एटंरप्रायजेस यांना 5500x35= रूपये 1,92,500/- अदा करावयास पाहीजे होते, परंतु, प्रत्यक्षात रक्कम रुपये 2,11,750/- अदा केलेले आहे. त्यामुळे पुरवठादारास रक्कम रुपये 19,250/- जादा प्रदान झाले आहे. सदर रक्कम वसुल करुन भरणा करण्यात यावी.

2) पिकोफॉल मशीन 33 वाटप केलेले असुन लेखापरिक्षण कालावधी पर्यंत 02 नग शिल्लक आहे. सदर साहित्य लाभार्थ्यांना वाटप करण्यात यावे. सदर साहित्याचे आर्थिक वर्षात वाटप न झाल्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही.

3) नोदणीकृत दुकानदारांकडूनच जिल्हा परिषद व पंचायत व पंचायत समिती यांनी साहित्य खरेदी करणे क्रमप्राप्त असतांना तसे न करता अनोदणीकृत दुकानदाराकडून साहित्य खरेदी केल्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्रक्र/597/34, दिनांक 05/10/1989 नुसार सर्व योजनातर्गत लाभ दिल्या जाणा-या लाभार्थीची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही. त्यामुळे एकाच घरातील व्यक्तींना दुबार लाभ दिला नसल्याचे प्रमाणित करुन सदर नोंदवही अद्यावत करुन पुर्तता करावी.

5) सदरचे साहित्य प्राप्त असुन त्याची नोंद साठा नोंदवहीत नोंद घेण्यात आली आहे. साहित्य प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के रक्कम गुणवत्ता अहवालानंतर अदा करणेबाबत महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक, दिनांक 02/01/1992 मधील परीच्छेद क्रमांक 8-6 मधील अटी व शर्ती मध्ये नमुद असतांना नियमबाह्य एकदाच रक्कम अदा करण्यात आली आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 96 प्रमाणे रक्कम अदा करण्यापुर्वी मालसाठा नोंदवहीत त्याचा दर्जा व प्राप्त साहित्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**4.395 3 टक्के वाढीव उपनिधीतून अपंगांच्या कल्याणासाठी झेरॉक्स मशिन खरेदीबाबत.**

**पंचायत समिती भडगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** प्रमाणक क्रमांक 18 दिनांक 17/02/2016 अन्वये ॲडव्हेंट सेल्स कार्पोरेशन जळगांव यांना झेरॉक्स मशिन नग 6, प्रती नग रुपये 36945/- प्रमाणे रक्कम रुपये 221670/- प्रदान करण्यात आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 96 प्रमाणे रककम अदा करण्यापुर्वी मालसाठा नोंदवहीत त्याचा दर्जा व प्राप्त साहीत्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रं. झेडपीए/2008/प्रक्र 416/वित्त-9 दि.20/6/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षीक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/परा-1दि. 24 जानेवारी 2014 नुसार गट (अ) प्रशिक्षण व सक्षमीकरणच्या योजना 50% व गट (ब) च्या साहीत्य खरेदीच्या योजना 50% खर्च करण्यात यावा. एकुण खर्चाच्या 3% रक्कम अपंग महिला व बालकासाठी खर्च करण्यात यावी. तसेच सदर योजनेच्या खरेदी साहीत्य रक्कमेच्या 10 टक्के रक्कम लाभार्थी यांच्याकडुन घेण्यात यावा. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रं मागास 1089/प्रक्र/597/34 दि. 5/10/1989 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली आहे तथापी सर्व योजनातर्गत लाभ दिल्या जाणाऱ्या लाभार्थ्याची एकत्र मास्टर नोंदवही परिरक्षीत न केल्याने, एकाच घरातील व्यक्तींना दुबार लाभ दिला नसल्याचे प्रमाणीत करुन सदर नोंदवही अद्यावत करुन पुर्तता करावी.

7) डीजीसी ॲण्ड डी यांचे दिनांक 5/8/2015 च्या दरकरारानुसार मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन सिस्टिम प्रा.लि., नवी दिल्ली यांची वरील साहित्य पुरवठा करण्यासाठी अधिकृत पुरवठादार म्हणून नियुक्त केलेले आहे. दराकरारामधील दरांमध्ये साहित्य पुरवठा करण्याबाबत जळगांव येथील पुरवठादार हे अधिकृत पुरवठादार नसतांना त्यांना पुरवठा करण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहे. त्यासाठी त्यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आलेली आहे. सदर दरपत्रकावर दिनांक 9/2/2016 अशी नमुद असतांना दरपत्रक प्राप्त झाल्याचा दिनांक हा दिनांक 6/2/2016 असा नमूद करण्यात आलेला आहे. यामुळे झालेल्या खरेदीबाबत साशंकता वाटते.

**4.396 वाढीव उपकर निधीमधून ताडपत्री खरेदीबाबत.**

**पंचायत समिती पारोळा, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,56,680/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिपणी केंव्हा सुरु केली व कधी मंजुर झाली या बाबतच्या तारखा मध्ये खाडाखोड आहे.

2) सदरचे साहित्य दिनांक 28/03/2016 रोजी प्राप्त असुन साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आली आहे. साहित्य प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के रक्कम गुणवत्ता अहवालानंतर अदा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 96 प्रमाणे रककम अदा करण्यापुर्वी मालसाठा नोंदवहीत त्याचा दर्जा व प्राप्त साहित्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 416/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षीक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) ग्रामविकास विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक- मागास 1089/प्र.क्र.597/34, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली आहे. तथापि, सर्व योजनातंर्गत लाभ दिल्या जाणा-या

लाभार्थ्यांची एकत्र मास्टर नोंदवही परिरक्षीत न केल्याने, एकाच घरातील व्यक्तींना दुबार लाभ दिला नसल्याचे प्रमाणित करुन सदर नोंदवही अद्यावत करुन पुर्तता करावी.

6) खरेदी केलेल्या साहित्याची त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना, दिनांक 31/03/2016 अखेर साठा नोंदवहीत ताडपत्री नग 16 शिल्लक असुन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले नाही. तसेच लाभार्थ्यांचे प्रस्ताव अप्राप्त आहेत. मंजुर लाभार्थी यादी व प्रस्ताव नसतांना साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात लाभार्थ्याना लाभ मिळालेला नाही. यावरुन योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही.

**4.397 पंचायत समिती सेस फंडातून 20 टक्के मागासवर्गीय महिलांना व 3 टक्के अंपगांकरीता 100 टक्के अनुदानावर शिलाई मशिन व मिनी झेरॉक्स मशिन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती नेवासा, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10 व 11) -** पंचायत समिती अंतर्गत पंचायत समितीसेस फंडातून 20 टक्के मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन 3 टक्के अपंगांकरीता झेरॉक्स मशिन पुरविणेसाठी ही योजना राबविण्यात आली आहे. सदरबाबत रक्कम रुपये 4,91,446/-खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची निवड पंचायत समिती ठरावान्वये केली असुन ठरावात लाभार्थीची मंजूर यादी नमुद केलेली नाही. त्यामुळे लाभार्थीची निवड कशाचे आधारे केली याबाबत पडताळणी करता आली नाही. याबाबत स्पष्टीकरणासह लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेवुन अनुपालन दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- झेडपीए/2000/ प्र.क्र.446/ वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्राकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक 10958/प्र.क्र.73/74, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थीची प्रपत्र-अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळल्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) साठा नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकूण 59 शिलाई मशिन व 17 झेरॉक्स मशिन खरेदी केली असुन लेखापरिक्षण कालावधीपर्यंत वाटप करणेत आले नाही. योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.398 पंचायत समिती सेस फंडातून 20 टक्के मागासवर्गीय महिलांना 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती संगमनेर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती संगमनेर अंतर्गत पंचायत समिती सेस मधुन मागासवर्गीयांना महिलाना 100 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणे ही योजना राबवली आहे. सदर योजनेवर रक्कम रुपये 6,44,520/- खर्च करण्यात आली आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची निवड पंचायत समितीने केली असुन ठरावात लाभार्थी निवड कशांचे आधारे केली याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्राकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) शासन परिपत्रक क्रमांक 10958/प्र.क्र.73/74, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थीची प्रपत्र -अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवुन दुबार लाभ प्रदान टाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) पुरवठादाराचे देयकातून आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार 2 टक्के आयकर रक्कम रुपये 12,890/- वसुल केलेला आहे. सदर रक्कम शासन सदरी भरणा करून अनुपालन दर्शवावे.

5) नस्तीसोबत करारनामा जोडलेला नाही तरी रक्कम रुपये 100/- वसुल शासन सदरी भरणा करावे.

6) साठा नोंदवहीची तपासणी केली असता लेखापरिक्षण कालावधी पावेतो 16 शिलाई मशीन शिल्लक आहेत. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

7) प्राप्त मालाचा शासन मान्य संस्थेचा तांत्रिक तपासणी अहवाल नस्तीसोबत आढळून आला नाही.

**4.399 उपकरच्या 20 टक्के निधीतुन मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्लास्टीक ताडपत्री व तुषारसंच पुरविणे बाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11 व 12) -** उपकरच्या 20 टक्के निधीतुन मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्लास्टीक ताडपत्री पुरविणेबाबत पंचायत समितीने रक्कम रुपये 9,97,225/- खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) लाभार्थी निवड प्रक्रिया लेखे, तपासणी अहवाल याबाबत अभिलेखे पडताळणीस प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड नियमोचित झाल्याची व पुरवठा झालेला मालाच्या दर्जाबाबत अचूकता तपासणी करता आली नाही.

3) लाभार्थ्यांचे एकूण 63 प्रस्ताव तपासणीस प्राप्त झाले नाहीत. तसेच प्राप्त प्रस्तावावर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

4) साठा नोंदवहीतील नोंदीनुसार लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकाही लाभार्थ्यास लाभ दिलेला नसून, 85 नग प्लास्टीक ताडपत्री व 25 नग तुषारसंच अद्यापपावेतो शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

5) उक्त नमूद शासन परिपत्रकानुसार नियोजन न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.400 उपकरच्या 20 टक्के व 10 टक्के निधीतुन 5वी ते 10वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींना लेडीज सायकल पुरविणे बाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13 व 14) -** उपकरच्या निधीतुन इयत्ता 5 वी ते 10 वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय व सर्वसाधारण मुलींना लेडीज सायकल पुरविणे बाबत पंचायत समितीने रक्कम रुपये 6,99,576/- खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2000/ प्र.क्र. 446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी वार्षिक नियोजन कालावधी निश्चित केलेला आहे. त्यानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

2) लाभार्थी निवड प्रक्रिया लेखे, लेडीज सायकल तपासणी अहवाल याबाबत अभिलेखे पडताळणीस प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड नियमोचित झाल्याची व पुरवठा झालेला मालाच्या दर्जाबाबत अचूकता तपासणी करता आली नाही.

3) ई-निविदा बाबत मुळ अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे खरेदी दराबाबत अचुकता प्रमाणित करता आली नाही.

4) लाभार्थ्यांचे एकूण 132 प्रस्ताव तपासणीस प्राप्त झाले नाहीत. प्राप्त प्रस्तावांवर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आल्या नाहीत.

5) साठा नोंदवहीतील नोंदीनुसार लेखापरिक्षण कालावधी पावेतो एकाही लाभार्थ्यास लाभ दिलेला नसुन, 206 नग लेडीज सायकल अद्यापपावेतो शिल्लक असल्याचे दिसून आले. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

6) 18 लाभार्थ्यांच्या प्रस्तावात खालील त्रुटी आढळून आल्या. (उदा. एस.टी. सुविधा नसल्याचा एस.टी. चा दाखला नाही, गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही, घरापासुन विदयालयाचे अंतर 2 कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असल्याचा मुख्याद्यापकांचा दाखला नाही)

7) उक्त नमूद शासन परिपत्रकानुसार नियोजन न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

8) उपरोक्त अनियमिततांबाबत नियमोचित कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

**4.401 20 टक्के मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिठ गिरणी पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती पुरंदर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती पुरंदर, महिला व बालकल्याण विभागाकडील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपकर निधीतुन 20 टक्के मागासवर्गीय लाभार्थ्यांना पिठगिरणी वाटप करणेबाबतची नस्ती तपासता सदरची ई-निविदा पध्दती ही जिल्हा परिषदेने राबविली असुन त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्राचे अनुषंगाने पंचायत समितीने त्या पुरवठादारास पुरवठा आदेश दिलेले असुन सदर योजनेची संचिका, प्रस्ताव व साठा नोंदवही यांचे लेखापरीक्षण केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडील ई-निविदा पध्दतीची अंमलबजावणी ही क्रमांक 6/15-16, दिनांक 06/11/2015 रोजी राबविली असुन सदर निविदा ही जिल्हापरिषद स्वनिधीतील मागणी व खर्चाचे अनुषंगाने राबविली आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मध्ये खरेदी विषयीची कार्यपध्दतीबाबतची नियमपुस्तिका व सविस्तर माहिती व कार्यपध्दती नमूद आहे. नियम पुस्तिकेतील परिच्छेद 2.11 (अ) (ब) मध्ये एक किंवा दोन पेक्षा जास्त विभागांसाठी खरेदी करावयाची असेल तर एकत्रितरित्या मागणी एकत्रित करुन परिच्छेद 3.2.3 मध्ये नमूद केलेप्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि नियमाप्रमाणे कार्यवाही केलेचे दिसून येत नाही.

तथापि, जिल्हापरिषदेने स्वनिधी व इतर तालुक्यांची मागणी एकत्रित करुन प्रकीया राबविलेली दिसून येत नाही. कारण पंचायत समितीने योजनेची व लाभार्थ्यांची निवड, तसेच खर्चास तांत्रिक मान्यता तद्नंतर म्हणजेच दिनांक 06/11/2015 नंतर घेतलेली आहे. सर्व तालुक्यांचा एकत्रित मागणीचा विचार करुन प्रकिया पार पाडली असता त्यांना याहीपेक्षा कमी / माफक दर व स्पर्धात्मक दराचा लाभ झाला असता. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे योग्य  वाजवी / स्पर्धात्मक दराचा पंचायत समितीस लाभ झालेचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-परास/1020/प्र.क्र.1418, दिनांक 09/02/2001 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुनच साहित्य खरेदी अथवा योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1094/सीआर/2239/31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्रक्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे विवरणपत्र 'अ' प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थी नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय / गावनिहाय व कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पंचायत समितीकडुन वैयक्तीक सहाय्य दिलेल्या लाभार्थीच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थीच्या सर्व नोंदी जात व गाव निहाय व कुटुबनिहाय घेऊन शासन निर्णयातिल अनुक्रमांक 1.5 मधील 1 मध्ये नमुद केलेप्रमाणे एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस / कुटुंबात दुहेरी दिले नसलेबाबतची खात्री सदर नोंदवही ठेवली नसलेने करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्रक्र-446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट 'ई' मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही केली नाही. योजना राबविणेमध्ये दिरंगाई झाली आहे. त्यामुळे शासनाचा विहित कालावधीत योजना राबवुन जास्तीत जास्त गरजु लाभार्थ्यांना वेळेवर लाभ देणेचा हेतू साध्य होत नाही.

4) पंचायत समिती ठरावामध्ये लाभार्थ्यांच्या नावानिशी लाभार्थी मंजूरीचा ठराव नाही.

5) माल प्राप्त झालेचे डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नसल्याने त्याच वित्तीय वर्षात माल प्राप्त झालेचे दिसून येत नाही. पुरवठा आदेशातील वर्णना प्रमाणे व सुस्थितीत मिळाले बाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती दौंड यांनी स्वाक्षरी करताना साहित्य प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद केला नाही. त्यामुळे साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

6) लेखापरिक्षणास अर्धसमास पत्र क्रमांक अनुक्रमे 1, दिनांक 28/11/2016, 4/दिनांक 30/11/2016, 45/दिनांक 12/12/2016 रोजी मागणी करुनही लाभार्थी प्रस्ताव लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे सदर योजनेचे नियम व अटीनुसारच योग्य लाभार्थ्यांनाच लाभ दिलेबाबत व प्रस्ताव परिपुर्ण असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक 1239/3, दिनांक 01/09/1993 नुसार योजनेचा लाभ दिलेनंतर कार्यालय प्रमुख यांनी साहित्याची पाहणी करून लाभार्थीची आर्थिक उन्नत्ती झाली किंवा कसे, याबाबत फलश्रुती अहवाल दिलेले नाहीत.

**4.402 उपकर निधीतून 20 टक्के मागासवर्ग व 3 टक्के अपंगकल्याण लेखाशिर्षाखाली पिठाची चक्की पुरविणे बाबतची खर्चाची अनियमितता.**

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती वेल्हा यांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकरनिधीतून 20 टक्के मागासवर्गीय व 3 टक्के अपंग कल्याणासाठी पिठाची चक्की पुरविणे. रक्कम रुपये 4,63,086/- खर्चाचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादार नयन एजन्सी यांचेकडून उपप्रमाणक क्रमांक 03393 व 03384 ने अनुक्रमे 22 व 4 नग विनोद ब्रँड आटा चक्की पुरवठा झालेली आहे. तथापि, सदर खर्च नसतीला उपप्रामाणिकांची छायांकित प्रत जोडून त्यावर दिनांक नसलेने खर्चाची सत्यता पडताळणी करता आली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 14(अ) 8 व नियम 20, नियम 1980 नुसार अनुक्रमे उपप्रमाणकांची मूळ प्रत न घेता छायाचित उपप्रमाणकावर दिनांक नसताना व प्रमाणक विरूपित न करता रक्कम आदा केलेने अनियमितता झालेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 96 नुसार उपप्रमाणकावर साठा नोंदवहीत साहित्याची नोंद घेतल्याबाबतचा संदर्भ उद्धृत केला नाही.

3) डिलेव्हरी चलन जिल्हा परिषद 34 व 35 वर ज्या वाहनाने मालपूरवठा केला त्या वाहनाचा क्रमांक नमूद नाही. तसेच ड्राइवरची स्वाक्षरी नाही. गटविकास अधिकारी यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही. मालसाठा नोंदवहीप्रमाणे दिनांक 10/03/2016 रोजी साहित्य प्राप्त झालेची नोंद असून दिनांक 31/03/2016 अखेर साहित्य वाटप केलेची नोंद आहे. तथापि, डिलिव्हरी चलनावर प्रत्यक्ष मालाचा पुरवठा व माल स्वीकारलेबाबत दिनांक व स्वाक्षरी नसलेने माल साठा नोंदवही नुसार साहित्य प्राप्त व वाटप हे विहित वेळेत झाल्याची खात्री करता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए- /प्र.क्रं 456/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट “ई” नुसार योजनेचे वेळापत्रक ठरवून दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5) शासनाने विहीत केलेल्या वेळापत्रकाचे पालन न केल्याने लाभार्थी प्रत्यक्ष लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेला आहे.

6) शासन परिपत्रक फेब्रुवारी, 2001 अनुसार लाभार्थींच्या प्रस्तावाची पडताळणी केली असता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे पूर्तता झाली नाही. 4 प्रस्तावात उणीवा आढळून आलेल्या आहेत.

7) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील तरतुदीनुसार लाभार्थ्यांच्या निवडीस पंचायत समितीची मान्यता न घेताच व साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर लाभार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून पीठगिरणीचे वाटप झाले आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.72/30, दिनांक 20/10/1999 मध्ये नमूद केल्यानुसार बाब क्रमांक 1,1.4,1.5,7 व 4 ची पूर्तता केलेली नाही.

**4.403 उपकर निधीतून मागासवर्गीयांना शिलाई मशीन खरेदीतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वडगांव-मावळ, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 30) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक

94 दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,82,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर नस्ती सोबतचा पुरवठा आदेश पाहता असे निदर्शनास आले की, पुरवठादारास पुरवठा आदेश दिनांक 05/03/2016 ला दिलेला आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 7 नुसार साहित्य पुरवठा दिनांक 31/03/2016 ला करणेत यावे असे नमुद आहे. या अनुषंगाने पुरवठादाराने दिलेला टॅक्स इन्वाईस व डिलीव्हरी चलन हे दोन्ही तपासले असता त्यावर माल पोहोच कधी केला याचा दिनांक घातलेला नाही. तथापि, एमएसएम लॉजिस्टीक्सच्या ट्रान्सपोर्ट चलनावर मात्र माल पोहोच केल्याचा दिनांक 13/06/2016 असा नमुद केलेला आहे. म्हणजे पुरवठादाराने एप्रिल, मे, जुन 2015 दिवस असे एकुण 75 दिवस उशीराने मालाचा पुरवठा केलेला आहे. आदेशातील अट क्रमांक 7 नुसार दिनांक 31/03/2016 पुर्वी पुरवठा न केल्यास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ यांना जी आवश्यक वाटेल ती दंडाची वसुली देयकातून करणेत येईल असे नमुद असताना देखील दंड वसुल केलेला नाही. तरी आता 75 दिवस म्हणजेच 10 आठवडे नुसार प्रति आठवडा 0.5 टक्के प्रमाणे प्रति आठवडा रक्कम रुपये 4,410/- प्रमाणे 10 आठवड्याचा रुपये 44,100/- एवढा दंड वसुल करणेत यावा.

2) लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासले असता असे निदर्शनास आले की, सर्व लाभार्थ्यांनी सुवर्णा शिवण क्लासचे शिवण क्लास शिकण्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स करुन त्यावर स्वत:चे नाव लिहुन प्रमाणपत्र जोडलेले आहे. शिवण क्लास झाला असलेबाबत प्रमाणपत्राची खात्री न करताच फॉल पिको मशीनचे वाटप कशाचे आधारे केले. यावर झालेला खर्च रक्कम रुपये 8,82,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ प्र.क्र.456/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट ई नुसार वेळापत्रक ठरवू दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1080/सीआर/ 1074/57, दिनांक 29/03/1983 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असताना तसा अहवाल प्राप्त झालेला नाही.

**4.404 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना आडवी कडबाकुट्टी यंत्र खरेदी व वाटपाबाबत.**

**पंचायत समिती वाई, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती वाई लेखापरीक्षण सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती सेसमधून 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना 21 नग कडबाकुट्टी यंत्र प्रमाणक क्रमांक 11, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 4,90,917/- अन्वये खरेदी केले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती वाई सर्वसाधारण सभा दिनांक 09/03/2016 मधील ऐनवेळीचा विषय क्रमांक 2 ठराव क्रमांक 848 ने मागासवर्गीय लाभार्थीसाठी घ्यावयाच्या योजनेतील लाभार्थी यादी मंजूर करण्याचा ठराव घेण्यात आला. मात्र इतिवृत्त नोंदवही पान नंबर 175 वर सदर ठरावात फक्त 1 ते 16 लाभार्थ्यांची नावे आहेत. व 17 ते

21 लाभार्थी यादी कोरी आहे. प्रथम लाभार्थी निश्चित करणे व नंतर खरेदी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, शासन क्रमांक सकृऔ-2015/प्र.क्र.218/11अे, दिनांक 23/11/2015 मधील परिशिष्ट क्रमांक 2 मधील अनुक्रमांक 16 नुसार क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी कोणत्याही परिस्थितीत आवश्यकतेपेक्षा अधिक मागणी नोंदवू नये. तसेच वाटपा विना औजारे शिल्लक राहिल्यास त्याच्या किंमती एवढया रकमेची वसूली मागणी नोंदविणाऱ्या अधिकाऱ्याकडून एकरकमी वसुल करण्यात येईल. असे शासनाचे आदेश असल्याने वाटपा विना शिल्लक असलेल्या 5 नगांची प्रति नग रुपये 23,377/- नुसार रक्कम रुपये 1,16,885/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 23/06/2008 परिशिष्ट ई मधील निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविलेली नाही.

4) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला एकापेक्षा अनेक वेळा लाभ दिला किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

5) मंजूर लाभार्थ्यांची यादी जोडलेली नाही.

6) 5 लाभार्थ्यांचे प्रस्ताव नाहीत.

**4.405 अपंग लाभार्थ्यांना झेरॉक्स मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती कोरेगाव, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 22/03/2016 अन्वये रक्कम रुपये 8,08,605/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जुनपर्यंत प्रस्ताव स्विकृती, दिनांक 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूरी व जानेवारी अखेर लाभार्थ्यांस साहित्य वितरण करण्याच्या सुचना आहेत. प्रस्तुत प्रकरणी वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील नियम 125 नुसार विकास परियोजना सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मंजूरीशिवाय कार्यान्वित करता येणार नाही, असे नमूद आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त 9, दिनांक 31/01/2013 नुसार सदर खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता सभापती यांची घेणे आवश्यक असताना पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही कलेली नाही.

3) डिजीएस ॲंड डी यांचे दरकरार 1. कोनिका, 2. सॅमसंग, 3. कॅनन या झेरॉक्स निर्मीती कंपनीबरोबर झालेले असून त्यांचे दर अनुक्रमे 1. कोनिका रूपये 36,945.30/-, 2. सॅमसंग रूपये 48,142.50/-, 3. कॅनन रूपये 47,565/- असे आहेत. कोनिका कंपनीचे दर कॅनन कंपनीच्या मशिनपेक्षा कमी असतांनाही पंचायत समितीने कॅनन कंपनीकडूनच खरेदी का केली? याबाबत वरीष्ठ कार्यालयाकडून काही तांत्रिक मार्गदर्शन प्राप्त करुन घेतले होते काय? याबाबत कोणतीही आवश्यक माहिती नस्तीसोबत नाही. कोनिका कंपनीचे दर व कॅनन कंपनीच्या दरापेक्षा प्रतिनग रुपये 10,619.70/- ने कमी आहेत असे असतांनाही पंचायत समितीने 17 झेरॉक्स मशिनची खरेदी प्रतिनग रुपये 47,565/- प्रमाणे कॅनन कंपनीकडून केलेली आहे. जादा दराने खरेदी केल्याने पंचायत समितीचे रुपये 1,80,534.90/- चे नुकसान झाले आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग 4, दिनांक 30/10/2015 मधील नियम क्रमांक 3.2.3 मधील परिच्छेद क्रमांक 2 नुसार योग्य ती कार्यवाही करुन डिजीएस ॲंड डीच्या दर करारानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) पंचायत समितीने कॅनन कंपनीचे अधिकृत वितरक प्रीतम एजन्सी यांचेकडून खरेदी केलेली आहे. परंतू, सन 2015-2016 साठी प्रीतम एजन्सीज सातारा हे कॅनन कंपनीचे अधिकृत वितरक असल्याचे प्रमाणपत्र नस्तीसोबत उपलब्ध नाही.

5) पंचायत समितीने सदर योजनेचा लाभ 17 अपंग लाभार्थ्यांना दिलेला आहे. सदर 17 लाभार्थ्यांपैकी 1. श्री. महेश राजाराम चव्हाण, नागेवाडी यांना विद्युत पंपाचा यापूर्वी लाभ दिलेला आहे व त्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 6 वर घेतलेली आहे. 2. श्री. प्रशांत प्रल्हाद काळोखे रा. वाठार स्टेशन यांनी यापूर्वी विद्युतपंपाचा लाभ दिलेला असून त्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 26 अनुक्रमांक 14 वर घेतलेली आहे. 3. श्री. दिलीप वामनराव बर्गे यांना 5 एचपी सबमर्सिबल विद्युत पंपाचा लाभ दिलेला असून त्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 106 अनुक्रमांक 4 वर करण्यात आलेली आहे. 4. श्री. अर्जुन परशुराम शेळके यांनाही 5 एचपी सबमर्सिबल विद्युत मोटार पंपाचा लाभ दिलेला आहे व त्याची नोंद साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 106 अनुक्रमांक 12 वर घेण्यात आलेली आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास1098/प्र.क्र.73/36, दिनांक 20/10/1999 नुसार दुबार लाभ अनुज्ञेय नसल्याने उपरोक्त 4 लाभार्थ्यांची रक्कम रुपये 1,90,260/- संबंधितांकडून वसूल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**4.406 10 टक्के महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत 90 टक्के अनुदानावर महिलांना शिलाई मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती माण-दहिवडी, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 24, दिनांक 31/03/2016 रक्कम रूपये 1,40,824/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर योजना राबविण्याबाबत वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जुन पर्यंत प्रस्ताव स्वीकृती, दिनांक 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूरी व माहे जानेवारी अखेर लाभार्थ्यांना वस्तुचे वितरण करण्याबाबत सुचना असताना देखील पंचायत समितीने प्रत्येक टप्प्यावर विलंब केलेला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्श्याची रक्कम प्रथम वसूल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सुचना असताना देखील पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) साठा नोंदवही अपुर्ण असून लाभार्थ्यांस वस्तु कोणत्या तारखेस दिल्या त्याचे दिनांक नमूद नाही. तसेच लाभार्थ्यांस दिलेल्या वस्तू, शिल्लक वस्तू, नोंदी संबंधीत अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत.

4) एकूण 29 लाभार्थ्यांपैकी 14 लाभार्थ्यांचा लाभार्थी हिस्सा दिनांक 25/05/2016 ते दिनांक 04/06/2016 अखेर प्राप्त आहे. साठा नोंदवहीवर सर्व नग वाटप केल्याचे नमूद आहे. वाटप सर्व नगाचे झाले असतांनादेखील 15 लाभार्थ्यांच्या लाभाची हिश्याची रक्कम/चलने लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाहीत. लाभार्थी हिश्याची रक्कम संबंधीत पुरवठादारास आदा केल्याची पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील परिशिष्ट 15 चे तरतूदीनुसार सक्षम संस्थेकडून मालाच्या दर्जाबाबत चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. चाचणी अहवाल उपलब्ध नसतांनादेखील पुरवठादारास रक्कम आदा केली असल्याने दर्जाबाबत पडताळणी करता आली नाही.

6) महिला व बाल कल्याण विकास विभाग, जिल्हा परिषद सातारा यांनी ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिन पुरविणे या योजनेअंतर्गत श्रीनाथ जनरल स्टोअर्स अहमदनगर यांचेकडून प्रति नग रुपये 3,553/- प्रमाणे शिलाई मशिन खरेदी केलेल्या आहेत. तथापि, पंचायत समिती माण यांनी सिध्दांत ट्रेडिंग कंपनी, कसबा पेठ पुणे यांचेकडून प्रतिनग 5,396/- प्रमाणे खरेदी केलेली आहे. उपरोक्त दोन्ही दरामध्ये मोठी तफावत असलेने सदर

तफावतीबाबत स्वयंस्पष्ट खुलाशासह पुर्तता लेखापरीक्षणास सादर करावी. अन्यथा, दर फरकाची रक्कम संबधीतांकडून वसूल करावी.

**4.407 100 टक्के अनुदानातून घरघंटी पुरविणे खर्चाबाबत.**

**पंचायत समिती खटाव-वडूज, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती खटाव (वडूज) सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात पंचायत समिती उपकराच्या समाजकल्याण विभागाकडील 100 टक्के अनुदानावर घरघंटी पुरविणे याबाबत प्रमाणक क्रमांक 10, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 26,05,834/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट 3 मध्ये नमूद केल्यानुसार 30 एप्रिल - योजना निश्चिती, 31 मे प्रस्ताव मागणी छाणणी, 31 मे पर्यंत लाभार्थी निवड, 31 ऑगस्ट - पुरवठा आदेश, 30 सप्टेंबर साहित्य वितरण व 31 मार्च - विनियोग दाखले प्राप्त करणे अशा वैयक्तिक स्वरुपाच्या योजना वेळापत्रकातील सुचनेनुसार योजना राबविण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये प्रथम ग्रामसभेमध्ये लाभार्थ्यांची निवड करुन तशा प्रकारच्या ठरावाने पंचायत समिती मासिक सभेमध्ये ठरावाव्दारे लाभार्थ्यांची प्रथमत: निवड करुन अंतिम यादीस मंजूरी आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही केलेची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्र.क्र.557/34, दिनांक 05/10/1989 मधील परिशिष्ट क्रमांक 1 प्रमाणे लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. मास्टर नोंदवही न ठेवल्यामुळे दुबार लाभ दिला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास1088/सीआर-779/30, दिनांक 26/10/1989 अन्वये वित्तीय वर्षात ज्या बाबींसाठी तरतूद केली आहे. त्याचा खर्च व विनीयोग त्याच आर्थिक वर्षात करण्याचे आदेश असतांना साहित्याचे वाटप दिनांक 09/05/2016 ते 11/07/2016 अखेर उशिराने करण्यात आलेले आहे.

5) क्लासी एंटरप्रायजेस, पुणे यांनी सादर केलेले डिलेव्हरी चलन क्रमांक 962 यावर दिनांक नमूद नाही व पुरवठा आदेश उपलब्ध न झाल्याने माल दिलेल्या वेळेत प्राप्त झालेबाबत खात्री करता येत नाही.

6) सदरची एकूण खरेदीची रक्कम रुपये 26,05,834/- असताना नियमाप्रमाणे रक्कम रुपये 10.00 लाखांपर्यंत रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100/- याप्रमाणे एकूण रूपये 1,700/- रुपयेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) पुरवठादारास रक्कम पोहोच झालेबाबत मुद्रांकित पोहोच पावती घेतली नाही.

8) अट क्रमांक 5 व 6 नुसार विद्युत कनेक्शन असलेबाबत मागील महिन्यात भरणा केलेले विद्युत देयक प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक असतांना व व्यवसायासाठी जागा उपलब्ध असलेबाबत घराचा नमुना नंबर 8 अ चा उतारा प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक असताना 9 लाभार्थ्यांच्या प्रस्तावाबाबत तशी कार्यवाही न करता लाभ देणेत आलेला आहे.

9) अट क्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांचे वय कमीत कमी 18 व जास्तीत जास्त 40 वर्षापर्यंत असणाऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ अनुज्ञेय असतांना 8 लाभार्थ्यांचे वय 40 पेक्षा जादा असतांनाही नियमबाहय लाभ देण्यात आलेला आहे.

**4.408 मागासवर्गीय महिलांना घरघंटी पुरविणे.**

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती कराड यांनी समाजकल्याण विभागांतर्गत मागासवर्गीय महिलांना घरघंटी पुरवठा करण्यासाठी प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 11,42,167/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविण्यासाठी वेळापत्रक निश्चित केलेले आहे. त्यानुसार दिनांक 30 जून पर्यंत प्रस्ताव स्विकृती, दिनांक 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मंजूर करणे व माहे जानेवारी अखेर लाभार्थ्यांना वस्तूचे वितरण करण्याबाबत सूचना आहेत. तथापि, सदर योजना राबविण्यासाठी पंचायत समितीस प्रत्येक टप्प्यावर विलंब झालेला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसूली केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये, अशा स्पष्ट सूचना असतांना पंचायत समितीने त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 94,752/- वसुली केलेली नाही. सदर रक्कम वसुली करुन पुरवठादारास आदा करणे आवश्यक आहे.

3) सदर योजनेतील खरेदी ही पंचायत समितीने ई-निविदा कार्यपध्दती राबवून करणे आवश्यक होते. तसे न करता महिला बालकल्याण विभाग जिल्हा परिषद सातारा यांनी ई-निविदा प्रक्रियेनुसार निश्चित केलेला पुरवठादार व दर यानुसारच सदर खरेदी करण्यात आली आहे. तथापि, सदर पुरवठा आदेश पहावयास मिळालेला नाही. त्यामुळे मे. क्लासी कॉम्प्युटर्स, पुणे यांचे दर मंजूर असल्याबाबत तसेच पंचायत समिती स्तरावरील खर्च होणा-या रकमेचा त्यामध्ये अंतर्भाव होता किंवा नाही याबाबत पडताळणी करता आली नाही. यास्तव पंचायत समितीने स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक होते अथवा शासन दरकरारावरील संस्थेकडून खरेदी करणे आवश्यक होते. मात्र अशी कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट 8 चे तरतूदीनुसार सक्षम संस्थेकडून मालाच्या दर्जाबाबत चाचणी अहवाल प्राप्त करुन घेतलेला नाही. दिनांक 09/03/2015 च्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 अन्वये वस्तूचा दर्जा मापदंडाप्रमाणे आवश्यक आहे. असे नमूद असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 43(3) नुसार पंचायत समितीने चाचणी अहवाल प्राप्त करुन न घेतल्याने दर्जाबाबत पडताळणी करता आली नाही.

5) पुरवठा आदेश पाहता त्यामध्ये चार दिवसांत करारनामा करुन दयावा लागेल असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, करारनामा न करता नियमबाहयपणे माल स्वीकृती केलेली आहे. तसेच नियमानुसार सुरक्षा ठेव घेण्यात आली नाही.

6) पुरवठादारास एन.ई.एफ.टी. व्दारे रक्कम प्रदान करणेच्या सुचना असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) साठा नोंदवही पान क्रमांक 7 पाहता एकूण 75 नग दिनांक 26/03/2016 रोजी प्राप्त झाले असून त्यापैकी 56 नगांचे वाटप लेखापरीक्षण कालावधीअखेर झालेले आहे. तथापि साठा नोंदवही वाटपाचे दिनांक नमूद केलेले नाहीत. तसेच 19 नग अद्यापि शिल्लक आहेत. त्यामुळे योजना 2015-2016 या आर्थिक वर्षात राबविली गेली नसल्याचे स्पष्ट होते.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 20 नुसार संबंधीत पुरवठादाराकडून रक्कम प्राप्त झाल्याबाबत पोहोच पावती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. रक्कम रुपये 11,42,167/- अदा केल्याबाबत पोहोच पावती आधारे पुर्तता दाखवावी.

9) योजनेच्या सफलतेबाबत फलश्रुती अहवाल व विनियोग दाखले प्राप्त करुन घेणेत आलेले नाहीत.

10) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद सातारा आदेश क्रमांक मबाक/कावि-2/49/2016 दिनांक 25/02/2016 अनुसार जिल्हा परिषद स्तरावरील खरेदीतून 11 नग पंचायत समितीतून दिले आहेत. त्यांचा लाभार्थी

हिस्सा 10 टक्के रुपये 980/- आहे. याचाच अर्थ जिल्हा परिषद स्तरावर रुपये 9,800/- प्रमाणे घरघंटीची खरेदी झाल्याचे दिसून येते. सदर प्रकारच्या व दराने खरेदी न केल्याने (16921-9800) रुपये 7,121/- प्रतिनग प्रमाणे 75 नगाची रक्कम रुपये 5,34,075/- जादा आदाई झालेली आहे.

11) पंचायत समितीने महिला बालकल्याण योजनेअंतर्गत 87 घरघंटी व समाजकल्याण अंतर्गत 99 घरघंटी अशा एकूण 186 नग दर रुपये 16,921/- प्रमाणे रुपये 31,47,306/- च्या खरेदी केल्याने सदर दरास पंचायत समितीने स्वीकृती देणे आवश्यक होते तथापि तसा ठराव केलेला नाही.

12) सदर योजना पंचायत समिती उपकरातून राबविली असल्याने लाभार्थी यादीस पंचायत समिती सभेची मंजूरी घेणे आवश्यक असतांना तशी मंजूरी घेण्यात आलेली नाही.

**4.409 मागासवर्गीय महिलांना 100 टक्के अनुदानावर पिको फॉल मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती पाटण, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 15, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 2,59,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/08/2008 मधील मार्गदर्शक सुचना व परिशिष्ट क्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना राबवितांना नमूद वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक असताना पंचायत समितीने प्रत्येक टप्प्यावर विलंब केला आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/सीआर/1633/57 दिनांक 07/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये अशा स्पष्ट सुचना असताना त्याप्रमाणे सदर योजनेच्या बाबतीत पंचायत समितीने कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1088/2512/ उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिशिष्ट 8 चे तरतूदीनुसार सक्षम संस्थेकडून पिको फॉल मशिनची गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83(3) नुसार चाचणी अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी चाचणी अहवाल दिनांक 7/4/2016 रोजी गव्हर्नमेंट इंजिनियअरींग कॉलेज, कराड यांच्याकडून घेण्यात आला आहे. चाचणी अहवाल प्राप्त होण्यापूर्वी पुरवठादाराला रकमेचे प्रदान केले आहे.

4) जाहिर नोटीस प्रसिध्दी दिनांक 03/03/2016 रोजीची असून त्यामध्ये अधिकृत विक्रेता मशिन आय.एस.आय. मानांकित इत्यादी नमूद आहे. प्राप्त तीन दरपत्रके हेमंत एजन्सी कराड, मंगलमूर्ती ट्रेडर्स कराड, महाराष्ट्र ट्रेडर्स कराड पैकी मंजूर दरपत्रक हेमंत एजन्सी कराड यांच्याकडील कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरीत निविदा धारकाची कागदपत्रे नाहीत.

महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस/1088/2512/उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 805 नुसार कार्यवाही केलेली नाही.

5) भारतीय आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(सी) अन्वये 1 टक्के वैयक्तिक व 2 टक्के संस्था यांच्याकडून आयकर वसूल करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रदान रक्कम रुपये 2,59,000/- वर 2 टक्के प्रमाणे 5,180/- आयकर वसुल करुन शासनास भरणा केलेला नाही.

6) पुरवठादारासोबत केलेला करारनामा दिनांक 11/04/2016 चा आहे. पुरवठा आदेश दिनांक 11/03/2016 चा आहे. उशिराने करारनामा करण्यात आल्याने असा करारनामा कायदेशीर होत नाही.

7) पुरवठा आदेशावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

8) डिलेव्हरी चलनावर माल सुस्थितीत मिळाल्याबाबत नोंद नाही.

9) मालसाठा नोंदवही पृष्ठ क्रमांक 115 वर लाभार्थ्यांना साहित्य वाटप केल्याचा दिनांक नमूद नाही. याशिवाय लेखापरीक्षण कालावधीअखेर वाटपाअभावी 19 मशिन शिल्लक आहेत. वाटपाबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

10) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक, मागास1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील क्रमांक 4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे विवरणपत्र “अ” प्रपत्राप्रमाणे विहीत नमुन्यात लाभार्थ्यांची नोंदवही तयार करुन मागासवर्गीय जातीनिहाय व गावनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे.

11) पिको फॉल मशिन लाभार्थी प्रस्तावासोबत आवश्यक ती कागदपत्रे नाहीत. लाभार्थी वय 18 ते 45 करीता वयाचा दाखला उत्पन्न रूपये 50,000/- पर्यंत उत्पन्न दाखला, मागासवर्गीय असलेस जातीचा दाखला, असणे आवश्यक आहे. आक्षेपातील 5 लाभार्थ्यांचे प्रस्ताव परिपूर्ण नाहीत.

**4.410 उपकर निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना मोफत पिठाची चक्की वाटप करणे.**

**पंचायत समिती तासगांव, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,37,751/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 जिल्हा परिषदेने योजना राबविताना पाळावयाचे वेळापत्रक दिले आहे. या वेळापत्रकाप्रमाणे योजना न राबविल्याने अनियमितता झाली आहे.

2) लाभ देण्यात आलेल्या प्रस्तावांची पडताळणी केली असता तांत्रिक मान्यतेच्या अटी व शर्ती प्रमाणे लाभार्थीचे वय 18 ते 50 पर्यंत असावे असे असताना 5 लाभार्थ्यांचे वय 50 पेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे. या अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिल्याने त्यांच्या लाभाची रक्कम रुपये 14121 x 5 = 70,605/- ची रक्कम वसूल कण्यात यावी.

3) भारत श्रीपती शिंदे यांच्या जातीच्या दाखल्यावरील झेरॉक्स प्रतीवर नावावर पट्टी चिटकवून झेरोक्स काढले आहे त्यामुळे सदर लाभार्थी मागासवर्गीय असल्याचे दिसुन येत नाही.

4) 2 लाभार्थ्यांच्या प्रस्ताव अर्जावरील स्वाक्षरी व साठा नोंदवहीवरील पिठाची चक्की प्राप्त झाल्यावरची स्वाक्षरी यात तफावत असल्याचे दिसून आले.

**4.411 20 टक्के राखीव उपकर निधीतून मागास लाभार्थींना व 3 टक्के अपंगांना दळण संयंत्र (घरघंटी) पुरवणे बाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 4,29,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ठ “ड” नुसार जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी वेळापत्रकानुसार योजनेची तरतूद मे 13 पूर्वी करणे, समित्यांची मंजूरी जून 30 पूर्वी घेणे, तांत्रिक मंजूरी 31/08/2015 पूर्वी घेणे, प्रस्ताव छाननी 31 जुलै अखेर करणे, साहित्य पुरवठा आदेश 30 नोव्हेंबरपूर्वी देणे व लाभार्थी साहित्य वाटप 31/01/2016 अखेर करणे आणि विनियोग दाखले मार्च 2016 अखेर घेऊन योजनेचे उददीष्ट पूर्ण करणे असे असतांना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/ 34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थीक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणा झाल्याबाबत अहवाल घेतलेला नाही.

3) पुरवठा आदेश मधील अट क्रमांक 3 प्रमाणे सदर दळण यंत्र लाभार्थीस घरघंटी वाटप केल्यानंतर त्यांना प्रशिक्षण देऊन सुव्यवस्थित चालू असलेबाबत लाभार्थीचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) गटविकास अधिकारी, पंचायत समिती कागल यांनी सदर साहित्य वाटप झाल्यानंतर साठानोंदवहीत वाटपाच्या शेवटी प्राप्त, वाटप व शिल्लक साहित्याची पडताळणी करून सही व शिक्क्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वाटप झालेले साहित्य योग्य लाभार्थीस झाले किवा कसे समजून येत नाही.

5) श्री. मारुती सदाशिव चौगुले, सिद्धनेर्ली या लाभार्थ्याला 3 टक्के अपंग व 20 टक्के मागास या दोन्ही योजनेतून लाभ दिलेला आहे. तरी एक लाभ मान्य करून दुसरा लाभाची रक्कम रुपये 13,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

6) सदर साहित्य प्राप्त झाल्यानंतर शासकीय प्रयोगशाळेतून तपासणी करून निविदेतील तपशीलाप्रमाणे असलेबाबत गुणवत्ता तपासणी अहवाल घेतलेला नाही.

7) पंचायत समिती कागलने निवड केलेले प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे लाभार्थीचे दाखल्यांची उणीवा दिसून आल्या (उदा. उत्पन्नाचा, रहिवाशी दाखला नाही, रुपये 100/- च्या मुद्रांकशुल्क वर करारनामा केलेला नाही, करारपत्र व ग्रामसभा ठराव उपलब्ध नाही, रहिवाशी दाखला, वीज बिल, 8 अ चा उतारा नाही, रेशन कार्ड, कारनामा, ग्रामसभेचा ठराव नाही)

**4.412 20 टक्के राखीव मागास महिला बचत गटांना प्लास्टिक किटली (5 ली.) खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 22, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 99,996/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती सेस निधीतून सन 2015-16 अंतर्गत समाज कल्याण विभागामार्फत पंचायत समिती कागल ने 20 टक्के राखीव मागास महिला बचत गटांना प्लास्टिक किटली (5 लीटर) खरेदी दर पत्रके मागवून कमी दाराची निविदा मजूर केली आहे.

महराष्ट्र शासन, ग्रामविकस जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- एलएफसी/1093/2295/सी.आर. 2445/24, दिनांक 05/05/1994 मधील अनुसूची अंतर्गत इ-समाज कल्याण अनुक्रमांक 38 ते 49 मधील कामाच्या यादीमध्ये महिला बचत गटांना प्लास्टिक किटली ( 5लीटर ) लाभार्थींना वाटप योजना समाविष्ट नसताना नियमबाहय मंजूर केलेले आहे, त्याची रक्कम रुपये 99,996/- (641x156) उपकर निधीतून आदा केलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 101 अन्वये अनुसूची 2 मध्ये समावेश केलेल्या योजना घेणे त्याशिवाय वेगळ्या योजना घेणेच्या असतील तर शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. ती घेतलेली नाही. सदर खर्च नियमबाहय असल्याने लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही. सदरची रक्कम रुपये 99,993/- वसूल करणे आवश्यक आहे.

सदर साहित्य दिनांक 23/05/2016 रोजी प्राप्त झालेले आहे, परंतु लेखापरिक्षण दिनांक अखेर 121 नग वाटप झालेले असून 520 नग शिल्लक आहेत. त्याची रक्कम रुपये 81,120/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यामुळे सदर रकमेच्या लाभापासून लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. त्यामुळे शासनाचा उद्देश सफल झालेला नाही असे स्पष्ट दिसून येते.

सदर योजनेकरिता 1 ते 12 बचत गट लाभार्थी निवड केलेली आहे. त्यांचे प्रस्ताव व निवड यादी दप्तरी उपलब्ध नाही. म्हणजेच शिल्लक साहित्य व निवड यादी नसताना अनावश्यक खर्च वसूल होणे आवश्यक आहे.

**4.413 वीस टक्के मागासवर्गीय राखीव निधीतून व अपंग कल्याण राखीव निधीतून साहित्य वाटप करणे.**

**पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती आजरा सन 2015-16 मध्ये 20 टक्के मागासवर्गीय राखीव निधी व 3 टक्के अपंग कल्याण निधीतून स्वरोजगार करीता साहित्य दरपत्रके मागवून खरेदी करून त्याची रक्कम रुपये 5,87,288/- पुरवठादार यांना अदा केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.78/34, दिनांक 20/10/1999 प्रमाणे लाभार्थी निवडीची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्याप्रमाणे लाभार्थी निवड ही ग्रामसभेत करणेची आहे. व त्यास पंचायत समितीने मंजुरी देणेची आहे सबब लाभार्थी निवड करून त्यास पंचायत समितीची मंजुरी घेण्यात आली नाही.

2) साहित्य खरेदीपुर्वी लाभार्थी निवड न करता साहित्य खरेदी केली आहे व त्यानंतर लाभार्थ्यांकडून प्रस्ताव मागणी करून पुढील आर्थिक वर्षात त्याचे वाटप केले आहे. त्यामुळे लेखापरीक्षण महिना माहे नोव्हेंबर, 2016 अखेर साहित्य विनावाटप शिल्लक असल्याने उपकर निधीची रक्कम रुपये 30,320/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त 09, दिनांक 20/06/2008 प्रमाणे जिल्हा परिषद निधीतून राबवावयाच्या योजनाचे वेळापत्रक निश्चित केले असून 31 मे पर्यंत लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करून करणे आवश्यक आहे. सदर साहित्य खरेदी प्रशाकीय व तांत्रिक मंजुरी अनुक्रमे 04/03/2013 व 08/03/2016 रोजी दिलेली आहे. तर साहित्य पुरवठा आदेश अनुक्रमे दिनांक 23/03/2016 व दिनांक 28/03/2016 रोजी दिल्याने योजनेची अंमलबजावणी समय मर्यादेत केली नाही.

4) शिलाई मशीन 102 नग बरोबर प्रति नग स्क्रू ड्रायव्हर-2, सुया-3, बॉबिन-2, तेल बुदली-1, स्टील कात्री, ड्रोवर व दोरा असे याप्रमाणे पूरक साहित्य प्राप्त झाले असून ते लाभार्थ्यांना वाटप झाल्याच्या पोच घेण्यात आलेल्या नाहीत.

5) सन 2015-16 मध्ये प्राप्त उपकर 44,88,728/- च्या 3 टक्के 1,34,662/- व मागील अनुशेष रक्कम 27,843/- अशी एकूण रक्कम रुपये 1,62,505/- अपंग कल्याण करीता खर्च करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 1,13,600/- खर्च केली आहे. सबब कमी खर्च रक्कम 48,905/- इतकी आहे.

### 4.414 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अनुदान वाटप.

**पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती आजरा यांचेकडील सन 2015-16 या लेखापरीक्षण कालावधी मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेअंतर्गत पंचायत समितीस प्राप्त निधीचे वाटप व कामाची प्रगतीबाबत तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक कोजिप/सकवि/वशी-दवसू/प्रमा/206, दिनांक 31/03/2016 अन्वये सदर योजनेअंतर्गत आजरा गटास 42.00 लाख इतका निधी मंजूर झाला असून प्रमाणक क्रमांक 542, दिनांक 31/03/2016 अन्वये कामाच्या 60 टक्के रक्कम रुपये 25,20,000/- ग्रामपंचायातीना वितरीत केली आहे.

कामाचे मंजुरी आदेश प्रमाणे सदर कामे एक वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक असून आर्दाळ व कार्पेवाडी ग्रामपंचायतीने कामे पूर्ण केली असल्याचे कामपूर्ण दाखले पंचायत समितीस सादर केले आहेत मेंढोली व सरंबळवाडी ग्रामपंचायतीची कामे सुरु आहेत. उर्वरित 07 कामाच्या ई-निविदा अद्याप ग्रामपंचायतीनी 09 महिने पूर्ण होऊनही प्रसिद्ध केलेल्या नाहीत. कामाच्या निविदा प्रसिद्धी करून कामे वेळेवर सुरवात न केल्याने शासन निधीची रक्कम रुपये 19,20,000/- नाहक अडकून पडली आहे.

2) त्याचप्रमाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक कोजिप/सकवि/वशी-दवसू/प्रमा/248, दिनांक 31/03/2015 अन्वये सदर योजनेअंतर्गत आजरा गटास रुपये 28,42,000/- इतका निधी मंजूर झाला असून प्रमाणक क्रमांक 19, दिनांक 03/07/2015 अन्वये कामाच्या 90 टक्के रक्कम रुपये 25,56,000/- ग्रामपंचायातीना वितरीत केली असून उर्वरित 10 टक्के रक्कम संकीर्ण ठेव सदरी ठेवली आहे.

उत्तूर व कोर्लींद्रे येथील कामाची मुदत पूर्ण होऊनही काम पूर्ण झाल्याचे दाखले पंचायत समितीस सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदर ग्रामपंचायतीना मंजूर शासन अनुदानाची रक्कम रुपये 12.00 लाख व 3.00 लाख प्रमाणे रक्कम रुपये 15,00,000/- नाहक गुंतून पडली आहे. मंजूर अनुदानापेक्षा रक्कम कमी खर्च झाल्याने अखर्चित रक्कम शासनास परत करणे आवश्यक आहे.

**4.415 उपकर निधीतून मागासवर्गीयांना शिलाई मशिनचे वाटपाबाबत.**

**पंचायत समिती राधानगरी, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती राधानगरीचे सन 2015-16 चे लेखापरिक्षणाचेवेळी उपकर निधीतून 20 टक्के समाजकल्याण अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन वाटप करणेसाठी पुरवठा आदेश क्रमांक पंसरा/सक/वशि/959/2016, दिनांक 29/03/2016 ने 176 नग पुरविणेकामी साद एंटरप्रायजेस यांना प्रकरण क्रमांक 18, दिनांक 31/03/2016 ने रुपये 7,88,832/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. याबाबत खरेदी नस्ती लाभार्थीचे प्रस्ताव वाटप यांची पडताळणी करता पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- झेडपीए/प्र.क्र.446/वित्त 6, दिनांक 20/06/2008 मधील सूचनेप्रमाणे योजना ही राबविण्यात आलेली नाही. उदा. योजनेची निवड, प्रस्ताव तयार करणे, सभेची मान्यता, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, लाभार्थिचे अर्ज मागविणे, छाननी निविदा प्रक्रिया, पुरवठा आदेश, वाटप इत्यादि.

2) सदर योजनेअंतर्गत पुरविण्यात अगर खरेदी करण्यात आलेल्या शिवण मशिनची निवड करणेपुर्वी लाभार्थीची मागणी /आवश्यकता तसेच समाजकल्याण विभागाने आढावा घेतलेचे दिसुन येत नाही

3) शिलाई मशिन खरेदीस मासिक सभा क्रमांक 41, दिनांक 04/11/2015 ने मान्यता दिले नंतर देण्यात तांत्रिक मान्यतेच्या आदेशावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

4) शिलाई मशिनचा शासन दरकरार नसलेबाबत अथवा महाराष्ट्र स्टेट को ऑप फेडरेशनचा दरकरार नसलेबाबत पत्रव्यवहाराची कागदपत्रे नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परित्रक क्रमांक परासं/1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 अन्वये दिलेल्या सूचनेनुसार लाभार्थीची निवड करण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1093/प्र.क.1239/34, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद 4 नुसार लाभार्थीची पंचायत समिती व गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

7) निवडलेल्या लाभार्थीचे अर्जाची पडताळणी करता त्रुटी आढळून आल्या आहेत.

8) सदर योजनेअंतर्गत शिवणयंत्राचे वाटप दिनांक 23/05/2013 ते 09/11/2016 या कालावधीत केल्याने योजनेचा हेतु सफल झालेला नाही.

9) सदर योजनेअंतर्गत प्राप्त व वाटप करण्यात आलेबाबत साठा नोंदवहीतील पान क्रमांक 4 ते 20 वर नोंदी घेण्यात आलेल्या असून लेखापरिक्षण कालावधीअखेर 176 शिवण मशिन पैकी 145 चे वाटप करण्यात आले असुन 31 शिलाई मशिन वाटप करण्यात आली नाहीत. ती शिल्लक असुन रक्कम रुपये 1,38,942/- गुंतुन पडली आहे.

**4.416 20 टक्के राखीव उपकर निधीतून मागास लाभार्थीना शिलाई मशिन पुरवणेबाबत.**

**पंचायत समिती गगनबावडा, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती गगनबावडाकडील सन 2015-16 मध्ये पंचायत समिती उपकर निधीच्या 20 टक्के मागास राखीव निधी व 3 टक्के अपंग निधी समाज कल्याण विभागामार्फत मागास लाभार्थीना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशिन पुरवणेकरिता नोंदणीकृत संस्थेकडून पंचायत समिती करवीरने संयुक्तिक (सक व मबाक) ई-टेंडर पद्धतीने दर मागवून कमी दराची निविदा स्वीकरण्यात आलेली आहे. त्याच दराने पुरवठादार मे. साद एन्टरप्रायझेस, देवरुख यांच्याकडून खरेदी केलेली आहे. सदर बाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 1,66,500/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये परिशिष्ठ “ड” नुसार जिल्हा परिषदेकडील वैयक्तिक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी वेळापत्रकानुसार योजनेची तरतूद मे 13 पूर्वी करणे, समित्यांची मंजूरी जून 30 पूर्वी घेणे, तांत्रिक

मंजूरी 31/08/2015 पूर्वी घेणे, प्रस्ताव छाननी 31 जुलै अखेर करणे, साहित्य पुरवठा आदेश 30 नोव्हेंबरपूर्वी देणे व लाभार्थी साहित्य वाटप 31/01/2016 अखेर करणे आणि विनियोग दाखले मार्च 2016 अखेर घेऊन योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करणे असे असतांना तशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार सदर योजनेचा लाभ दिल्यानंतर लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या सुधारणा झाल्याबाबत अहवाल घेतलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/34/67, दिनांक 01/09/1993 नुसार गावनिहाय, कुटूंबनिहाय / लाभार्थी निहाय व प्रवर्गनिहाय तालुका स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर नोंदवही ठेवून लाभार्थ्यांला लाभ दिल्यानंतर जो लाभ दिला त्या लाभाची त्या नोंदवहीमध्ये नोंदी घेणेत आलेल्या नाहीत. एकाच कुटूंबात दूबार लाभ दिला जाणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. अशाप्रकारची नोंदवही पंचायत समिती स्तरांवर ठेवण्यात आलेली नाही.

4) पुरवठा आदेश जावक क्रमांक पसग/सक/वशी/पु.आ./2016, दिनांक 28/03/2016 मधील अट क्रमांक 3 प्रमाणे लाभार्थींना शिलाई मशिन चालवणेचे प्राथमिक प्रशिक्षण देण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची आहे. तसे लाभार्थीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केलेले नाही.

5) पुरवठा आदेश जावक क्रमांक पसग/सक/वशी/पु.आ./2016, दिनांक 28/03/2016 मधील अट क्रमांक 10 प्रमाणे एकूण देयकाची रक्कम रुपये 1,66,500/- च्या 5 टक्के सुरक्षित ठेव रुपये 8,325/- कपात केलेली नाही.

6) पंचायत समिती गगनबावडाने निवड केलेले प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे लाभार्थीचे दाखल्यांची उणीवा दिसून आल्या त्या खालीप्रमाणे

अ) लाभार्थी प्रस्तावाची छाननी करून गटविकास अधिकारी यांनी सही व शिक्क्याने प्रामाणित करणे आवश्यक आहे. ते केलेले नाही.

ब) साहित्य वाटप नोंदवही तपासले असता लेखापरीक्षण अखेर 7 नग शिलाई मशिन वाटप झालेली नाही. त्याची रक्कम रुपये 31,500/- नाहक गुंतून पडलेली आहे.

क) योजनेतील निवडलेल्या लाभार्थीचा मान्यता प्राप्त संस्थेकडून शिलाई मशिन प्रशिक्षण घेतलेले प्रमाणपत्र नसून खाजगी टेलरचे प्रमाणपत्र आहे.

**4.417 ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन पुरवठा करणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांचेकडील सन 2015-2016 या लेखापरीक्षण कालावधीत पंचायत समिती उपकर निधी मधून समाजकल्याण विभागातंर्गत तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन पुरवठा करणेकरीता प्रमाणक क्रमांक 9, दिनांक 28/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,39,400/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबवितांना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना नमूद केलेल्या असून त्यासोबत परिशिष्ठ क्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थ्यांची निवड तसेच जुलै अखेर होणे आवश्यक आहे. तसेच 30 नोव्हेंबर अखेर साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश देऊन साहित्य वाटप जानेवारी अखेर पूर्ण करुन पुरवठादाराचे देयक माहे फेब्रुवारी मध्ये अदा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करता आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-1088/सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता पंचायत समितीने सदर साहित्याचे वाटप पुढील आर्थिक वर्ष सन 2016 - 2017 मध्ये दिनांक 01/04/2016 ते 29/06/2016 या कालावधी अखेर करण्यात आलेले आहे. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये साहित्याचे वाटप न केल्याने सदर आर्थिक वर्षामध्ये लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ न मिळाल्याने सदर योजनेचा उददेश सफल झालेला नाही.

4) तसेच खालील नमूद केल्यानुसार ग्रामीण भागातील मागावर्गीय मुलांना पुढील आर्थिक वर्ष 2016-17 मध्ये सायकलींचे वाटप केलेले आहे. परंतु या चालू लेखापरीक्षण कालावधी अखेर एकूण 07 नग शिलाई मशिन संबंधित लाभार्थ्यांना वाटप न करता पंचायत समिती स्तरावर शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. शिल्लक साहित्यापोटी रक्कम रुपये 26,600/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम आज अखेरचे व्याजासह वसुल करुन पंचायत समिती उपकर निधीमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

5) सर्व लाभार्थ्यांच्या मागणी प्रस्तावावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी प्रस्तावास मंजूरी नसताना संबंधीत लाभार्थ्यांना शिलाई मशीनचे कशाचे आधारे वाटप करण्यात आले.

6) पुरवठा झालेल्या शिलाई मशिनी हया आयएसआय मार्कच्या असल्याबाबत व सदरच्या मशिन्स पुरवठा आदेशाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर संबंधित सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.418 पंचायत समिती सेसमधून ग्रामीण भागातील महिलांना वाटप करण्यात शिलाई मशिन योजनेतील त्रुटींबाबत.**

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समती अक्कलकोट समाजकल्याण विभागामार्फत पंचायत समिती सेसमधून सन 2015-16 मध्ये 112 शिलाई मशीनचे वाटप करण्यात आलेले आहेत. सदर शिलाई मशिन खरेदी व वाटप प्रक्रियेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मे. सूत्रावे ईजिनेरेरिंग वर्क्स प्रा. लि. सोलापूर यांचेकडून खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु निविदा प्रक्रियाचे कोणतेही प्रकारचे कागदपत्रे लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाही.

2) पुरवठा आदेश अट क्रमांक 8 नुसार सदर शिलाई मशीन तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय /शासकीय तंत्रनिकेतन संस्थेकडून तपासणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक असताना तपासणी अहवाल लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही.

3) पंचायत समीती ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

4) शिलाई मशिन पुरवठा चलनावर (चलन क्रमांक 40, दिनांक 31/03/2016) साहित्य मिळालेबाबत दिनांकीत स्वाक्षरी नाही. त्यामुळे साहित्य विहीत कालावधीत प्राप्त झालेबाबत खात्री करता आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट ब प्रमाणे वैयक्तीक लाभाच्या योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. साठ नोंद वही पान नंबर 150 वर एकूण 112 मशीन प्राप्त झाले आहेत.

6) सदर प्रस्तावांसोबत जोडण्यात आलेल्या शिलाई कामाचे प्रशिक्षण / अनुभवाबाबत जोडण्यात आलेली प्रमाणपत्रे ही प्रमाणीत केलेली नाहीत , त्यामुळे त्याच्या सत्यतेबाबत खात्री करता आलेली नाही.

7) सदरबाबतचे प्रस्ताव तपासले असता त्रुटी आढळून आलेल्या आहेत. (उदा. गटविकास अधिकारी यांचे शिफारस नाही, शाळा सोडल्याचा दाखला नाही, मागणी अर्ज जोडलेला नाही, तलाठी उत्पन्न दाखला जोडलेला नाही, प्रतिज्ञापत्र जोडण्यात आलेले नाही, ग्रामसेवक यांचा शौचालय दाखला जोडलेला नाही, आधार कार्ड जोडलेला नाही इ.)

**4.419 समाजकल्याण विभागांस जिल्हा परिषद सेस योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याबाबत.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती सांगोला कडील सन 2015-2016 चे लेखापरीक्षणावेळी समाजकल्याण विभागास जिल्हा परिषद सेस योजनाअंतर्गत प्राप्त झालेल्या साहित्याची साठा नोंदवही नमुना नंबर 13 ची तपासणी केली असता साहित्य वाटप न केल्याने शिल्लक राहील्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनासाठी प्रभावी अमंलबजावणी व नियोजन विशिष्ट मुदतीत होण्यासाठी दिलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यवाही करणेबाबत सुचित केले असतांनाही त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. साहीत्य वाटप 30 नोव्हेबर पुर्वी करणे आवश्यक असतांना साहित्य प्राप्त मार्च, 2016 व वाटप पुढील आर्थिक वर्षात झालेले आहे. सदर अनियमिततेबाबत खुलासा सादर करावा.

2) सदर साहित्य प्राप्त झालेबाबत डिलीव्हरी चलन नस्तीसोबत नसल्याने साहित्य वेळेत प्राप्त झाले किंवा कसे याबाबत तपासणी करता आली नाही. तसेच पुरवठा आदेशाची प्रत नसल्याने किती साहित्याचा पुरवठा आदेश दिला होता तसेच साहित्याचे वर्णन, स्पेसिफिकेशन, पुरवठा करणेचा कालावधी इत्यादीबाबत तपासणी करता आली नाही.

3) साठा नोंदवही मध्ये पान नंबर 186 अनुक्रमांक 16 वर श्रीमती सारीका आण्णासो गडहिरे, वाणीचिंचोळे यांना शिलाई मशीन दिलेबाबत पोहोच / स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

4) समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचे पुरवठा आदेश क्रमांक 235, दिनांक 23/11/2015 नुसार पंचायत समिती सांगोला यांना झेरॉक्स मशीन पुरविणेबाबतचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. परंतु पंचायत सांगोला यांचे साठा नोंदवही मध्ये झेरॉक्स मशीन 8 नग दिनांक 06/01/2016 रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणजेच विलंबाने पुरवठा झालेला आहे. तरी पुरवठादारावर दंडात्मक कार्यवाही केली किंवा कसे याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

5) अपंग पल्वराझर (महिला) मशीन महिला लाभार्थीना वाटप करणे आवश्यक असताना 3 पुरुष लाभार्थींना वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच श्रीमती उषा गोपाळ गावडे, तरंगेवाडी यांचे लाभार्थी मंजूर यादीत नाव नसताना साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. तरी पुरुष लाभार्थीचे व यादीत नाव नसलेले लाभार्थीची रक्कम रुपये 47,980/- (प्रती नग रुपये 11,995 x 4 = 47,980/-) वसूल करुन जिल्हा परिषद सेस मध्ये भरणा केलेबाबतची कागदोपत्री पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

6) साठा नोंदवही नमुना नंबर 13 मध्ये पान नंबर 51 अनुक्रमांक 16/38 लक्ष्मी ज्ञानेश्वर कांबळे, महुद बु यांना गॅससंच दिलेबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. व सदर लाभर्थीचे विहित नमुन्यातील प्रस्ताव घेण्यात आलेला नाही. तसचे गॅससंच एकूण 82 नग कधी प्राप्त झाले याबाबत पुरवठा आदेशासह नोंद घेण्यात आलेली नाही.

7) साठा नोंदवहीमध्ये श्री समाधान लक्ष्मण बंडगर, रा. अनकढाळ यांना पाच एच.पी.विदयुत मोटार दिनांक 20/10/2016 रोजी दिल्याचे दिसून येते, परंतु सदर लाभार्थीचे मंजूर यादीमध्ये नाव दिसून येत नाही

8) सन 2015-2016 मध्ये जिल्हा परिषद सेस योजनाअंतर्गत प्राप्त साहित्यापैकी 70 टक्के साहित्य विनावाटप पडुन असल्याचे दिसुन आले. सदर साहित्य त्वरीत वाटप न केल्याने सदर साहित्याचे खरेदीपोटी जिल्हा परिषदेची विनाकारण रक्कम गुंतुन पडली आहे. तसेच साहित्य त्वरीत वाटप न केल्याने खराब व नादुरुस्त होऊन निरुपयोगी होण्याची शक्यता आहे.

**4.420 ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलाना संसार उपयोगी भांडी खरेदी पुरवठाकरणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती माढा-कुर्डूवाडी, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती कुर्डूवाडी यांचेकडील सन 2015-2016 या लेखापरीक्षण कालावधीत पंचायत समिती उपकर निधी मधून समाजकल्याण विभागातंर्गत तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना संसार उपयोगी भांडी खरेदी

योजनेतील प्रमाणक क्रमांक 27, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,60,406/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविताना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समितीने राबविलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना नमूद केलेल्या असून त्यासोबत परिशिष्ठ क्रमांक 3 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनांमधील लाभार्थ्यांची निवड तसेच जुलै अखेर होणे आवश्यक आहे. तसेच 30 नोव्हेंबर अखेर साहित्य खरेदी कामी पुरवठा आदेश देऊन साहित्य वाटप जानेवारी अखेर पूर्ण करुन पुरवठादाराचे देयक माहे फेब्रुवारी मध्ये अदा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

2) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे एकाच कुंटूंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करता आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर-1088/सीआर-786/30, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता पंचायत समितीने सदर साहित्याचे वाटप पुढील आर्थिक वर्ष सन 2016-2017 मध्ये दिनांक 01/04/2016 ते 02/06/2016 या कालावधी अखेर करण्यात आलेले आहे. म्हणजेच सन 2015-2016 मध्ये साहित्याचे वाटप न केल्याने सदर आर्थिक वर्षामध्ये लाभार्थ्याना सदर योजनेचा लाभ न मिळाल्याने सदर योजनेचा उददेश सफल झालेला नाही.

4) तसेच खालील नमूद केल्यानुसार ग्रामीण भागातील मागावर्गीय महिलांना पुढील आर्थिक वर्ष 2016-17 मध्ये संसारोपयोगी भांडीचे वाटप केलेले आहे. परंतु या चालू लेखापरीक्षण कालावधी अखेर एकूण 23 नग संसारोपयोगी भांडीचे संबंधित लाभार्थ्यांना वाटप न करता पंचायत समिती स्तरावर शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. तरी शिल्लक साहित्यापोटी रक्कम रुपये 80,937/- नाहक गुंतून पडलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम आज अखेरचे व्याजासह वसुल करुन पंचायत समिती उपकर निधी मध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

5) सर्व लाभार्थ्यांच्या मागणी प्रस्तावावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तरी प्रस्तावास मंजूरी नसताना संबंधीत लाभार्थ्यांना संसारोपयोगी भांडी काय आधारे वाटप करण्यात आल्या बाबत खुलासा करुन प्रस्ताव परिपूर्ण असलेबाबतची पूर्तता दाखविणे आवश्यक आहे.

6) पुरवठा झालेल्या संसारोपयोगी भांडीसेट हे आयएसआय मार्कच्या असल्याबाबत व सदरचे संसारोपयोगी भांडी सेट पुरवठा आदेशाप्रमाणे पंचायत समिती स्तरावर संबंधित सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असता तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.421 दलित वस्ती सुधार योजना मधील अनियमितता.**

**पंचायत समिती अचलपूर, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,37,29,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/2008/प्र.क्र. 524/विघयो 1, दिनांक 14/11/2008 अन्वये प्रत्येक गावात दलितांची लोकसंख्या किती आहे. या बाबीचा विचार करुन दिलत वस्ती म्हणुन घोषित करावयाचा आहे. मात्र तशा प्रकारची नोंदवही पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आलेली नसल्याने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत झालेली कामे दलित वस्तीतच झाल्याची खात्री होत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र. 4723/वित्त-9(33), दिनांक 09/02/2009 अन्वये ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील कामे विना निविदा ग्रामपंचायतींना देता येतात. ग्रामपंचायतीकडे तांत्रिक कर्मचारी व आवश्यक यंत्रसामुग्री असल्यास ती कामे त्यांनी स्वत: करावी अन्यथा जाहिर निविदा मागवून विहीत पध्दतीनुसार

स्थानिक नोंदणीकृत व पात्र सक्षम अशा मजूर सहकारी संस्था, सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्था व स्थानिक कंत्राटदार यांचेकडुन कामे करुन घ्यावी असे निर्देश आहेत. अशा प्रकारे मनुष्यबळ व भौतिक सुविधा ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नसतांना सुध्दा सदरचे काम ग्रामपंचायतींनी केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन निदर्शनास येते.

तसेच सदर कामे करणेसाठी ग्रामपंचायतीचे उत्पन्न विहीत मर्यादेत असणे आवश्यक आहे. सदर बाबींच्या पडताळणीचे पृष्ठयर्थ नस्तीतील अभिलेख्यांची पडताळणी केली असता, संबंधीत ग्रामपंचायतीस काम वितरीत करण्यापुर्वी मागील तीन वर्षाचे जमा व खर्चाचे विहीत नमुना 3 व 4 प्राप्त केलेले नसल्याने सदरची कामे करण्यास ग्रामपंचायत पात्र असल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र व्हॅल्यु ॲडेड टॅक्स ॲक्ट 2002 (महाराष्ट्र 2005) दिनांक 01/04/2005 नुसार विक्रिकर कायदयाखाली नोंदणीकृत मक्तेदारांचे बिलातुन 2 टक्के व नोंदणी न केलेल्या मक्तेदाराचे बिलातुन 4 टक्के वर्क्स टॅक्स कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 87 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1099/प्र.क्र.59/135, दिनांक 31/01/2000 नुसार बांधकामावर साहित्य पुरवठा करण्यापुर्वी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडुन साहित्याची चाचणी करणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) सदर बांधकामाचे मोजमापे व मुल्यांकन हे सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिकेच्या परिशिष्ट 24 मधील नियम 11, व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 167, 168 मधील तरतुदीनुसार विहीत प्रमाणात तपासणी उपअभियंता (बांधकाम) व कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांच्या दर्जाच्या तांत्रिक अधिकाऱ्याने करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे तपासणी केलेली नसल्याचे लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या मोजमाप पुस्तिकेवरुन निदर्शनास येते.

6) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौख/10/1009/ प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार बांधकामासाठी वापरात येत असलेल्या गौण खनिज जसे खडी, मुरुम, रेती इत्यादी यावरील रुपये 200/- प्रती ब्रास प्रमाणे गौण खणिजाची कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. बांधकामाच्या देयकातुन गौण खणिज शुल्काची रक्कम कपात करुन योग्य शासन लेखाशिर्षात भरणा कार्यवाही केलेली नाही. अथवा गौण खणिज भरणा केल्याबाबत पावती / चलान / वाहतूक पास दर्शविली नाही. इतरही बांधकामाच्या प्रदानामध्ये अशा प्रकारची अनियमितता असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी शासन निर्देशानुसार वापरलेल्या गौणखणिजाची परिगणना करुन शुल्क शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2009/प्र.क्र.81/ पंरा-7, दिनांक 08/06/2009 अन्वये प्रत्येक कामावर स्थळ फलक शासनाने नमुद केलेल्या अनुक्रमांक 1 ते 8 मुद्दे बोर्डावर लिहून लावणे सक्तीचे आहे. त्याला अनुसरुन कामाचे ठिकाणी बोर्ड लावलेले नाहीत.

8) गिट्टी, रेती, मऊ व कठिण मुरुम, कंकर साहित्याची मोजमापे नोंदविताना सदर साहित्याचा ढिगापैकी (स्टेकस) कमीत कमी तीन ढिगांचे प्रत्यक्ष मोजमाप नोंदवून, त्यापैकी सर्वात कमी परिमाण आलेल्या ढिगांचे परिमाणाच्या प्रमाणात एकुण ढिगानुसार परिमाण नोंदविण्यात आले नाही.

9) मोजमाप पुस्तकावर सरपंच / सचिव याची स्वाक्षरी नाही.

**4.422 95 टक्के अनुदानावर अनुसुचित जातीच्या महिलांना, मुलींना पिको शिलाई मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती दर्यापुर, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,58,359/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजूर सुधारीत अंदाजपत्रकामध्ये शिलाई मशिन पुरविणे योजना ही 100 टक्केवर राबविण्याची तरतूद केलेली असतांना 95 टक्केवर राबविणेबाबत खुलासा करावा.

2) लाभार्थ्यांच्या प्राप्त अर्जांची तपासणी केली असता खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

अ) सोनल भिमराव गवई रा. माहूली जहाँगीर यांचा उत्पन्नाचा दाखला रुपये 70,000/- चा असतांना त्यांना लाभ देय नसतांना देण्यात आला.

ब) राधा जानराव वानखडे रा. इटकी तसेच पूजा महादेव वाघमारे रा. येवदा यांची ग्रामपंचायत टॅक्स भरणा केल्याची पावती अर्जासोबत आढळली नाही.

3) शिलाई मशिनच्या नोंदी साठा पंजी पान क्रमांक 167 वर 47 नग जमा दर्शविलेल्या असून पान क्रमांक 167 ते 170 वर वाटप दर्शविले आहे परंतु दिपाली गणेश खंडारे रा. गायवाडी व अर्चना प्रदिप मेश्राम रा. वरुड बु यांच्या शिलाई मशिन प्राप्त झाल्याबाबत साठा पंजीत स्वाक्ष-या आढळल्या नाहीत. त्यामुळे त्यांनाच शिलाई मशिनचे वाटप झाल्याबाबत बोध होत नाही.

4) दर करारामध्ये दिल्याप्रमाणे ऑर्डर प्राप्त झाल्यापासून सहा आठवडयाच्या आत साहित्याचा पुरवठा करण्यात येईल असे असतांना पुरवठा आदेश दिनांक 20/06/2015 असुन साहित्य दिनांक 29/09/2015 ला प्राप्त झाल्याचे दर्शविले. दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

5) दर करारातील दिलेल्या अटीनुसार थर्ड पार्टी इन्सपेक्शन करणे निकडीचे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

6) पुरवठादाराला साहित्य प्राप्त झाल्यापासुन पंधरा दिवसाच्या आत 90 टक्के रक्कम व उर्वरित 10 टक्के रक्कम तीस दिवसात प्रदान करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता सरसकट पूर्ण रक्कम प्रदान केल्याचे आढळते.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परांस/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेविषयी मुल्यमापन करून फलश्रृती विषयी अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तशा प्रकारचा अहवाल नस्तीमध्ये आढळला नाही. त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट ख-या अर्थाने पूर्ण झाले असे म्हणता येणार नाही नियमबाह्यतेबाबत खुलासा करावा.

**4.423 90 टक्के सुटीवर मागासवर्गियांना टिनपत्रे पुरविणे खर्चातील अनियमीततेबाबत.**

**पंचायत समिती आर्णी, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** प्रमाणक क्रमांक 5, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,17,645/- खर्च नोंदविला आहे. उपरोक्त प्रमाणकान्वये 14-समाजकल्याण योजनेअंतर्गत 211 नग टिनपत्रे खरेदी करण्याकरीता रुपये 1,95,880/- खर्च केल्याचे दिसुन येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांचे अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे पंचायत समितीला लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त् झाले होते किंवा नाही याची सत्यता पडताळता आली नाही.

2) लाभार्थ्यांची निवड यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे संबंधीत लाभार्थ्यांना कशाचे आधारे टिनपत्राचे वाटप करण्यांत आले याची सत्यता पडताळता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1093/2635/उदयोग-6, दिनांक 16/07/1993 अन्वये वार्षिक खरेदी रुपये 50,000/- चे वर असल्यास जास्त खपाच्या वृत्तपत्रात तसेच शासन राजपत्रात प्रसिध्दी देवुन निविदा/दरपत्रके मागविणे आवश्यक होते. परंतु दरपत्रके बोलाविण्याकरीता वृत्तपत्रात जाहिरात दिल्याचे दिसत नाही. तरी सुध्दा 3 पुरवठादारांकडुन दरपत्रके प्राप्त झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे पुरवठादारांनी सदर दरपत्रके कशाचे आधारे पाठविले याबाबत खात्री करता येत नाही. जाहिरात देवुन दरपत्रके मागविले असते तर यापेक्षा जादा दरपत्रके प्राप्त होवुन अधिक स्पर्धा झाली असती आणि यापेक्षा कमी दराचे दरपत्रके प्राप्त होवु शकले असते. परंतु अशा प्रकारची कार्यवाही करण्यांत आली नाही.

4) प्राप्त दरपत्रकांवर दिनांक नमुद नाही. त्यामुळे सदर दरपत्रके केव्हा प्राप्त झाले. याबाबतची सत्यता पडताळता येत नाही.

5) निवड झालेल्या लाभार्थ्यांकडुन 10 टक्के रक्कम वसुल करुन पंचायत समिती सेसमध्ये जमा करुन एकुण रक्कम पुरवठादाराला प्रदान करणे आवश्यक होते. परंतु 10 टक्के रक्कम रुपये 21,765/- लाभार्थ्यांकडुन वसुल केल्याचे दिसत नाही.

6) साहित्य डिलीव्हरी चलान लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. परंतु वाहतुकीबाबतच्या पावतीनुसार (वाहन क्रमांक एमएच 31 - डब्ल्यु 4933) साहित्य दिनांक 20/05/2016 ला पाठविल्याचे दिसुन येते. परंतु साठा नोंदवहीची पडताळणी केली असता साठा नोंदवहीमध्ये साहित्य दिनांक 31/03/2016 ला प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. वाहतुक पावतीनुसार साहित्य जर दिनांक 20/05/2016 ला पाठविण्यात आले असेल तर साठा नोंदवहीला त्या अगोदर म्हणजे दिनांक 31/03/2016 ला साहित्य प्राप्त झाल्याचे कसे काय दर्शविले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7) पुरवठा आदेश क्रमांक पंसआ/पंचा/वाशि/सेसयो/276, दिनांक 04/03/2016 मधील अट क्रमांक 2 नुसार पुरवठादाराने दिनांक 31/03/2016 पर्यंत साहित्य पुरवठा करणे आवश्यक आहे. अन्यथा दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. परंतु वाहतुकीच्या पावतीनुसार साहित्य दिनांक 20/05/2016 ला पाठविल्याचे दिसुन येते. त्यामुळे पुरवठादारांवर दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

8) साठा नोंदवहीची पडताळणी केली असता असे आढळुन आले की, लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 218 नग टिनापैकी फक्त 2 लाभार्थ्यांना 10 नग टिनाचे वाटप केले असुन उर्वरीत 208 नग टिनाचे वाटप होणे बाकी होते. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला आहे असे म्हणता येणार नाही. 2 लाभार्थ्यांना कोणत्या दिनांकास टिनाचे वाटप करण्यांत आले तो दिनांक साठा नोंदवहीत नमुद नाही.

9) कविश ट्रेडींग कंपनी मलकापुर, अकोला यांचे कमी दराचे म्हणजे प्रति किलो रुपये 79/- या दराचे दरपत्रक असल्यामुळे त्यांना पुरवठा आदेश देण्यांत आल्याचे दिसुन येते. दरपत्रकामध्ये नगाचे दर नमुद नसुन किलोग्रँमचे दर नमुद केलेले आहे. त्यामुळे पुरवठा आदेशामध्ये किती किलोग्रॅम कोणत्या दराने साहित्याचा पुरवठा करावयाचा आहे हे नमुद करणे आवश्यक होते. परंतु पुरवठा आदेशामध्ये प्रतिनग रुपये 1,027/- दराने 211 नग टिनाचा पुरवठा करण्याचे आदेशित केले आहे. सबब रुपये 1,027/- हा दर कशावरुन दर्शविण्यात आलेला आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

10) पुरवठा आदेशामध्ये 211 नग टिनाचा पुरवठा करण्याचे आदेशित केले आहे. परंतु साठा नोंदवहीनुसार 218 नग टिन प्राप्त झाल्याचे दिसुन येते. म्हणजेच 211 नग टिनाची गरज असतांना 218 नग टिन का खरेदी करण्यांत आले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.424 समाजकल्याण विभाग अंतर्गत 90 टक्के अनुदान तत्वावर पावर स्प्रे-पंप खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,19,388/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्रक्रं/78/05, दिनांक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात लाभार्थी निवड व साहित्य खरेदी केले. त्याच वर्षात शेतकऱ्यांना साहित्य वाटप केले पाहीजे. सन 2014-2015 वर्षात दिनांक 31/07/2014 रोजी साहित्य प्राप्त झाले आहे व साहित्य वाटप सन 2015-2016 वर्षात एक वर्षानंतर नियमबाहयपणे उशीरा वाटप केले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक मागास/200/नक्रं-78/34, दिनांक 20/04/2001 अन्वये लाभार्थी गावनिहाय निवडीस पंचायत समितीची मान्यता घेणे आवश्यक असतांना व त्यानुसार लाभार्थीना वाटप करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1098/प्र.क्र.34, दिनांक 05/10/1989 अन्वये लाभार्थीचे गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 44 (1) नुसार एका वर्षावरील बिलास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांची परवानगी घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. त्यामुळे दुबार बिल प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) अर्धसमासपत्र क्रमांक 10, दिनांक 03/10/2016 नुसार पत्र देवुनही योजनेचे मंजुर लाभार्थी यादी, गुणवत्ता चाचणी अहवाल मास्टर नोंदवही, उपयोगिता प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक अभिलेख्याची मागणी करुनही सदर अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत. ही गंभीर स्वरुपाची बाब असुन त्यामुळे योजना खरोखर राबविली गेली किंवा कसे याबाबत खात्री होऊ शकली नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्रक्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता 2013-2014 व 2014-2015 मध्ये प्राप्त असतांना सन 2014-2015 वर्षात साहित्य साठा प्राप्त असतांना सदर योजनेचे साहित्य वाटप हे उशीरा वाटप केल्याने शासन आदेशाचा भंग करुन सदर योजना राबविण्यात आल्याचे दिसुन येते.

7) दरकरारानुसार दिलेले स्पेशिफीकेशन प्रमाणे स्प्रेपंप प्राप्त झाल्याचे प्रमाणकावर कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी आढळली नाही.

8) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्रक्रं.4871/वित्त-3, दिनांक 25/06/2014 नुसार सन 2011-2012 पासुन 2015-2016 पर्यंत 3 टक्के अपंग अनुशेष तरतुद करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

9) शासन निर्णय क्रमांक 1093/सीआर/24, दिनांक 09/12/2013 नुसार 30 टक्के महीला लाभार्थीची निवड करुन लाभ देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096/प्रक्रं/78/05, दिनांक 09/10/1997 नुसार विनियोजन प्रमाणपत्र तसेच सक्षम अधिकारी यांचेकडुन फलश्रुती अहवाल घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**4.425 100 टक्के अनुदानावर सायकल पुरविणे योजनेतील अनियमीतता.**

**पंचायत समिती रामटेक, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,55,386/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती समाज कल्याण विभागाने 100 टक्के अनुदानावर पंचायत समिती सेस योजनाअंतर्गत 20 इंची लेडीज व जेन्टस सायकल 45 नग सर्व करासह रूपये 3,453/- प्रमाणे शासन दरकरारानुसार खरेदी करून शोधन केल्याबाबत खर्च नोंदविला आहे.

1) पुरवठा आदेशात ग्रामीण भागातील 2 कि.मी. अंतरावरील 5 ते 12 वी पर्यंत शिकत असलेल्या मुले / मुलींकरीता योजना असुन 2 किमीचे आंत अंतर असतांना ज्या गावचे विद्यार्थी त्याच गावातच शिकत असतांना नियमबाहय 7 विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे.

नियमबाहय वाटप केलेल्या 7 सायकलीची प्रती 3,453/- प्रमाणे रक्कम रूपये 24,171/- संबंधीताकडून वसुल करून निधीस जमा करावी.

2) पुरवठा आदेशात ग्रामीण भागातील 5 ते 12 वी शिकणा-या 2 कि.मी. अंतरावरील मुला / मुलींकरिता योजना असतांना वर्ग 2 रीत शिकत असलेल्या लाभार्थ्यास लाभ दिलेला आहे. (1) तुषार पारसनाथ वरकडे रा. करवाही बोनाफाईट सर्टीफिकेट दिनांक 19/05/2016 ची असुन प्राथमिक शाळा करवाही येथे वर्ग 2 रीत आहे. अंतराबाबत उल्लेख नाही. वरील नियमबाहय वाटप केलेली सायकलीची किंमत रूपये 3453/- संबंधीताकडून वसुलपात्र ठरते.

3) साहित्याचे वाटपा बाबत मास्टर नोंदवही ठेवण्यांत आली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिल्याबाबत खात्री होत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास/1096 प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहीत्य खरेदी करण्यात आले आहे. त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक आहे. परंतु लेखापरीक्षण कालावधी पर्यंत 31 नग सायकलीचे वाटप केले असुन 14 नग सायकल शिल्लक आहे.

5) सायकल वाटप रजिस्टर मध्ये लाभार्थ्यांना कोणत्या सायकलीचे वाटप करण्यात आले. याबाबतचे साठापुस्तकात सायकलचा चेसीज क्रमांक टाकलेला नाही. त्यामुळे कोणत्या लाभार्थ्यांना कोणती सायकल देण्यात आली याची तपासणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक असतांना तसे करण्यात न आल्याने योजनेचा उद्देश सफल झाले असे म्हणता येत नाही.

**4.426 नियमबाह्य योजना राबविल्याबाबत.**

**पंचायत समिती कामठी, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3,4,5) -** 90 टक्के सुटीवर मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे, 90 टक्के सुटीवर मागासवर्गीय शाळकरी मुला / मुलींना सायकल पुरविणे व 100 टक्के सुटीवर अपंगांना 3 चाकी सायकल पुरविणे योजनांतर्गत एकूण रक्कम रुपये 2,19,293/- चा खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र./14/38, दिनांक 09/02/2001 अन्वये योजनेची अंमलबजावणी परिणामकारक होण्यासाठी अर्जाची छाननी करून लाभार्थी निवड खरेदी पूर्वी लाभार्थीच्या आवश्यकतेचा व पुरेसा वेळ देऊन निवड करणे, व लाभार्थीकडून सादर कागदपत्रे तपासून निवड करणेबाबत निर्देश असतांना लेखापरिक्षणवेळी लाभार्थीचे अर्ज व निवड्बाबत कोणताही दस्ताऐवज सादर केलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार विशिष्ट मुदतीत योजना राबविण्याबाबत निर्देश असतांना विशिष्ट मुदतीत योजना राबविण्यात आली नसल्याने शासन निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र./14/38, दिनांक 09/02/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसूल करून योजना राबविणेबाबत निर्देश असतांना, लाभार्थी हिस्सा वसूल न करता योजना राबविल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाले आहे. (परिच्छेद क्रमांक 3 व 4).

4) साठापुस्तक तपासले असता सौ. मीना मेश्राम यांना दिनांक 05/08/2016 रोजी 1 नग मशीन वाटप केल्याचे दर्शविले परंतु वरील आक्षेप क्रमांक 1 नुसार लाभार्थी अर्ज व निवडबाबत कोणताही दस्ताऐवज नसल्याने नियमबाह्य मशीन वाटप केल्याचे दिसून येते. (परिच्छेद क्रमांक 3)

5) लेखापरीक्षण वेळेपर्यंत साहित्याचे वाटप न केल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्रक्र/5013/38, दिनांक 30/03/2000 नुसार आर्थिक वर्षाच्या अखेरीस साहित्य खरेदी न करणेबाबत निर्देश असतांना वरीलप्रमाणे साहित्य खरेदी केल्याने शासन निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

6) योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवाल नस्तीबध्द नाही - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रुती अहवाल सादर करणेबाबत निर्देश असतांना, फलश्रुती अहवाल नस्तीबध्द नाही.

7) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखसं-2014/प्र.क्र.82/भान-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 चे (5) अन्वये खरेदी समिती गठीत करण्यात आली नाही. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2015/प्रक्र/28/2015/विनिमय, दिनांक 25/06/2015 अन्वये निविदा मधील न्यूनतम दराच्या निविदांचे दर बाजार भावाशी पडताळून ते योग्य असल्याचे खरेदी समितीने प्रमाणित करणे बाबत निर्देश असतांना त्या प्रमाणेकार्यवाही न केल्याने शासन निर्देशांचे उल्लंघन झाले आहे.

8) मे. रामदेव केमिकल्स कामठी यांचे बिल तपासले असता बिलात सदर पुरवठादार हे कलर, केमिकल्स व जनरल गुड्स सप्लायर्स आहेत असे स्पष्ट नमूद असतांना त्यांचेकडून पिको फॉल मशीन व सायकल खरेदीबाबत दरपत्रके कोणत्या आधारे स्वीकृत केली याबाबत कोणताही खुलासा नस्तीबद्ध नाही.

9) पुरवठादारासोबत करारनामा करण्यात न आल्याने मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 चे उल्लंघन झाले आहे.

**4.427 मौजा खैरगांव वार्ड क्रमांक 1 सिमेंट रस्ता बांधकामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती नरखेड, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोजमाप पुस्तकात काम पूर्णत्वाची नोंद घेतलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे वरील दिनांक 26/02/2015 च्या आदेशामधील अट क्रमांक 12 नुसार काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 21/12/2000 नुसार काम पूर्ण झाल्यावर काम पूर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे.

2) अंदाजपत्रकातील तपशिलानुसार काम करण्यात आलेले नाही. बाब क्रमांक 3, 5 व 6 नुसारच काम करण्यात आलेले आहे. बाब क्रमांक 1, 2 व 4 नुसार काम करण्यात आलेले दिसत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 153 नुसार मंजूर अंदाजपत्रकातील बाब तथा तपशिलानुसारच कंत्राटदाराला काम करणे बंधनकारक आहे. याबाबत पंचायत समिती, नरखेड यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

3) पंचायत समितीने कंत्राटदाराला बांधकामाचा कार्यारंभ आदेश दिलेला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-09, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट "क" नुसार कंत्राटदाराला 15 सप्टेंबर पर्यंत कामाचे कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.

4) बांधकामाचे देयकातून स्वामित्वधन कपात केलेले नाही. सिमेंट रस्ता बांधकामात 58.30 घन मीटर गौण खनिज वापरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सीएसआर 2014-2015 नुसार रूपये 70.67 प्रति घन मीटर दराने रूपये 4,120/- एवढे स्वामित्वधन कपात करणे आवश्यक आहे.

5) मुल्यवर्धीत कर 5 टक्के कपात करण्यात आलेला नाही. फक्त 2 टक्केच कपात करण्यात आलेला आहे. उर्वरीत 3 टक्के रूपये 15,000/- एवढा मुल्यवर्धीत कर वसुल करून शासन खात्यात जमा करावा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती-2, दिनांक 03/03/2006 नुसार मुल्यवर्धीत कर अधिनियमाखाली नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के मुल्यवर्धीत कर वसुल करणे आवश्यक आहे.

**4.428 90 टक्के अनुदानावर मुलींना सायकल पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 71,477/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवडीबाबत - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/प्र.क्र./14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थीची निवड न करता व सभेची निवडबाबत मंजुरी न घेता पुरवठा आदेश दिल्याने शासन परिपत्रकाचे उल्लंघन झालेले आहे.

2) लाभार्थी हिस्सा वसुल न करणे - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र./14/38, दिनांक 09/02/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करुन, साहित्य खरेदी करणेबाबत निर्देश असतांना वरीलप्रमाणे लाभार्थी हिस्सा वसुल न केल्याने शासन परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे.

3) विशिष्ट मुदतीत योजना न राबविणे - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिशिष्ट ई नुसार विशिष्ट मुदतीत योजना राबविण्याबाबत निर्देश असतांना विशिष्ट मुदतीत योजना राबविण्यात आली नाही.

4) लाभार्थी नोंदवही - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/73/34, दिनांक 20/10/1999 चे परिच्छेद क्रमांक 4 चे विवरणपत्र अ नुसार लाभार्थी नोंदवही ठेवण्यात आली किंवा कसे याबाबत नोंदवही सादर न केल्याने नोंदवहीची तपासणी करता आली नाही.

5) साहित्य तपासणी व प्रमाणपत्राबाबत - खरेदी साहित्याचे बिल तपासले असता, बिलावर चांगल्या प्रतीचे साहित्य प्राप्त झाल्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखांसहिता 1968 चे नियम 87 नुसार प्रमाणपत्र नाही. तसेच सायकलचे चेसीस क्रमांक नमुद नसल्याने प्रत्यक्षात पुरवठा आदेशानुसार दिनांक 31/03/2016 पुर्वी साहित्य प्राप्त झाले असे म्हणता येत नाही, तरी करारनामा अट नुसार प्रति दिवस रुपये 100/- प्रमाणे दंड आकारणी करणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये खरेदी साहित्याची गुणवत्ता तपासणी, साहित्याची किंमत बाजार भावापेक्षा जास्त नसल्याची खात्री करणे यंत्र सामुग्री / साहित्य व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करावी व संबंधीत कार्यालयाकडून तपासणी करणेबाबत निर्देश असतांना वरील परिपत्रकाप्रमाणे कोणताही अहवाल नस्तीबध्द नसल्याने, शासन परिपत्रकाचे उल्लंघन झाले.

6) साठा पुस्तक - लेखापरीक्षणाचे वेळी साठा पुस्तक सादर न केल्याने साहित्याचे वाटप तपासता आले नाही.

7) योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवाल - महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन करुन फलश्रुती अहवाल सादर करणेबाबत निर्देश असतांना, फलश्रुती अहवाल नस्तीबध्द नाही.

**4.429 निलडोह येथिल वार्ड क्र. 2 अमरनगर मध्ये सिमेंट रस्ता बांधकाम खर्चाबाबत.**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) चूकीचे मोजमाप मुल्यांकणाबाबत - सदर कामाचे प्राकलनामध्ये स्थळ नमुद नाही. प्राकलनीय बाब क्र. 1 नूसार जमिनीत खोदकाम 132.50 मिटर लांब करणे बाब क्र. 2 नूसार 80 एम. एम. गिटटी भराई करणे व त्यानंतर कांक्रेटिंग करणे प्रस्तावित होते. परंतु मोजमाप मुल्यांकणानूसार प्रत्यक्षात खोदकाम न करता 80 एम. एम. गिटटी भराई केल्यानंतर कांक्रेटिंग केलेले आहे. प्राकलनानूसार खोदकामाची आवश्यकता असतांना व ते न करता सरळ गिट्टी भराई करून कांक्रेटिंग केलेले आहे. 80 एम. एम. गिटटीचे जादा मोजमाप मुल्यांकण रूपये 1,30,740/- वसुलपात्र आहे.

तसेच मोजमाप मुल्यांकणानूसार प्रत्यक्षात रस्त्याचे कामाकरीता 80 एम.एम.गिट्टी भराई 119 मिटर लांब व 4.50 मिटर रूंद केलेली आहे. परंतु कांक्रेटिंग फक्त 3.10 मिटर रूंदीचेच तयार केलेले असल्यामुळे गिट्टी भराई 4.50 मिटर रूंद मान्य कराता येणार नाही. जादा 80 एम.एम. गिट्टी भराईचे जादा मोजमाप मुल्यांकण रूपये 40,675/- वसुलपात्र आहे.

2) सदर कामासाठी एकूण 308.37 क्यु.मिटर गौण खनिजाचा वापर केल्यामुळे प्रति क्यु.मिटर रुपये 141.35 प्रमाणे देयकातून रूपये 43,588/- कपात करणे आवश्यक होते. परंतु कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे नूकसान झालेले आहे. सबब रूपये 43,588/- वसुलपात्र आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन परीपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये कामाचे मुल्याचे 1 टक्का कामगार उपकर रूपये 5,000/- वसुली करणे आवश्यक असतांना केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय, मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सुरु करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट साहित्य-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नूसार सिमेंट, खडी व रेती याचा वापर करणेपूर्वी शासकीय गुणनियंत्रण प्रयोग शाळेतून गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/10/2000 अन्वये बांधकामाची मोजमापे नोंदविल्यावर तांत्रिक अधिका-यांनी दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.430 90 टक्के अनुदानावर मुलींना सायकल पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,56,625/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 4 खालील परिशिष्ठ 2 मध्ये महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.-680/वित्त-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 19/03/2012 अन्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान करणेबाबत अधिकारात सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाचे भाग 2 व 4 मध्ये गटविकास अधिकारी यांना कामे व विकास योजना यांच्या संबंधातील रुपये 5,00,000/- पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि सदर योजना रुपये 8,88,888/- ची असल्याने प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी उपरोक्त नमुद शासन निर्णयाप्रमाणे सभापती, पंचायत समिती यांची घेणे आवश्यक होते.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, दिनांक 30/10/2015 नुसार खरेदी किंमत रुपये 3,00,000/- पेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रक्रीया राबविणे आवश्यक आहे. पंचायत समितीने सायकल खरेदी करीता समाजकल्याण विभागाने सायकल खरेदी करीता निवडलेले पुरवठाधारकाची निवड करण्यात आली. लेखापरीक्षणास सादर केलेले अभिलेखेनुसार समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात आलेल्या निविदे प्रक्रीयेत सायकलचा पुरवठा जिल्हातील सर्व पंचायत समितीस करावयाचा होता. पंचायत समितीस आवश्यक असलेले साईकलचा पुरवठा पुरवठाधारकास पंचायत समिती स्तरवार पुरवठाधारकास करावयाचा होता. पंचायत समितीने ई-निविदा प्रक्रीया राबविल्यास कमी दराची निविदा प्राप्त होऊ शकली असती. पंचायत समिती स्तरावरुन ई-निविदा प्रक्रीया न राबविता रुपये 6,65,175/- किंमतीचे सायकली खरेदी करण्यात आलेली आहे.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए-3008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 तसेच शासन निर्णय दिनांक 17/01/2001 अन्वये जिल्हा परिषदेकडील वैयक्तीक लाभाच्या योजना राबवितांना सदर वेळापत्रकाचे पालन करण्यात येत नसल्याचे दिसून येते.

4) अर्धसमासपत्र क्रमांक 5, दिनांक 06/08/2016 अन्वेय लाभार्थी यादी मागणी करुनही सदर लाभार्थी निवड यादी लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास 1084/सीआर-16357, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करु नये, असे असतांना सर्व लाभार्थीकडून लाभार्थी हिस्सा वसुल न करताच पुरवठा आदेश देण्यात आला. शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 तथा दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु ती लेखापरिक्षणाकरिता सादर करण्यात न आल्याने एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) सदर साहित्य लाभार्थीस प्राप्त झाल्याचे व ते त्याचा उपयोग करीत असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र / मुल्यमापन अहवाल सादर करण्यात आले नाही. त्यामुळे ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/646/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यमापन केल्याचे दिसून येते नाही.

7) लेखापरीक्षण कालावधीपर्यंत एकुण 181 सायकलीपैकी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 149 सायकल वाटप केलेले असुन 32 सायकलीचे वाटप करण्यात आलेले नाही. सदर योजनेकरीता लाभार्थीची निवड सन 2015-2016

सत्रातील विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेले आहेत. साहित्य विहीत कालावधीत वाटप केले नसल्याने 10 वीत शिकणारे विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ होऊ शकलेला नाही.

8) लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेले लाभार्थी अर्जापैकी काही निवडक अर्जाची तपासणी केली असता काही अर्जामध्ये त्रुटी आढळुन आलेले आहेत.

**4.431 दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत बांधकामातील अनियमितता.**

**पंचायत समिती सेलू, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,27,20,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक जिसकअ/जिपव/दवसुयो/2295/15-16, दिनांक 03/12/2015 नुसार सन 2013-2014 मध्ये अद्याप सुरु न झालेल्या कामाचा निधी शासन खाती जमा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. वरील तपशिलाप्रमाणे सन 2013-2014 मधील सुरु न झालेली व रद्द कामांचे एकुण रुपये 15,84,000/- शासन खाती जमा करणे आवश्यक असताना अद्यापही रुपये 15,84,000/- शासन खाती जमा करण्यात आले नाही.

2) सन 2013-2014 मधील 2 कामे व सन 2014-2015 मधील 7 कामे अशी एकुण 9 कामांना 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असताना सुध्दा सदर कामे प्रगतीपथावर आहे. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक जिसकअ/जिपव/दवसुयो/2295/15-16 कार्यालय जिल्हा समाज कल्याण विभाग वर्धा जिल्हा परिषद, वर्धा दिनांक 03/12/2015 पत्रानुसार कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/प्रक्रं 442/अजाक, दिनांक 05/12/2011 नुसार अनुदानाचा 3 रा व 4 था हप्ता समाजकल्याण अधिकारी यांची परवानगी व स्वाक्षरीनिशी खर्च करणे आवश्यक आहे परंतु खालीलप्रमाणे सन 2014-2015 मधील 11 ग्रामपंचायतींना तिसरा हप्ता समाजकल्याण अधिकारी यांची परवानगी न घेता वितरीत करण्यात आला.

4) सन 2013-2014 व सन 2014-2015 मध्ये पुर्ण झालेल्या बांधकामापैकी काही ग्रामपंचायतीच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तसेच अंतिम प्रस्ताव प्राप्त झालेले नाही. त्यामुळे काम पुर्ण झाले अथवा नाही. तसेच बांधकामाच्या विलंबाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

5) ग्रामपंचायत आमगाव (खडकी) येथील प्रथम हप्ता वितरणामध्ये रुपये 80,000/- वितरीत केले आहे परंतु प्रत्यक्षात उपयोगिता प्रमाणपत्र तपासले असता केवळ रुपये 75,000/- प्रथम हप्ता दिल्याचे आढळले. त्यामुळे रुपये 5,000/- चा अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**4.432 वृध्द कलाकार मानधन वाटपाबाबत.**

**पंचायत समिती बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षात वरील प्रमाणकाद्वारे वृध्द कलाकार मानधन 24 लाभार्थ्यांना प्रती महीना 1,000/- प्रमाणे रुपये 1,35,274/- एवढा खर्च नमुद करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक एफमागास/1091/55257/प्र.क्र.446, दिनांक 18/06/1992 नुसार वृध्द कलाकाराचे वय 50 वर्ष असल्याबाबत नोंदवही ठेवल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले नाही. त्यामुळे वयाची खात्री करता आली नाही.

2) श्री.अनिल महादेव भादीकर यांना माहे मार्च 2014 ते फेब्रुवारी 2015 पर्यंतचे वाढीव मानधन व माहे जुलै ते ऑक्टोबर 2015 पर्यंतचे मानधन दिल्याचे दिसुन येते. तरी सदर कालावधीचे मानधन उशीरा दिल्याबाबत सप्रमाण खात्री पटवावी. तसेच दोन्ही स्टेटमेंटमध्ये त्यांचे A/C NO. मध्ये तफावती बाबत खुलासा व्हावा व त्यांचेच खात्यात जमा झाल्याबाबत खात्री पटवावी.

3) शासन निर्णयाप्रमाणे वृध्द कलाकार हयात असल्याबाबत प्रमाणपत्र लेखा तपासणीत दिसुन आले नाही. त्यामुळे संबंधीत जिवंत नसतांना रक्कम अदा केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) वृध्द कलाकाराचे मानधनाबाबत मंजुरी घेतांना टिपणी सादर करतांना टिपणीवर कुठेही दिनांक नमुद केलेली नाही.

**4.433 पंचायत समिती मागणी नसतांना जिल्हा स्तरावरून अनावश्यक साहित्य पुरवठा करणे.**

**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-15 मध्ये समाज कल्याण विभाग पं.स. कुरखेडा कडील साठा पुस्तकाची तपासणी केली असता जिल्हा परिषद स्तरावरून सन 2011-12 व सन 2013-14 मध्ये 13 वने 7% वन महसुल योजने अंतर्गत 50% अनुदान व 50% लाभार्थी हिस्सा (लोकवाटा) वर पुरवठा केलेले साहीत्य दि. 31/3/2016 अखेर विनावाटप पडून असल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) समाज कल्याण विभाग जि.प. गडचिरोली कडून साहित्याचा पुरवठा सन 2011-12 व सन 2013-14 मध्ये केल्याचे दिसून येते. 3 ते 4 वर्षाचा कालावधी लोटून सुद्धा सदर साहित्याची उचल लाभार्थींनी केलेली नाही. विना वापर पडून असलेल्या साहित्यामध्ये गुंतलेली रक्कम रूपये 15,01,380/- आहे. यावरून पंचायत समितीची मागणी नसतांना व लाभार्थींची निवड नसतांना अनावश्यक खरेदी करून पुरवठा केल्याचे दिसून येते. त्यामुळे जिल्हा परिषद स्वउत्पन्नाचे नुकसान झालेले आहे. सदर अनियमिततेस जबाबदार व्यक्तिवर उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) कॅनव्हास ताडपत्री 20 नग रक्कम रूपये 3888 x 20 = 77,760/- स्प्रे पंप 15 नग 1266x15=18990 पाईप 135 नग 455 x 135 = 61,425/- ची तिन ते चार वर्ष विनावापर पडून राहिल्यामुळे तुटफुट झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एकूण रक्कम 77,760 + 18,990 + 61,425 = रूपये 1,58,175/- चे नुकसान झाल्याचे दिसून येते. सदर नुकसान संबंधीत जबाबदार अधिकारी यांचेकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.434 50% अनुदानावर तलंग पिलाचे गट वाटपातील अनियमीतता.**

**पंचायत समिती कुरखेडा, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत रक्कम रुपये 98670/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेच्या स्वरूपानुसार 50% अनुदानावर तलंग गट वाटप करावयाचे असतांना लाभार्थी हिस्सा 50% न घेता 100% अनुदानावर लाभ दिल्याचे दिसून येते. त्यामुळे योजनेच्या स्वरूपाचे विपरीत कार्यवाही केलेली आहे.

2) जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी, जि.प. गड. यांचे पत्र क्र. जिपगड/पशु/ता/179/2016 दि. 29/2/2016 अन्वये सदर योजनेची अंमलबजावणी करतांना सन 2015-16 च्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करणेस्तव सूचना आहे. परंतू पशुधन विकास अधिकारी (वि) पं.स. कुरखेडा कडे मार्गदर्शक सूचना उपलब्ध नाही. त्यामुळे योजना कशी राबविली, याचा बोध होत नाही.

3) लाभार्थी मध्ये 33% महिला लाभार्थी आवश्यक असतांना 31 लाभार्थी मध्ये फक्त एक महिला लाभार्थीचा समावेश आहे. सूचनांचे पालन झालेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्रक्र 680/वित्त 9 दिनांक 31/1/2013 नुसार लेखा संहिता 1968 नियम 4 भाग-2 भाग-4 योजनेस पं.स. ची प्रशासकीय मान्यता व तांत्रीक मान्यता घेतल्याचे आढळून आले नाही.

5) विनियोजन प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

6) शा.नि. जिवायो-2010/प्र.क्र.312/पदुम-4 दि. 16/9/2010 अंमलबजावणी अधिकाऱ्याने योजनेस व्यापक प्रसिद्धि देवून अर्ज स्विकारून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प. मार्फत जिल्हा निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर

करणे आवश्यक आहे. पत्र क्र. 23अ व 23 ब दि. 4/3/2016 लाभार्थी यादी पाठविल्याचे दिसून येते. परंतू सदर लाभार्थींना निवड समितीची मान्यता प्राप्त झाल्याचे पत्र आढळून आले नाही.

7) राज्य लोकसंख्या धोरणानुसार दोन अपत्य पर्यंतच्या मर्यादेत अपत्ये असणाऱ्या लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यात यावा अशी सूचना असतांना दोनच अपत्य असल्याबाबतचे प्रपत्र आढळून आले नाही.

8) निक्की पोल्ट्री फार्म, कुरखेडा कडून प्रमाणक क्रमांक 1155 दिनांक 31/3/2016 अन्वये रक्कम रूपये 74,750/- व प्रमाणक क्रमांक 1174 दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रूपये 23,920/- चे प्राप्त 25 व 8 गट ची नोंद साठा पुस्तक पेज क्रमांक 24 वर घेतल्याबाबत देयकावर प्रमाणीत केलेले आहे. आदिवासी योजना अंतर्गत 25 तलंग गट साठा पुस्तक पेज क्रमांक 24 नुसार प्रत्यक्षात 25 तलंग गट दिनांक 10/10/2016 ला प्राप्त झाल्याचे दिसून व त्याचे वाटप लाभार्थींना केलेले आहे. बिगर आदिवासी योजने अंतर्गत 8 तलंग गट लेखा परिक्षणाचे तारखेपर्यंत प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही. असे असतांना दि. 31/3/2016 रोजी तलंग गट प्राप्त झाल्याचे खोटे प्रमाणीत करून शासनाची दिशाभूल करून नियमबाह्य रक्कम काढल्याचे दिसून येते. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक परामा1020/प्र.क्र.14/38 दिनांक 01/02/2001 परि. 1 नुसार लाभार्थींची निवड निविदा बोलाविणेपुर्वी होणे गरजेचे आहे. परंतू लाभार्थी निवडीला मान्यता प्राप्त नसतांना तलंग खरेदीची कार्यवाही करणे, तलंग प्राप्त न होता खोटे प्रमाणीत करून रक्कम काढणे, योजनेच्या खर्चास मंजूरी चे अधिकार नसतांना पं.स./सं.वि.अ. ची मंजूरी न घेता रक्कम नियमबाह्य आहरित करणे इत्यादीमुळे रुपये 98,670/- वसुल होणे आवश्यक आहे.

**4.435 अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचा विकास (दलित वस्ती सुधार) योजनेंतर्गत विकास कामांत आढळलेल्या अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती औरंगाबादचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास (दलित वस्ती सुधार) योजनेंतर्गत तपशिलाप्रमाणे एकूण 30 विकास कामे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबत रक्कम रुपये 59,33,682/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उपरोक्त कामाच्या संचिका, मोजमाप पुस्तिका व इतर अभिलेखे तपासले असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/ प्र.क्र.442/अजाक, दिनांक 05/12/2011 अन्वये प्रस्तावीत विकास कामासंबधी ग्रामसभेने ठराव पारीत करुन ग्रामपंचायतीकडे पाठविणे व गटविकास अधिकारी यांनी अनुसूचीत जाती नवबौध्द दलीतवस्तीची तपासणी करुन जिल्हा समितीकडे सदर कामाचा प्रस्ताव पाठवुन कामाची निवड प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही व निधी वितरण प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सप्टेंबर महिना अखेर पुर्ण व्हावी व शक्यतो कामे त्याच आर्थिक वर्षात पुर्ण व्हावीत असे नमुद आहे, तथापि सदर शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन आले नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना 10 नुसार योजने अंतर्गत प्राधान्यक्रम देणेसाठी गटविकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व गावांची प्राधान्य क्रमाने यादी तयार करून जिल्हा कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, तथापि अशी यादी विभागाकडे दिसुन आली नाही.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना 11 नुसार जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी कामाची पाहणी करून 100 टक्के काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर 10 टक्के रक्कम ग्रामपंचायतीस प्रदान करावे असे नमुद आहे, तथापि अशी पाहणी केल्याबाबतचे अभिलेखे संचिकेत आढळुन आले नाहीत व बहुतांशी प्रकरणी 90 टक्के अदाई केल्याचे दिसून आले.

4) लेखापरीक्षणात सादर केलेल्या देयकांची तपासणी केली असता बहुतांश देयकांवर कामाचे कितवे धावते देयक आहे. याचा उल्लेख केलेला आढळुन आला नाही किंवा त्यावर खाडाखोडी करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे किती कामे पुर्ण झाली व किती अपुर्ण आहेत याची खात्री करता आली नाही.

5) लेखापरीक्षणात सादर केलेल्या कामांच्या संचिकांची तपासणी केली असता त्यातील बहुतांश करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे करारनाम्याच्या विधीग्राहयतेबाबत खात्री पटत नाही तसेच करारनाम्यावर करारनामा केल्याचा दिनांकही नमुद केलेला नाही, केवळ कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक म्हणुन मुद्रांक खरेदी करुन संचिकेत संलग्न केला आहे. तरी विहित नमुन्यात करारनामे करून घेणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार उपअभियंता यांनी बांधकामासंबधी कामाचा संपूर्ण तपशील दर्शविणारी नोंद नमुना नंबर 69 (बांधकाम नोंदवही) मध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि सदर नोंदवहीत कामांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे एकाच प्रकारचे काम वेगवेगळया निधी मधून घेतले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर नोंदवहीत अद्यावत नोंदी घेऊन अनुपालन दर्शवावे.

7) शासन अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार उपरोक्त विकास कामांच्या देयकातून 5टक्के कार्यकंत्राट कर वसूल केलेला नाही. तरी सदर कार्यकंत्राट कराची रक्कम रुपये 2,96,684/- संबंधीताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

8) सिमेंट रस्ता काम कौडगाव जालनाचे मोजमाप पुस्तिकेची व देयकाची पडताळणी केली असता आयटम नंबर 3 चे मोजमापे पडताळणी केली असता प्रत्यक्ष मोजमाप 101.71 क्युबीक मीटर असून देयकामध्ये सदरील काम 135.62 क्युबीक मीटर दर्शवून प्रति क्युबीक मीटर 712.82 रुपये प्रमाणे 24,172/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जिपर 2000/प्र.क्र. 837/परा 8(35), दिनांक 15/09/2003 नुसार शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त कामांचा शासकीय विमा निधीकडे कामाचा विमा उतरविणेत आलेला नाही. त्यामुळे 1 टक्के विम्याची रक्कम संबंधीतांकडून वसुल करून विमा संचालनालय यांचेकडे भरणा करणे आवश्यक आहे, सर्व देयकातून अशी रक्कम परीगणित करून वसुल केलेली नाही, तथापि सन 2015-16 मधील सर्व कामांची पडताळणी करून कपात न केलेली 1 टक्के रक्कम परिगणित करुन संबंधीतांकडून वसुल करुन व विमा संचालनालय यांचेकडे भरणा करणे आवश्यक आहे.

10) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार देयकातून 2 टक्के प्रमाणे आयकर वसुल करणे आवश्यक होते. परंतु सदर देयकातून आयकराच्या रक्ककमा वसुल केलेल्या नाहीत. तरी आयकराची रक्कम रुपये 1,18,673/- संबंधीतांकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 2004/प्र.क्र.109/रा.म.2, दिनांक 22/03/2005 नुसार कामावरील साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. तथापि अनुक्रमांक 02,12 व 13 वरील कामांव्यतिरिक्त इतर कामावर वापरलेल्या साहित्याचे चाचणी अहवाल घेणेत आलेले नाहीत. त्यामुळे वापरलेले साहित्य विनिर्देशानुसार योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही. तसेच काही कामांच्या देयकातून चाचणी अहवालापोटी रकमा कपात करून घेण्यात आलेल्या आहेत. चाचणी अहवालापोटी रकमा कपात करुन घेणे अनियमित आहे.

12) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक ठळकपणे दिसतील असे लावणे आवश्यक असतांना अशी कारवाई केलेली दिसून येत नाही.

13) सिमेंट रस्ता वडगाव को. चे देयकामध्ये प्राकलनाप्रमाणे मुल्यांकन नोंदवून गुणवत्ता चाचणी अहवाल व कामाचा फलकाची रक्कम अनुक्रमे रुपये 3,300/- व 5,328/- प्रदान केली आहे. सदरील गुणवत्ता चाचणी अहवाल व कामाचा फलक लावलेला नसल्याचे संचिकेच्या तपासणीतून दिसून आले. अनावश्यक झालेल्या प्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे केलेल्या कामाची गुणवत्ता पडताळणीपुर्वीच प्रदान केल्याबाबत संबंधीताचा खुलासा घेणे आवश्यक आहे.

**4.436 पंचायत समिती उपकरातून मागासवर्गीयांना 90 टक्के अनुदानावर साहित्य खरेदीबाबत.**

**पंचायत समिती जाफ्राबाद, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,81,184/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) प्रमाणक क्रमांक 27 माहे 3.15 अन्वये ग्रामीण भागातील महिलांना 90 टक्के अनुदानावर समाजप्रबोधन साहित्य संच वाटप करणेसाठी एकूण 18 संच प्रति दर रुपये 26,845/- प्रमाणे रुपये 4,83,210/- पैकी 90 टक्के अनुदानाची रक्कम रुपये 4,34,889/- तसेच 10 टक्के लोकवर्गणी रक्कम रुपये 48,321/- लाभधारकांना समाजप्रबोधन साहित्य संच पूर्ण वाटप झाल्यावर पुरवठाधारकास अदा करण्याबाबत नमूद आहे.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/1088/(2515) उद्योग 06, दिनांक 02/01/1992 मधील (बाब 8.5) नूसार दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र व पुरवठादार अधिकृत डिलरशीप प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

2) शासन निर्णय क्रमांक परास-1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नूसार लाभार्थी निवड ही साहित्य खरेदी करणेपूर्वी करणे आवश्यक असतांना अशा प्रकारे शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही केल्याचे संचिकेवरुन दिसून आले नाही.

3) दुबार खरेदी करण्यासाठी पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 107, दिनांक 13/03/2015 अन्वये प्रस्तुत कार्यालयाने 17 सामुहिक महिला व बालकल्याण योजनेतंर्गत समाजप्रबोधन साहित्य खरेदी केले आहे. परंतु तालुक्यातून वाढती मागणी असल्यामूळे व अर्ज व प्रस्ताव सादर केले असल्याचे नमूद आहे. परंतु याबाबत संदर्भिय मागणी व अर्ज प्रस्ताव लेखा परिक्षणात संचिकेत दिसून आले नाहीत.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर 1633/57, दिनांक 19/01/1985 नूसार लाभार्थी हिस्सा 10 टक्के प्रथम वसूल करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.34 दिनांक 01/09/1993 अन्वये योजना ज्यावर्षात राबविली त्याच वर्षात साहित्य वाटप केलेले नाही.

6) साहित्य प्राप्त झालेबाबतचे डिलेवरी चलान तसेच साहित्याची साठा नोंदवहीत नोंद घेवून साहित्याचा विनियोग दर्शवण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/प्र.क्र.55, दिनांक 10/05/1989 व दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. तसेच उपयोगीता प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

9) दरपत्रकासोबत बयाना रक्कम रुपये 5,000/- चा डिमांड ड्राफ्ट पंचायत समितीने डिपॉझीट खात्यात जमा न करता संचिकेमध्ये तसाच ठेवला आहे.

10) अनुक्रमांक 4 नुसार सदर खर्च मिक्सर खरेदी करण्यात आला परंतु सदर साहित्याची नोंद नमुना 33 वर घेण्यात आली नाही. तसेच सदर साहित्य लाभार्थ्यास वाटप केल्याचे लाभार्थ्याची स्वाक्षरी रजिस्टर लेखापरिक्षणास सादर करण्यात आली नाही.

**4.437 पंचायत समिती उपकरातून 100 टक्के अनुदानावर समाजकल्याण योजनेअंतर्गत तुषार संच खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,45,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 716, दिनांक 05/06/2015 व प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता रुपये 3.00 लक्ष असतांना माहे जानेवारी, 2016 मध्ये पुनश्च वरीलप्रमाणे प्रमाणक क्रमांक 6 अन्वये रुपये 1,48,000/- ची खरेदी करण्यात आली. याबाबत सुधारीत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता संचिकेत दिसून आली नाही.

2) याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2010/प्र.क्र.72/परा 7, दिनांक 19/10/2011 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकाम व साहित्य पुरविणेबाबतची ई-टेंडरींग प्रक्रीयेतून करणेबाबत आदेशीत असतांना अशी कार्यवाही केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/1030/14, दिनांक 01/01/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला नसलेबाबत खात्री करता आली नाही.

4) लाभार्थी ग्रामपंचायत रहिवासी प्रमाणपत्र, तलाठी उत्पन्न प्रमाणपत्र, लाभार्थी अर्ज लाभार्थी मुद्रीत प्रस्तावामध्ये व सोबत जोडलेल्या दाखल्यामुळे प्राप्त ठिकाणी अपुर्ण आहे. व योजनेचे वर्ष दिनांक नमुद नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/106/प्र.क्र.78/5, दिनांक 09/01/1997 नुसार योजना राबविण्यापुर्वी लाभार्थींची निवड करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी साहित्याची साठा पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र दिले नाही.

7) संचिकेत संलग्न केलेल्या करारनाम्यावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. दिनांक नमुद नाही, दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरी नाहीत.

**4.438 पंचायत समिती उपकरातून 100 टक्के अनुदानावर समाजकल्याण योजनेअंतर्गत तीन चाकी सायकल, प्रेशर कुकर, शिलाई मशीन व मिक्सर ग्राईंडर खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 11,90,100/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती उपकर समाजकल्याण योजनेतंर्गत वरीलप्रमाणे साहित्य एकाच पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आले आहे. वरीलप्रमाणे चारही साहित्याची एकूण खरेदी रुपये 11,89,900/- एवढी येत आहे. याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2010/प्र.क्र./72/परा 7, दिनांक 19/10/2011 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील बांधकाम व साहित्य पुरविणेबाबतची ई-टेंडरींग प्रक्रीयेतून करणेबाबत आदेशीत असतांना अशी कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/106/प्र.क्र.78/5, दिनांक 09/01/1997 नुसार योजना राबविण्यापुर्वी लाभार्थींची निवड करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

3) तांत्रिक मान्यता अटी व शर्तीप्रमाणे लाभार्थी ग्रामपंचायत रहिवाशी प्रमाणपत्र, तलाठी उत्पन्न प्रमाणपत्र लाभार्थी अर्ज लाभार्थी मुद्रीत प्रस्तावामध्ये व सोबत जोडलेल्या दाखल्यामध्ये बऱ्याच ठिकाणी अपुर्ण माहिती आहे व योजनेचे वर्ष दिनांक इत्यादी नमुद नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/1030/14, दिनांक 01/01/1993 नुसार मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला नसलेबाबत खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी साहित्याची साठा पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र दिले नाही.

6) संचिकेत संलग्न केलेल्या करारनाम्यावर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. दिनांक नमुद नाही. दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरी नाहीत.

**4.439 खाजगी टँकरणे पाणीपुरवठा अदायगीमधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत रक्कम रुपये 45,39,474/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सबंधित देयकावर आयकर रक्कम रुपये 90,789/- व सरचार्ज रुपये 13,618/- एकुण रक्कम रुपये 1,04,407/- स्टेंटबँक ऑफ हैद्राबाद, अंबड येथे भरणा केलेला आहे. पोच दर्शवुन खात्री दर्शवावी.

2) टँकर क्रमांक एम.एच.091755 तिर्थपुरी ते राहेरा, तनवाडी, राहेरातांडा पर्यंत 3 खेपा जाणे येणे 56 कि.मी. दररोज 56 कि.मी. प्रवास केलेला आहे. दिनांक 06/04/2015 ते 30/06/2015 पर्यंत एकुण 110 दिवसांसाठी 5770 कि.मी. प्रवासाचे देयक एजन्सी मे.परफेक्ट रोडलाइन्स, जालना यांना रक्कम रुपये 2,68,086/- अदा करण्यात आले आहे. लॉगबुकची तपासणी केली असता सदर वाहन दिनांक 01/03/2015 पासुन कार्यरत आहे. परंतु गटविकास अधिकारी यांनी त्यांचे प्रमाणकावर दिनांक 06/04/2015 पासुन ते 30/06/2015 पर्यंत असा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे 110 दिवसांऐवजी दिनांक 06/04/2015 पासुन प्रत्यक्ष लॉग बुक नुसार वाहन 74 दिवस चालु होते. व एकुण कि.मी.3996 झाले आहे. देयकातील दिनांकाची विसंगती बाबत खुलासा करावा अन्यथा 36 दिवस जास्तीचे दिवस वाहन वापरले बाबत दररोज प्रत्येकी रुपये 1338.75 प्रमाणे रुपये 48,195/- व 1774 कि.मी. साठी प्रति कि.मी. 20.94 प्रमाणे रक्कम रुपये 37,148/- एकुण रक्कम रुपये 85,343/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

3) वाहन क्रमांक एम.एच.43-इ-1873 घनसावंगी ते बोरगांव खु. 3 खेपा रोज 38 कि.मी. प्रति खेप प्रमाणे दिनांक 04/04/2015 ते 30/06/2015 पर्यंत रक्कम रुपये 4,79,903/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 14/04/2015 रोजी घनसावंगी उद्भव बदलुन अंतरवाला केला. त्यामुळे उद्भव 38 कि.मी. ऐवजी 42 कि.मी. प्रवास एका दिवसासाठी 4 कि.मी. प्रमाणे 3 खेपाचे 12 कि.मी. जास्त वाढले. त्यामुळे दिनांक 14/04/2015 ते 28/05/2015 साठी 45 दिवसाचे 12 किमी प्रमाणे 540 किमी चे जास्तीचे प्रदान करावे लागले. संबधीत उद्भव बदलणे बाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रुपये 22.17 प्रति किमी प्रमाणे 540 किमीसाठी रुपये 11,972/- संबधीताकडुन वसुल करुन पुर्तता करावी. तसेच दिनांक 29/05/2015 ते 30/06/2015 पर्यंत एकुण 33 दिवसांसाठी उद्भव अंतरवाला ऐवजी अंबड शुध्दीकरण असा घेतला. त्यामुळे जाणे येणेसाठी 42 किमी ऐवजी 100 किमी प्रवास करावा लागला एका फेरीसाठी 58 कि.मी. अंतर वाढले रोज 3 फेरीसाठी 174 कि.मी. प्रवास वाढला. त्यामुळे 33 दिवसांसाठी 174 कि.मी. रोज प्रमाणे 5742 किमी प्रवासासाठी रक्कम रुपये 22.17 प्रति कि.मी. प्रमाणे रक्कम रुपये 1,27,300/- जादा प्रदान करावे लागले. उद्भव बदल करणे बाबतचे आदेश दर्शवावे अन्यथा एकुण रक्कम रुपये 1,39,272/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी.

4) वाहन क्रमांक एम.एच.19-इ-3861 पांगरा तांडा ते तांडा नंबर 1 व 2, 3 खेपा रोज 36 कि.मी. प्रति खेप प्रमाणे दिनांक 07/04/2015 ते 15/06/2015 पर्यंत रक्कम रुपये 1,65,963/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 07/04/2015 ते 15/06/2015 पर्यंत वाहन एकुण 70 दिवस चालले असतांना प्रदान 71 दिवसाचे केलेले आहे. 1 दिवसाचे जादा प्रदान रुपये 1343.25 प्रति दिन प्रमाणे रुपये 1343.25/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावे.

5) वाहन क्रमांक एम.एच.04-अ-4181 मच्छिंद्र चिंचोली ते बोलेगांव, 3 खेपा रोज 37 कि.मी. प्रति खेप प्रमाणे दिनांक 24/03/2015 ते 30/06/2015 पर्यंत रक्कम रुपये 3,73,183/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 24/03/2015 ते 30/06/2015 पर्यंत वाहन एकुण 99 दिवस चालले असतांना प्रदान 100 दिवसाचे केलेले आहे. 1 दिवसाचे जादा प्रदान रुपये 1372.50 प्रति दिन प्रमाणे रुपये 1372.50/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करण्यात यावे.

6) वाहन क्रमांक एम.एच.31-एम-3719 सौ.वर्षा विनाद खंडागळे (गट क्रं.334) ते गुरुपिंप्री 3 खेपा रोज 20 कि.मी. प्रति खेप प्रमाणे दिनांक 30/03/2015 ते 30/06/2015 पर्यंत रक्कम रुपये 4,95,268/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 16/04/2015 रोजी उद्भव बदलुन तळेगांव केला. त्यामुळे उद्भव 20 कि.मी. ऐवजी 50 कि.मी. प्रवास एका दिवसासाठी 30 कि.मी. प्रमाणे 3 खेपाचे 90 कि.मी. जास्त वाढले.

त्यामुळे दिनांक 16/04/2015 ते 28/05/2015 साठी 43 दिवसाचे 90 किमी प्रमाणे 3870 किमी चे जास्तीचे प्रदान करावे लागले. संबधीत उद्भव बदलणे बाबत आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रुपये 20.76 प्रति किमी प्रमाणे 3870 किमीसाठी रुपये 80,341/- संबधीताकडुन वसुल करुन पुर्तता करावी. तसेच दिनांक 29/05/2015 ते 30/06/2015 पर्यंत एकुण 33 दिवसांसाठी उद्भव तळेगांव ऐवजी अंबड जलशुध्दीकरण असा घेतला. त्यामुळे जाणे येणेसाठी 50 किमी ऐवजी 110 किमी प्रवास करावा लागला एका फेरीसाठी 60 कि.मी. अंतर वाढले रोज 3 फेरीसाठी 180 कि.मी. प्रवास वाढला. त्यामुळे 33 दिवसांसाठी 180 कि.मी. रोज प्रमाणे 5940 किमी प्रवासासाठी रक्कम रुपये 20.76 प्रति कि.मी. प्रमाणे रक्कम रुपये 1,23,314/- जादा प्रदान करावे लागले. उद्भव बदल करणे बाबतचे आदेश दर्शवावे अन्यथा एकुण रक्कम रुपये 2,03,655/- संबधीताकडुन वसूल करुन शासन खाती भरणा करण्यात यावी. तसेच दिनांक 30/03/2015 ते 28/04/2015 एकुण 7470 कि.मी. प्रवास केलेला असुन देयकामध्ये अदाई करतांना 7020 कि.मी. साठी प्रदान केलेले आहे. 450 कि.मी. कमी प्रदान करणे बाबत खुलासा करावा.

7) एम.एच.16-क्यु-3489 तळेगांव तलाव (चर) ते राणीऊंचेगांव 24 कि.मी. रोजसाठी 3 खेपा रोज दिनांक 17/04/2015 ते 18/06/2015 पर्यंत केलेल्या असुन एकुण 63 दिवसासाठी 2244 कि.मी. साठी रक्कम रुपये 1,39,065/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. परंतु लॉगबुकावर ग्रामसेवक यांची स्वाक्षरी घेतलेली नाही. दर्शवुन पुर्तता करावी.

8) वाहन क्रमांक एम.एच.23-5575 राजेगांव ते घनसावंगी 4 खेपा रोज 24 कि.मी. प्रति खेप प्रमाणे दिनांक 08/04/2015 ते 30/06/2015 पर्यंत रक्कम रुपये 3,27,315/- मे.परफेक्ट रोडलाईन्स, जालना यांना प्रदान केलेले आहे. दिनांक 29/04/2015 रोजी ठिकाण बदलुन राजेगांव ते बोडखा विहिर केला. त्यामुळे उद्भव 24 कि.मी. ऐवजी 44 कि.मी. प्रवास एका दिवसासाठी एका फेरीसाठी 20 कि.मी. प्रमाणे दिनांक 16/04/2015 ते 28/05/2015 साठी 189 फेरीचे 20 किमी प्रमाणे 3780 किमी चे प्रति कि.मी. 21.73 प्रमाणे रक्कम रुपये 82,139/- जास्तीचे प्रदान करावे लागले. ठिकाण बदलण्याचे आदेश दर्शवावे अन्यथा रक्कम रुपये 82,139/- संबधीताकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करावी. वाहन 84 दिवस प्रवास केला असतांना 83 दिवसांचे प्रदान केले आहे. त्यामुळे रक्कम रुपये 1389.37 कमी प्रदानाबाबत खुलासा करावा.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक डब्ल्यु क्यु एम/2010/ प्र.क्र.149/पापु-12, दिनांक 30/10/2010 मधील उपपरिच्छेद क्रमांक 4 मधील तरतुदीनुसार प्रत्यक्ष स्त्रोताजवळ जावुन स्त्रोताची माहिती संकलित करण्याची तरतुद आहे. तथापि अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. सबब ज्या गावात पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. त्या ठिकाणापासुन उद्भवाचे अंतर निश्चित करणे शक्य होत नाही. संबधीत गावास पाणी टंचाईमुळे टँकर लावणे बाबतचे ग्रामपंचायतचे प्रस्ताव, त्यासोबतचे अभिलेखे, सक्षम प्राधिका-यांचे विहिर अंतर प्रमाणपत्र इत्यादी अभिलेखे लेखापरिक्षकास दर्शविले नाहीत. त्यामुळे संबधीत गावाची लोकसंख्या किती त्यानुसार किती टँकरची आवश्यकता होती, नेमुन दिलेल्या उद्भवावरुनच पाणी पुरवठा झाला किंवा नाही, उद्भवाचे अंतर योग्य घेतले किंवा नाही याबाबत खात्री करता आली नाही.

10) गावाचे नांव भेंडाला वाहन क्रमांक एम.एच.23-6958, दिनांक 15/03/2015 ते 30/06/2015 एकुण दिवस 108 एकुण कि.मी.10028 एकुण रक्कम रुपये 3,63,531/- गावाचे नांव देवनगर तांडा वाहन क्रमांक एम.एच.18-1946 दिनांक 01/03/2015 ते 30/06/2015 एकुण दिवस 120 एकुण कि.मी.6752 एकुण रक्कम रुपये 3,32,484/- गावाचे नांव मच्छिंद्र चिंचोली वाहन क्रमांक एम.एच.17-5833 दिनांक 18/03/2015 ते 30/06/2015 एकुण दिवस 72 एकुण कि.मी.3542 एकुण रक्कम रुपये 1,74,866/- गावाचे नांव पिरगायबवाडी वाहन क्रमांक एम.एच.09-6995 दिनांक 29/05/2015 ते 30/06/2015 एकुण दिवस 33 एकुण कि.मी.7024 एकुण रक्कम रुपये 1,96,111/- गावाचे नांव निपानी पीपलगांव वाहन क्रमांक एम.एच.14-7241 दिनांक 10/04/2015 ते 30/06/2015 एकुण दिवस 81 एकुण कि.मी.17010 एकुण रक्कम रुपये 47,63,876/- या वाहनांचे लॉग बुक अर्धसमासपत्र क्रमांक 03, दिनांक 12/09/2016 अन्वये लेखी मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही. त्यामुळे केलेल्या खर्चाची खात्री करता आली नाही. दर्शवुन खात्री पटवावी.

**4.440 समाजकल्याण अंतर्गत 75 टक्के अनुदानावर अपंगाना पीव्हीसीपाईप पूरवठा करणे बाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 79,800/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार दरकरार असतांना केलेली खरेदीच्या दरात तफावत असल्यास एमएसएसआयडीसी यांचे दरकरारापेक्षा जास्त दराची रक्कम वसुलपात्र ठरते. त्याप्रमाणे एमएसएसआरडीसी यांचे दरकरार रुपये 65.52 प्रति मी. आहे. एकूण 06 मी साठी दर रुपये 393/- प्रती पाईप ठरतो व खरेदी केलेल्या पाईपाचा दर रुपये 420/- प्रती पाईप आहे. तरी तफावतीची रक्कम रुपये 27/- प्रती पाईप प्रमाणे 190 नगाचे रुपये 5,130/- वसुल करुन उपकर खाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंतकरुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहीत्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. परंतु सदरील योजने मध्ये खरेदीचे आदेश ऑगस्ट 2014 मध्ये देऊन साहित्याचे वाटप माहे ऑगस्ट 2014 नंतर केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन देयंकातून क्रमांक परास.1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी, यासाठी निविदा बोलावण्या पुर्वी खरेदी करण्यापुर्वी पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेत लाभार्थींची निवड करावयास पाहिजे. परंतु लाभार्थींची निवड ठराव मोघम स्वरूपाचा घेवून खरेदी केल्या नंतर ब-याच विलंबाने लाभार्थी नावे दूरूस्तीची यादीस मान्यता घेतली आहे.

4) साठा नोंदवहीवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही प्रमाणीत ठेवलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही. याबाबत योग्य ती सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामुळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

**4.441 समाजकल्याण अंतर्गत 100 टक्के अनुदानावर पीव्हीसी पाईप पूरवठा करणे बाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,39,740/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची निवड रुपरेषा लाभार्थी निवड 30 जुन पर्यंतकरुन खरेदी नोव्हेंबर मध्ये करुन साहित्याचे वाटप जानेवारी पर्यंत करावयाचे आहे. शासनाच्या निर्देशानुसार योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 नुसार दरकरार असतांना केलेली खरेदीच्या दरात तफावत असल्यास एमएसएसआयडीसी यांचे दरकरारापेक्षा जास्त दराची रक्कम वसुलपात्र ठरते. त्याप्रमाणे एमएसएसआरडीसी यांचे दरकरार रुपये 65.52 प्रति मी. आहे. एकूण 06 मी साठी दर रुपये 393/- प्रती पाईप ठरतो व खरेदी केलेल्या पाईपाचा दर रुपये 420/- प्रती पाईप आहे. तरी तफावतीची रक्कम रुपये 27 प्रती पाईप प्रमाणे 1047 नगाचे रुपये 28,269/- वसुल करुन उपकर खाती भरणा करावी.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.872/2ब, दिनांक 10/10/1996 नूसार पंचायत समितीने कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी किती वस्तूची आवश्यकता आहे. याचा आढावा घेवून खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

5) साठा नोंदवहीवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही प्रमाणीत ठेवलेली नाही.

6) पंचायत समिती उपकरातून राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये पंचायत समितीने पीव्हीसी पाईप खरेदी ही एकच योजना महिला व बालकल्याण, समाजकल्याण, अपंग या लेखाशिर्षाखाली राबवून एकच इ.निवीदा प्रक्रीया केलेली आहे. योजनानिहाय इत्यादी निवीदा प्रक्रीया राबविणे आवश्यक होते.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा मूळ हेतू सफल होत आहे किंवा नाही. याबाबत योग्य सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नाही. त्यामूळे योजनेचा मूळ उद्देश सफल झाल्याचे पडताळणी करता आली नाही.

**4.442 पंचायत समिती स्वत:च्या उत्पान्नातुन 10 टक्के रक्कम महिला व बालकल्यानार्थ खर्च न केल्याबाबत. (परिच्छेद क्रमांक 19)**

**3 टक्के रक्कम अपंग व्यक्तींच्या कल्याण व पुनर्वसकरिता खर्च न करणेबाबत. (परिच्छेद क्रमांक 25)**

**पंचायत समिती हिमायतनगर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती हिमायतनगरचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात पंचायत समितीने वित्तीय वर्षात स्वत:च्या उपकर निधीमधुन किमान 10 टक्के रक्कम महिला व बालकल्यानार्थ खर्च केलेली नाही, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2001/10 प्र.क्र.05/208, दिनांक 06/11/2001 नुसार पंचायत समितीने स्वत:च्या उत्पन्नातुन 10 टक्के रक्कम महिला व बालकल्यानार्थ खर्च करणे आवश्यक आहे, परंतु उक्त शासन निर्णयाचे अनुषंगाने पंचायत समिती हिमायतनगरने पालन केल्याचे दिसुन येत नाही.

2) पचांयत समिती हिमायतनगरचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात पंचायत समितीने स्वत:च्या उत्पन्नातुन 3 टक्के रक्कम अपंग व्यक्तीच्या कल्याण व पुनर्वसनासाठी केल्याचे दिसुन आले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2007/प्र.क्रं.4871 वित्त 3, दिनांक 05/10/2012 अन्वये जिल्हा परीषदेने / पंचायत समितीने आपल्या स्वत:च्या उत्पन्नाच्या 3टक्के करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

**4.443 13 वा वित्त आयोग या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या विविध बांधकामातील शासकीय कपाती न केलेबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचातय समिती उमरगाचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणासत 13 वा वित्त आयेग या योजनेतंर्गत 19 बांधकामे केली असुन, त्यामध्ये आवश्यक असलेल्या शासकीय कपाती केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 अन्वये बांधकामावर वापरण्यात आलेल्या सिमेंट, खडी व स्टील इ. साहित्याचा तपासणीचा चाचणी अहवाल लेखा लेखा परिक्षणाल सादर केलेला नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार उपअभियंता यांनी काम सुरु असताना कामाची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी काम सुरु असतांना कामाची 5 टक्के तपासणी करुन दिनांकीत स्वक्षरी करणे आवश्यक आहे. परंतु मोजमाप पुस्तिकेत अशा प्रकारची दिनांकीत स्वक्षरी केल्याचे दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 (सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 09) मधील कलम 16 नुसार मुल्यवर्धीत करांची नोंदणी नसलेल्या ठेकेदारांकडून बांधकामाच्या देयकातून / प्रदान मुल्यातून 5 टक्के मुल्यवर्धीत कराची रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. एकूण 7 बांधकामांचा मुल्यवर्धीत कर रक्कम रुपये 52,180/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करुन चलनाव्दारे शासन खाती जमा करावा.

4) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 नुसार बांधकामाच्या मुल्यातून 2 टक्के प्राप्तिकर (आयकर) कपात करणे आवश्यक आहे. एकूण 96 बांधकामांच्या संदर्भात 2 टक्के प्रमाणे प्राप्तिकर रक्कम रुपये 47,571/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करुन चलनाव्दारे शासन खाती जमा करावा.

5) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/ कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 मधील नियम 03(1) इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसूल करताना, बांधकामाच्या एकुण मुल्यानुसार 1 टक्के उपकर म्हणून रक्कम वसूल करावयाची आहे. एकूण 5 बांधकामांच्या संदर्भात 1 टक्के प्रमाणे कामगार कल्याण उपकर रक्कम रुपये 8,600/- संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन, चलनाव्दारे शासन खाती जमा करावा.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास-109/प्र.क्र.2/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटदारास कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा कंपनीकडे उतरविला असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक दिनांक 02/06/2003 नुसार विमा रक्कम ठेकेदाराचे देयकातून कपात करुन शासकीय विमा खात्यात भरणे आवश्यक आहे. एकूण 5 बांधकामांचा 1 टक्के प्रमाणे कामाचा विमा रक्कम रुपये 8,600/- संबंधीत ठेकेदाराकडून वसूल करुन चलनाव्दारे शासन खाती जमा करावा.

8) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौ.ख.नि.10/1009/प्र.क्र.309/ख, दिनांक 11/02/2010 नुसार बांधकामाचे देयकातून गौण खनिजाची कमी कपात केलेली रॉयल्टीची रक्कम 1,67,022/- संबंधित ठेकेदाराकडून वसूल करुन चलनाव्दारे शासन खाती जमा करावी.

**4.444 अनुसुचित जाती व नवबौध्द घटक योजना अंतर्गत बांधकामावरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती लोहारा येथे अनुसुचित जाती व नवबौध्द घटक योजना अंतर्गत बांधकामावरील देयकाचे प्रदान प्रमाणक क्रमांक 267, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 3,66,000/- करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के कामाची तपासणी केल्याचे नमुद केलेले आहे, परंतु प्रत्येक कामाची रुपये 50,000/- चे प्रत्येक टप्प्यात तपासणी केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 नुसार योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर 2009/प्र.क्र.180/पंरा.8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाचे ठिकाणी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक तातडीने बसविण्यात यावेत, परंतु कामाचे ठिकाणी फलक बसविण्यात आल्याबाबत मोजमाप पुस्तकात कोणतीच नोंद घेण्यात आलेली नाही. संबंधीताकडुन रक्कम रुपये 2,070/- वसुल करुन शासन खाती जमा करावी.

3) बाब क्रमांक 4 - 1:4:8 सिमेंट कॉंक्रीट करणे काम 10.68 घनमीटरसाठी दर रुपये 3,081/- प्रमाणे रुपये 32,911/- चे प्रदान करण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात जिल्हा दर सुचिनुसार या कामासाठी दर रुपये 2,250/- नमुद असुन त्याप्रमाणे 10.68 घनमीटर कामासाठी दर रुपये 2,250/- प्रमाणे रुपये 24,030/- चे प्रदान करणे आवश्यक होते. त्यामुळे सदर कामावर रुपये 32,911/- वजा रुपये 24,030/- = रुपये 8,881/- चे जादा प्रदान संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

4) गौण खनिज रॉयल्टीची रक्कम रुपये 9,497/- वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कपात करुन शासन खाती जमा केले नाहीत.

5) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-1009/प्र.क्र.40/कोषा-प्र-5, दिनांक 29/03/2011 नुसार सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी आयकराची रक्कम कपात करुन विहीत मुदतीत आयकर कपातीचा भरणा आयकर विभागास करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त कामासाठी प्रदान रक्कमेतुन आयकराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. 2 टक्के प्रमाणे आयकराची एकुण रक्कम रुपये 14,000/- संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए-2007/प्र.क्र.788/ कामगार 7-अ, दिनांक 26/10/2009 नुसार 1 टक्के दराने उपकर रक्कम कपात करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. कामासाठी एकुण प्रदान रक्कम रुपये 7,00,000/- वर 1 टक्के प्रमाणे रुपये 7,000/- संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

7) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 चे कलम 31 अन्वये 5 टक्के मुल्यवर्धीत कर कपात करणे आवश्यक आहे, परंतु असा कर कपात करुन शासन खाती जमा केलला नाही. कामासाठी एकुण प्रदान रक्कम रुपये 7,00,000/- वर 5 टक्के प्रमाणे रुपये 35,000/- संबंधीताकडुन वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2008/प्र.क्र.152/यंत्रकक्ष-बां.सा., दिनांक 18/11/2009 नुसार कंत्राटदाराने आणलेल्या सर्व साहित्याची चाचणी व परिक्षणा नंतर योग्य ते साहित्य कामावर प्रत्यक्ष उपयोगात आणण्यात येईल असे पहावे, तसेच उपरोक्त साहित्य कामावर आल्याचा पुरावा नोंदविणे तसेच जमेची तारीखवार नोंद घेणे व त्यानंतर वापराची तारीखवार नोंद घेणे इत्यादी बाबी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पाळाव्यात असे नमुद करण्यात आलेले आहे. उपरोक्त कामावर साहित्य वापरलेले आहे, परंतु त्याबाबत जमेच्या व वापराच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे साहित्याची चाचणी करुन न घेताच ते कामावर वापरण्यात आल्याचे दिसुन येते.

**4.445 दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत केलेल्या कामातील नियमबाहयते बाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती औसा यांनी सन 2015-2016 चे शासन निधीतून वस्ती सुधार योजनेंतर्गत सन 2015-2016 या आर्थिक वर्षात एकूण 54 कामांवर रक्कम रूपये 1,60,50,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियमाचे कलम 194 (क) प्रमाणे 2 टक्के आयकर वसुल केलेला नाही. एकूण 15 कामातून आयकराची रक्कम कपात केलेली नाही. तरी सदर रक्कम रुपये 7,86,781/- वसूल करून शासन खाती जमा केली नाही.

2) उपरोक्त यादीतील अनुक्रमांक 04 व 15 हे काम पेवर ब्लॉक चे काम पूर्ण केल्याचे संचिका व मोजमाप पुस्तिकेवरून निदर्शनास आले. परंतु सदर कामावर वापरलेल्या साहित्याचा Quality Control चा साहित्य चाचणी अहवाल व Complition Certificate वरून हे काम सिमेंट रस्त्याचे केल्याचे दिसून येते. याबाबत सबंधीत अभियंत्याने सदर Ajency कडून कोणते काम पूर्ण करून घेतले याची खात्री लेखापरीक्षणात होत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार कंत्राटदारासोबत करार (शेड्युल बी) करण्यात येईल. तसेच नियम 147 नुसार प्रत्येक कराराची नोंद नमुना नं. 48 मध्ये नोंदविण्यात येईल. परंतु कंत्राटदारासोबत करार (शेड्यूल बी ) व नमुना नं. 48 ची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/पं.रा.8, दिनांक 15/11/2011 नुसार सर्व कामे मुदतीमध्ये पूर्ण होतील. या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे व

काम पूर्णत्वाचे दाखले व उपयोगिता प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महालेखापाल, विभागीय आयुक्त कार्यालय व शासनास सादर करावे. तथापि अशी कार्यवाही केल्याबाबतची खात्री करता आली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/पं.रा.8, दिनांक 15/11/2011 नुसार होणारी कामे चांगल्या दर्जाची व टिकवू होण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत कार्यान्वित असलेल्या राज्य गुणवत्ता नियंत्रक याचेकडून कामाची तपासणी करण्यात यावी. या तपासणीचा मोबदला म्हणून अंदाजपत्रकामध्ये अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1 टक्केची तरतूद करण्यात यावी. परंतु पंचायत समितीने अशी कामाच्या अंदाजपत्रकामध्ये अशी तरतूद केलेली नाही व अशी तपासणी करून घेतलेली नाही.

6) प्रशासकीय मान्यतेतील अटी व शर्तीनुसार काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी “ हे काम सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे.” असे वाक्य कोनशिलेवर कोरून ती बसविण्यात यावी. तसेच कोनशिलेवर यंत्रणेचे नाव व काम पूर्ण केल्याचा दिनांक हे देखील कोरण्यात यावे. तथापि अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

7) ग्रामपंचायतीस रक्कम प्राप्त झाल्याबाबत नमुना नं.7 ची सामान्य पावती घेण्यात आली नाही. व निर्माण झालेल्या मालमत्तेची नोंद ग्रामपंचायत दप्तरी घेतल्याचे कागदपत्रे संचिकेत दिसून आले नाहीत.

8) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 197 नुसार पूर्ण झालेल्या कामाच्या नोंदी नमुना नं 69 मध्ये घेण्यात यावी तसेच लेखासंहिता 1968 चे नियम 97 अन्वये नमुना नं. 40 मध्ये रस्त्याची नोंद घेणे आवश्यक असताना अशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 180 नुसार अंतिम मोजमाप घेवून रक्कम पदान केल्यानंतर मोजमाप पुस्तिकेवर लाल शाईने कर्ण रेषा मारावयास पाहिजे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**4.446 दलित वस्ती सुधार योजना कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** पंचायत समिती निलंगाने सन 2015-2016 मध्ये लेखापरीक्षण निवड महिन्यात 57 बांधकामांवर रक्कम रूपये 1,52,62,097/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार कंत्राटदाराकडून 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. तथापि सदर कामाचे बाबतीत आयकर कपात करण्यात आलेला नाही. तरी संबंधिताकडून आयकराची रक्कम रुपये 71,772/- वसूल करून शासनखाती भरणा करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/ परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने नामफलक बसविल्याबाबत मोजमाप पुस्तिकेवर खर्च नोंदविलेला आहे. परंतु 24 कामांच्या छायाचित्रात नामफलक बसविल्याचे दिसत नाही. त्यामुळे सदर नामफलकावरील एकूण खर्च रक्कम रूपये 1,71,756/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर- 2009/प्र.क्र.180/ परा-8, दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहीत प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु 15 कामांच्या अंदाजपत्रकात नामफलकाची तरतुद असताना नामफलकावर खर्च न करता इतर बाबीवर रक्कम रूपये 1,10,343/- खर्च केलेला आहे. तरी रक्कम रुपये 1,10,343/- वसुल होणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 87 नुसार प्राप्त साहीत्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, 5 कामांच्या बाबतीत अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाचे अंतीम प्रदान केलेले आहेत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 148 प्रमाणे करारनाम्यात काम पूर्ण करण्याचा कालावधी विहीत केलेला असतो. तथापि, उपरोक्त कामाच्या संदर्भात अनु. क्र. 28, 35, 45, 49, 91 वरील कामाची मुदत संपुनही सदरची कामे पूर्ण झालेली नाहीत. व कंत्राटदाराने मुदतवाढीचे अर्जही केलेले नाहीत. तसेच सदर ग्रामपंचायतीवर कोणतीही दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.-44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 190 नुसार नमुना 65 मध्ये काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. तथापि, काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नसतांना / प्रमाणपत्रावर दिनांक नमूद नसताना अंतीम देयके अदाई केलेली आहेत.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम 168 अन्वये उपअभियंता यांनी कामाची 100 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, उपअभियंता यांनी कामाची 100 टक्के तपासणी केलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नमुना क्रमांक 52 मोजमाप पुस्तिकेमध्ये कामाच्या नोंदी घेताना शाखा अभियंता यांनी मोजमापे नोंदविल्याचा दिनांक नमुद करणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

10) मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 35 (ब) नुसार संवितरण अधिकारी प्रदानार्थ देयक पारीत करतांना त्यावर कामाचे पूर्ण नाव, खर्चाचे वर्गीकरण, देयकातील सर्व कपाती केल्या आहेत. हे पाहण्यासाठी जबाबदार असेल.

**4.447 100 टक्के अनुदानावर पंचायत समिती उपकरातुन 3 टक्के अपंगासाठी मिरची काडप यंत्र खरेदीबाबत.**

**पंचायत समिती रेणापूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती रेणापुर सन 2015-16 चे लेखापरिक्षणात असे दिसुन आले की, पंचायत समिती उपकरातुन 100 टक्के अनुदानावर 3 टक्के अपंगासाठी मिरची कांडपयंत्र खरेदीसाठी रुपये 1,60,000/- एवढी तरतुद करुन त्यावर रुपये 1,46,184/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ZPA-2008/प्र.क्र.446/ वित्त-3, दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना काटेकोरपणे राबविले बाबत वेळापत्रक दिलेले असुन त्यानुसार कार्यवाही करुन साहित्याचे वाटप करावयाचे असतांना त्याप्रमाणे खरेदी व वाटप झालेले नाही. याबाबत संयुक्तीक खुलासा होणे आवश्यक आहे.

2) उक्त शासन निर्णयान्वये लाभार्थ्यांची निवड 31 मे अखेर पर्यंत व समितीची मान्यता 31 ऑगस्ट पर्यंत घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही.

3) लाभार्थीची निवड ग्रामपातळीवर ग्रामसभेतुन होणे आवश्यक होते. परंतु अशी निवड झाल्याची खात्री लेख्या अभावी करता आली नाही.

4) एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला जाणार नाही यासाठी पंचायत स्तरावर लाभ देण्यात आलेल्या लाभधारकाची गाववार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही कार्यालयाकडुन न झाल्याचे दिसुन येते खुलासा करावा व अनुपालन दर्शवावे.

5) साठा नोंदवही नमुना नं.33 पृष्ठ क्र.52 वर साहित्याची नोंद घेण्यात आली आहे. परंतु वाटप लेखापरिक्षण दिनांकापर्यंत करण्यात आले नाही. यावरुन त्या त्या वर्षात लाभार्थीस लाभ मिळाला नसल्याचे दिसुन येते.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/ भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील अ.क्र.11 नुसार पंचायत समितीने साहित्याची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15

फेब्रंवारी पुर्वीच करणे आवश्यक आहे. तसेच वित्त विभाग/लेखा शाखेकडुन कोणत्याही प्रकाराच्या देयकांची रक्क 15 मार्च नंतर मंजुर करण्यात येवु नये असे असतांना पंचायतीने नियमबाहयपणे प्रदान झालेले आहे.

**4.448 पंचायत समिती उपकरातून 14 समाजकल्याण योजने अंतर्गत 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीय महिलांना व 3 टक्के अपंगाना शिलाई मशिन पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती शिरूर अनंतपाळने सन 2015-2016 मध्ये 14-समाज कल्याण अंतर्गत पंचायत समिती उपकरातून 90 टकके अनुदानवर 10 टक्के महिला बालकल्याण व 3 टक्के अपंगासाठी ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना स्वंयरोजगारासाठी शिलाई मशिन पुरवठा करणे योजनेअंतर्गत रक्कम रुपये 1,84,228/- प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/ भाग-111/उद्योग-04, दिनांक 30/10/2015 प्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर निविदा मागवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुर्नप्रत्ययी आदेश घेतलेले नाही व वस्तूच्या बाजारातील किंमती मूळ आदेशापेक्षा कमी नसतील याची शहानिशा न करता शिलाई मशिन यंत्र खरेदी केली आहेत.

2) संचिकेत डिलेव्हरी चालन जोडले नाही. गुणवत्ता तपासणी अहवाल शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अहवाल हा समाज कल्याण विभागाने खरेदी केलेल्या शिलाई मशिनचा जोडला आहे. पंचायत समिती शिरूर अनंतपाळ ने खरेदी केलेल्या साहित्याचे डिलेव्हरी चलन व तपासणी अहवाल दर्शवून विहीत मुदतीत सदर मालाचा पुरवठा झाल्याची खात्री पटवावी व सदर मालाच्या गुणवत्ता व दर्जाबाबत तपासणी अहवाल दर्शवावा.

3) लाभार्थ्यांची निवडयादी व लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणात सादर केलेले नाहीत. माल सुस्थितीत व योग्य दर्जाचा प्राप्ती बाबत डिलेव्हरी चलनस प्राप्त नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्रे उपलब्ध केली नसल्याने योग्य लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ दिल्या बाबतची खात्री होत नाही. आयएसआय शिलाई मशिन प्राप्तीची व योग्य लाभार्थीना वाटपाची अभिलेख्याव्दारे खात्री पटवावी.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1020/ प्र.क्र.14/38, दिनांक 20/06/2008 नुसार साहित्य खरेदीपुर्वी लाभार्थ्यांची निवड करुन त्यानुसार खरेदी करावयाची आहे अशी कार्यवाही केली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1093/प्र.क्र.1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवण्यात न आल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार योजने चा लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.